# हाकारा



## धरण, जंगल व आदिवासी

□

## आदिवासींमधील स्वयंसेवी कार्य



वर्ष : पाचवे । अंक : पहिला-दुसरा । जानेवारी-जून १९८४

# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद


मार्गदर्शक   प्रा. गं. बा. सरदार

## कार्यकारी मंडळ

| | |
|---|---|
| अध्यक्ष | जनार्दन वळवी |
| उपाध्यक्ष | शरद कुलकर्णी |
| चिटणीस | रा. के. मुटाटकर |
| सहचिटणीस | जगदीश गोडबोले |
| खजीनदार | बाबुल पठाण |
| सभासद | विजय भानू |
| | गोविंद गारे |
| | श. गो. देवगावकर |
| | नान्सी गायकवाड |
| | दर्शन शंकर |

## सल्लागार मंडळ

| | |
|---|---|
| बाबा आढाव | जयंत पाटील |
| बाबा आमटे | विजय परुळकर |
| रावसाहेब कसबे | अनंतराव बोधनकर |
| सुधा काळदाते | अनुताई वाघ |
| विजय तेंडुलकर | विलास संगवे |
| वि. म. दांडेकर | वाहरु सोनवणे |
| मधुकर देवल | गीता साने |
| चित्रा नाईक | छाया सुरतवंती |
| आ. ना. नारळकर | दत्ता सावळे |

कष्टकरी जनता, भूषण भारता, वंदन करितो पददलिता ।

# हाकारा



( महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे त्रैमासिक )

## अनुक्रमणिका


आदिवासींचा राजकीय पक्षांकडून इंधनासारखा वापर
**सविता तारे** ३

चुकत चुकत शिकायला मिळतं : प्रदीप गायकवाड ६

जंगल आदिवासी आणि धरण : मो. हि. हिरालाल ९

अस्मिता जागृतीचा कार्यक्रम : प्रमोद करंदीकर १२

भूमिसेवा व काळूरामची हकीगत : वसंत देशपांडे १५

हलबांच्या सवलती आणि आदिवासींचा विकास
**मदन धवकर** २२

आदिवासी सेवा व मसूद–प्रकरण २५

आदिवासींसाठी स्वतंत्र न्याययंत्रणेची गरज
**उल्हास देसाई** ३०

पारंपरिक आरोग्यपद्धती : आर. पी. पालेकर ३२

ग्रामसेवक कसा हवा : नानासाहेब ठकार ३५

धर्मांतर झाले पण विचारक्रांती नाही
**ना. ग. गोरे** ३८

म्हैसाळ प्रयोगाचे मूल्यमापन : सुषमा सोनक ४०

आदिवासी विकास, शासन आणि स्वयंसेवी संस्था
**शरद कुलकर्णी** ४३

शोषणमुक्त समाज स्थापण्याचा प्रयत्न
**शोभा मुळे** ४९

चला आपुन बघायाला : प्रदीप गायकवाड ५२

इंचमपल्ली धरणास विरोध करावा
**बाबा आमटे** ५५

पुस्तक परीक्षण

संस्था परिचय ६१

संवाद ६४


---


वर्ष पाचवे : अंक पहिला, दुसरा
जानेवारी–जून १९८४
परिषद / हाकारा संयुक्त
वार्षिक वर्गणी : २० रुपये
एका अंकाची किंमत : ४ रुपये
पत्रव्यवहाराचा पत्ता :
रा. के. मुटाटकर, सचिव
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
ई/५, प्राध्यापक निवास
पुणे विद्यापीठ
पुणे ४११ ००७.

संपादक मंडळ
जगदीश गोडबोले
शरद कुलकर्णी
राजाभाऊ राजगडकर

संपादक
रामचंद्र मुटाटकर

सहसंपादक
सुधीर जोग

प्रकाशक :
प्रा. रा. के. मुटाटकर
सचिव, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे यांनी
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे यांचेसाठी
साप्ताहिक मुद्रण,
१०२५ सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३०,
येथे छापून प्रसिद्ध केले.


---

संपादकीय

# स्वयंसेवी संस्थांची गरज

आदिवासीच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक तसेच विकासविषयक प्रश्नांचे सर्वांगीण दर्शन घडविण्याचा प्रयत्न महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद ' हाकारा 'च्या माध्यमातून सातत्याने गेली चार वर्षे करीत आहे. आदिवासींच्या सर्वांगीण विकासाचे कार्य एवढे मोठे व गुंतागुंतीचे आहे की, त्यासाठी केले जाणारे शासकीय प्रयत्न अत्यंत अपुरे आहेत. या दृष्टीने स्वयंसेवी संस्थांची भूमिका व कार्य अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. शासनालाही याची जाण अलिकडे येऊ लागली आहे ही बाब निश्चितच स्वागतार्ह आहे. सातव्या पंचवार्षिक योजनेमध्ये वीस कलमी कार्यक्रम व दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रमांच्या अंमलबजावणीमध्ये स्वयंसेवी संस्थांना सहभागी करून घेण्याचे नियोजन मंडळाने ठरविले आहे.

आपल्या देशामध्ये आदिवासींमधील स्वयंसेवी कार्याला फार मोठी परंपरा आहे. पू. ठक्करबाप्पा आचार्य भिसे, नानासाहेब ठकार, अंबरसिंग सुरतवंती, गोदुताई परुळेकर यासारख्या असंख्य ध्येयवादी व निरलस कार्यकर्त्यांनी या कार्याला वाहून घेतलेले आहे. आजही अनेक सुशिक्षित व आदिवासी तरुण गटागटाने दुर्गम आदिवासी भागात राहून समता व सामाजिक न्याय यावर आधारित नवसमाजनिर्मितीसाठी अखंड कार्यरत आहेत.

स्वातंत्र्यपूर्वकाळात राष्ट्रीय पुढारी स्वयंसेवी संस्थाद्वारा पुढे आले. म. गांधींनी संघर्ष व रचनात्मक कार्य बरोबरीने पुढे आणले. त्यांच्या रचनात्मक कार्यातून अनेक स्वयंसेवी संस्थांचा जन्म झाला. भारताच्या स्वातंत्र्यचळवळीचे जे एक वैशिष्ट्य आहे. स्वयंसेवी संस्थांचा उपयोग राजकीय पक्ष जनमानसावर आपला पगडा बसविण्यासाठी करण्याची शक्यता असते. त्यामुळे राज्यकर्त्यांना स्वयंसेवी संस्था नकोशा होतात. विरोधी पक्ष त्यातून आपला पाया मजबूत करतील असा धोका त्यांना वाटतो.

परंतु शासकीय यंत्रणेत काही दोष असतात. नियमांना प्राधान्य असते. प्रश्नांच्या सोडवणुकीपेक्षाही नियमांचे पालन महत्त्वाचे असते. शासकीय यंत्रणा व्यक्तिनिरपेक्ष असते. वास्तव परिस्थितीतील विविधतेचा विचार शासकीय यंत्रणा क्वचितच करते. विशेषतः आदिवासी जमातीत, गटात भिन्नता असते. तिचा विचार न झाल्याने शासकीय योजनांचा वापर विशिष्ट गट करतात व गरीब आदिवासी गरीबच राहतात.

## हितसंबंधाना प्राधान्य

निवडणुकीच्या राजकारणाला बरेच शिक्षित युवक कंटाळले आहेत. त्यांना रचनात्मक कार्य हवे आहे; पण त्याचा पक्षीय/राजकीय वापर होण्यास त्यांचा विरोध आहे. या स्वयंसेवी संस्था आपापल्या परीने गरीबांचे विविध प्रश्न सोडविण्याचे छोटे छोटे प्रयोग करीत आहेत. कोणत्याही विचारसरणीचे सरकार आले तरी त्यांना या प्रयोगांचा निश्चितच उपयोग होईल. अर्थात गरीबी दूर करणारे प्रयोग हे प्रस्थापित हितसंबंधांच्या विरोधात असणार हे उघडच आहे. अशा काही स्वयंसेवी संस्थांची माहिती व कार्यकर्त्यांचे अनुभव या अंकात दिले आहेत.

या अंकात काही इतर प्रश्नांकडेही लक्ष वेधण्यात आले आहे. आदिवासी भागात धरणे होतात, धरण भागातील आदिवासी व खेडुत विस्थापित होतात. त्या भागातील जंगल पाण्याखाली जाते. मात्र या धरणाचा फायदा त्या भागाला न मिळता दूरवरील भागाला मिळतो. या प्रश्नाच्या बाजूने श्री. बाबा आमटे यांच्यासारख्या समाजधुरीणांनाही उतरावे लागते. जंगल, धरण व आदिवासी यासंबंधीचे त्यांचे निवेदन बोलके आहे.

आदिवासींना राज्यघटनेने सवलती दिल्या त्या त्यांनी शक्य तेवढ्या कमी कालावधीत विकसित समाजाबरोबर वाटचाल करावी लागावी म्हणून पण या सवलतींचा गैरफायदा बरेच बिगरआदिवासी गट

(पुढील मजकूर पान ६४ वर)

# आदिवासींचा राजकीय पक्षांकडून इंधनासारखा वापर !

गडचिरोली जिल्ह्यातील वडसादेसाईगंज येथील जागृत आदिवासी संघटनेचे अध्यक्ष सुखदेव बाबू उईके यांची सविता तारे यांनी घेतलेली मुलाखत येथे देत आहोत—

**प्रश्न :** सुखदेवबाबू, 'हाकारा' त्रैमासिकाच्या वाचकांसाठी आपली मुलाखत हवी. आपली वैयक्तिक माहिती द्याल का ?

**उत्तर :** होय, आनंदाने ! आपल्या हाकारा त्रैमासिकाने आदिवासींसाठी चालविलेले प्रयत्न पाहता आपल्या हाकाऱ्यास साद देणे केव्हाही उचितच आहे.

माझा जन्म चंद्रपूर जिल्ह्यात मांगली येथे १९३४ साली झाला. माझे शिक्षण चिमूर, वरोडा व चंद्रपूर येथे झाले. चंद्रपूर येथेच बी. ए. बी. एड. पर्यंत शिकलो व सध्या देसाईगंज येथे माध्यमिक शाळेत पर्यवेक्षक म्हणून नोकरी करीत आहे.

**प्रश्न :** आपल्यास सार्वजनिक कामाची प्रेरणा कशी मिळाली ?

**उत्तर :** वडील जंगलखात्यात नोकरीस होते. मी ७ वीत असताना घर पडून, त्यात आई व इतर २।३ जण मरण पावले. वडिलांनी नारायणसिंग उईके यांच्या वसतिगृहामध्ये नेऊन ठेवले. नारायणसिंग स्वतः जातीने पहाटे मुले अभ्यास करतात किंवा काय, याकडे लक्ष देत व दर रविवारी मुलांचे बौद्धिक घेत. त्यांच्या शिकवणुकीतून अनेक कार्यकर्त्यांची जाणीव जागृत झाली. मीही त्यातच होतो.

**प्रश्न :** नारायणसिंग उईके यांच्याविषयी अधिक माहिती द्याल का ?

**उत्तर :** नारायणसिंग उईके हे विदर्भातील नागपूरच्या मॉरिस कॉलेजचे पहिले आदिवासी पदवीधर. त्यांनी सर्कल इन्सपेक्टर म्हणून ४।५ वर्षे काम केले पुढे या नोकरीत दम नाही, असे वाटल्याने न्यू इंग्लिश हायस्कूल मध्ये शिक्षकीपेशा स्वीकारला व आदिवासी सेवा संघ स्थापन केला. सुरुवातीस आदिवासी विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह सुरू केले. पुढे समाजवादी पक्षात सामील होऊन जनतेचे अनेक लढे लढवले. विदर्भातील आदिवासींचे ते लाडके व लोकप्रिय नेते होते.

**प्रश्न :** आपली सार्वजनिक जीवनातील पुढची वाटचाल कशी झाली ?

**उत्तर :** मी कलेक्टरकचेरीत १० वर्षे नोकरी केली. ब्रह्मपुरीस असताना, आदिवासी सेवा संघ स्थापन करून 'जयसेवा छात्रालय' सुरू केले. ( अजूनही ते चालू आहे. )

पुढे ब्रह्मपुरीस जंगलू गावडे नावाच्या आदिवासी शिक्षकाचा कॉंग्रेस पुढाऱ्याने खून केला. मी ते प्रकरण उचलण्याचा प्रयत्न केला व शोकसभेत भाषण केले. त्यामुळे ऑफिसने कारवाई केली. एक वर्ष नोकरीविना घालवले. पुढे आयुक्तांकडे अपील केले. त्यात विजय मिळाला व भद्रावतीस नेमणूक झाली; परंतु त्या एक वर्षाच्या बेकारीच्या काळात नारायणसिंग उईके यांच्याबरोबर फिरण्याचा योग आला. नारायणसिंग उईके नाग–विदर्भ आदिवासी मंडळाचे अध्यक्ष होते. मी सरचिटणीस म्हणून काम करीत होतो. साधारण १९६२ सालचा तो काळ होता. त्या वेळेपासूनच मी समाजवादी पक्षाचे कार्य करण्यास सुरुवात केली.

**प्रश्न :** आपण बऱ्याच निवडणुका लढविल्यात असे ऐकतो.

**उत्तर :** होय. सुरुवातीस दूरच्या यवतमाळ जिल्ह्यात राळेगाव येथून आदिवासी राखीव जागेतून विधानसभेची निवडणूक लढवली; परंतु मी तेथे नवीन असल्याने दारुण पराभव झाला. त्यानंतर १९६७ साली ब्रह्मपुरी येथून व १९७२ साली आरमोरी येथून विधानसभा–निवडणूक लढवली व त्यातही अपयश आले. १९८० साली इच्छा नसतानाही जनता पक्षाने जबरदस्तीने उमेदवारीअर्ज भरावयास लावला व ऐन निवडणुकीच्या काळात उमेदवारी मागे घेतल्याचे प्रसिद्ध केले. तेव्हापासून जनता पक्षाचा राजीनामा दिला.

त्यानंतर जागृत आदिवासी संघटना निर्माण केली. सध्या ह्या संघटनेचा तसेच बांधकाम व लाकूड काम-

गार संघटना यांचा मी अध्यक्ष आहे.

**प्रश्न : तुमच्या जीवनातील प्रमुख असे लढे कोणते?**

**उत्तर :** आमच्या भागात विशेषतः जमिनदारी व मालगुजारी क्षेत्र होते. जमीनदार आदिवासींना जागा संच पुठठ्याने देत व जमीन खेडावयास लावत. पुढे १९५० साली मालगुजारी रद्द झाली व हे आदिवासी अतिक्रमक ठरले. त्यांच्यावर कारवाया सुरू झाल्या. १९५८ पर्यंतच्या जमिनी नियमित करण्याचा आदेश आला; परंतु प्रत्यक्षात आदिवासींच्या जमिनी नियमित झाल्या नाहीत. त्यामुळे या भागात जबरनजोत आंदोलन जोरात झाले. १९६२ नंतर ब्रह्मपुरीस येऊन अतिक्रमणे नियमित करण्याचे काम केले.

–१९६० साली आदिवासींच्या समस्येवर नाग–विदर्भ आदिवासी मंडळाच्या वतीने नागपूर विधानसभेवर साठ हजार आदिवासींचा विराट मोर्चा नेण्यात आला.

–१९६५ सालच्या सुमारास समाजवादी पक्षाच्या वतीने कुरखेळ, भंडारा आदि भागांतून पायी निघून नागपूरपर्यंत 'समतामोर्चा' काढला.

–१९६७ साली भूमीसत्याग्रहात भाग घेतला व चंद्रपूर व अमरावतीच्या कारागृहात दीड महिना कारावास भोगला.

–जबरनजोत आंदोलत कृति समिती, जंगल बचाव, अवैध जंगलतोडीविरोधीचे आंदोलन व आदिवासींच्या अनेक प्रश्नांवर लढतोच आहे.

**प्रश्न : आपण राजकीय पक्ष सोडून स्वतंत्र संघटनेत काम करण्याचा निर्णय का घेतला? राजकीय पक्ष व संघटना यात आपण काय फरक कराल?**

**उत्तर :** नागपूरमध्ये एक आंदोलन सुरू होते. त्यात आदिवासी विरुद्ध कोष्टी बांधव असा लढा होता. त्यात असं दिसलं की, सर्वच्या सर्व राजकीय पक्षांनी आदिवासींच्या विरोधात काम केलं. अगदी तळागाळातल्या खऱ्या आदिवासींना न्याय मिळाला पाहिजे असं म्हणणाऱ्या रिपब्लिकन, जनता, भारतीय जनतापक्ष, भारतीय कम्युनिस्ट पक्ष काँग्रेसनेही. तेव्हा वाटायला लागलं, आदिवासींच्या समस्या वेगळ्या आहेत. इतर राजकीय पक्ष त्यांना इंधन म्हणून वापरून घेतात. खऱ्या संकटाच्या वेळी साथ देत नाहीत. तेव्हा आदिवासींची स्वतंत्र संस्था असावी असं वाटू लागले.

**प्रश्न : आदिवासींचे प्रश्न इतर समाजापेक्षा वेगळे म्हणता, ते कसे?**

**उत्तर :** आदिवासींचे वास्तव्य जंगलात व पहाडात आहे. त्यांच्या सांस्कृतिक जीवनाची बैठक इतर सर्वांपेक्षा वेगळी आहे. त्याच्यामुळे शोषणाला बळी पडण्याची प्रक्रिया सुरू राहते, त्याचमुळे त्यांचे शोषण मोठ्या प्रमाणात सावकार व जमीनदारांप्रमाणेच सरकार व राजकीय पक्ष यांनीसुद्धा केले.

उदाहरणादाखल, आदिवासीक्षेत्रात आदिवासींना शासकीय यंत्रणेपासून फार मोठ्या प्रमाणावर जुलूम सहन करावा लागतो. वेठबिगार बहुसंख्येने आदिवासीच मिळतात. असंघटित असल्यामुळे अन्याय–अत्याचाराला वाचा फोडण्याची कुवत त्यांच्यात नाही.

१९७७ पर्यंत अशी अवस्था होती की, विदर्भातल्या फक्त ५ तालुक्यांत रहाणारा आदिवासी हा आदिवासी म्हणून गणला गेला. इतर विभागात रहाणारा आदिवासी म्हणून गणलाच गेला नव्हता. (हे पाच तालुके चंद्रपूर जिल्ह्यात गडचिरोली व सिरोंचा, यवतमाळ जिल्ह्यात वणी व केळापूर, अमरावतीत मेळघाट. हे सर्व आदिवासी निसर्गावस्थेत रहाणारे, शिक्षणाच्या सोयी नाहीत. पाच तालुक्यांव्यतिरिक्त इतरत्र काही सवलती आदिवासींना नव्हत्या अनुसूचीत जाती व अन्य मागासवर्गीय जातींना सर्वत्र सवलती यामुळे आदिवासींना आर्थिक सुबत्ता मिळवण्याची संधीच नाकारण्यात आली. कितीतरी पिढ्या यामुळे मागे पडल्या.

**सध्या तरी शासन आदिवासीसाठी अनेक सोयी-सवलती जाहीर करीत आहे त्याबाबतचा अनुभव काय?**

सध्या शासनाचे आदिवासींबाबतचे धोरण पूर्वीपेक्षा भयानक आहे. उदा. शासन जे कायदे करते ते प्रचारी थाटाचे करते. निवडणुकांमध्ये आदिवासींची गठ्ठामते कशी मिळतील व त्यांचा ओघ शासनकर्त्या पक्षाकडे कसा राहील याचे तंत्र वापरतात. त्यामुळे सोय होण्यापेक्षा त्यांचे शोषण मोठ्या प्रमाणावर सुरू झाले आहे. उदाहरणादाखल– १९७५ साली आदिवासी जमीन हस्तांतरणाचा कायदा होऊनही आज १० वर्षे होऊनही ९५% प्रकरणे उच्च न्यायालयात गेल्याने अडकून पडली आहेत. त्यामुळे कायद्याचा आदिवासींना फायदा नाही. त्यामुळे लाखमोलाची मालमत्ता असली तरी संकटाच्या वेळी बाजारात मूल्य राहिले नाही. विक्रीची मुभा नसल्याने गहाण ठेवून कर्जाची सोय नाही. आदि-

वासी मोठ्या प्रमाणात सेवा सहकारी संस्थांचे पंचायतसमिती, सहकारी बँकांचे कर्ज परत करू शकले नाही म्हणून डिफॉल्टर आहेत. आदिवासींच्या जमिनी लुबाडल्या जाऊ नयेत हा उद्देश असला तरी पर्यायी व्यवस्था नसल्याने शेतीचा विकास कसा करायचा हा प्रश्न पडला आहे.

आदिवासी विकास महामंडळ त्यांच्या वस्तू खुल्या बाजारापेक्षा कमी भावात खरेदी करत आहे. महामंडळाकडून मालाची वेळेवर किंमत मिळत नाही पैसे चुकते होण्यात दिरंगाई यामुळे खेड्यापाड्यांत जंगलात आजही व्यापारी दलाल बार्टर (देवघेव) पद्धतीने त्यांचे शोषण करीत आहेत आश्रमशाळा सुरू करून त्यावर लाखो रुपये खर्च होऊनही मुलांना खायला नाही, तर मुलींवर बलात्कार असले प्रकार चालूच आहेत. ट्रायबल सब प्लॅन लागू झाल्यापासून शासनाने ज्या सोयी उपलब्ध करून दिल्या त्या त्यांना योग्य प्रमाणात मिळत नाहीत तसेच जे आदिवासी ट्रायबल सब प्लॅन विभागात रहात नाहीत त्यांना सरकारने लागू केल्या नसल्याने या सोयी–सवलतींपासून त्यांना वंचित रहावे लागते. त्यामुळे आज पुन्हा १९७७ पूर्वीची कृत्रिम क्षेत्रबंधनाची व्यवस्था लागू करण्यात आली आहे. या योजनेचा शासकीय खर्च व्यवस्थापनावर जास्त होतो तर प्रत्यक्ष आदिवासी विकासावर फारच कमी.

**या सर्व अन्यायाला ठिकठिकाणच्या छोट्या संघटना कशा तोंड देणार ?**

या सर्व संघटना इतक्या कमजोर व असंघटीत आहेत की शासकीय दबावप्रक्रियेला त्या तोंड देऊ शकत नाहीत. आदिवासी कार्यकर्त्यांवर खोट्या केसेस भरून त्यांना छळण्यात येत आहे व कार्य करण्यास अडथळा निर्माण केला जातो. या सर्व संघटनांचा समन्वय होणे आवश्यक आहे.

**आदिवासींत प्रभावी संघटन न होण्याचे कारण काय होऊ शकते.**

आदिवासींमधील जे तरुण शिकतात ते नोकऱ्या–चाकऱ्यांत जाऊन पांढरपेशे बनतात. त्यांचा व आदिवासींचा संबंध तुटतो. बहुसंख्य अशा आदिवासी कार्यकर्त्यांना असे वाटते की सरकार कितीही विरोधात वागले तरी शासकीय पक्षाच्या बरोबर राहिल्याने व्यक्तीगत विकास साधता येतो आमदारपद, कमिट्यांवर नेमणूक आदी प्रलोभने यांनी ही भावना जोपासली गेली आहे व ह्या कार्यकर्त्यांनी लोकांची अशी दिशाभूल केली की शासनच आपले भले करू शकते, यामुळे आदिवासी परावलंबीत झाल्याने तो निष्क्रीय झाला. कुणीतरी काही तरी आमच्यासाठी करावे अशी भावना बळावत चालली आहे. त्यामुळे सामूहीक विकासासाठी अन्यायाविरुद्ध संघर्ष करण्याची प्रेरणाच हा समाज घेताना दिसत नाही. सामाजिक जाणीव ही अजूनपर्यंत तरी आदिवासी समाज व कार्यकर्ते यांच्यात पहायला मिळत नाही

स्वत:पुरतं पहाण्याची वृत्ती बळावत चालली आहे. यामुळे आदिवासींचे प्रभावी संघटन झाले नाही.

**सरकारच्या विरोधात राहिल्याने प्रश्न सुटेल असे आपणास वाटते का ?**

आदिवासींच्या असंघटित व मागासलेपणामुळे गैर आदिवासी खोटी प्रमाणपत्रे घेऊन सवलती बळकावतात, त्यांना शासकीय अधिकारी मदत करतात. सध्या असे वाटायला लागले आहे की शासन नावाची यंत्रणाच ग्रामीण भागात निष्क्रीय झालेली आहे. कुठलीही समस्या शासनाकडे सादर केली तरी शासनाकडून कुठलाही प्रतिसाद मिळत नाही हा अनुभव यायला लागला. शासनाबाबत जो एक दुबळ्यांचे रक्षणकर्ता सरकार असले पाहिजे ही भावना आता लुप्त होत आहे सरकार हे आदिवासींचे भांडवलदारांसारखे शोषण करणारे आहे ही भावनाच आदिवासींत मूळ धरत आहे.

सरकारच्या विरोधात रहाणे की बरोबर रहाणे हा आदिवासींच्या बाबत प्रश्नच असू शकत नाही. आदिवासी कार्यकर्त्यांनी शासनाच्या चांगल्या योजनांचा पाठपुरावा करणे व त्या योजनांचे अंमलबजावणीसाठी कार्य करणे हे योग्य होईल. सरकारच्या अन्यायी धोरणामुळे आदिवासींच्या विकासांत धोंड निर्माण करणाऱ्या कारवायाविरुद्ध संघटीतपणे कार्य करणे वेळ पडल्यास संघर्ष करणे हे आदिवासी कार्यकर्त्यास गरजेचे आहे.

सरकार शेवटी कोणतेही असले तरी त्याची भूमिका ही विश्वस्ताची असते. हे विश्वस्त जे कोणी सत्तेवर असतील त्यांच्या विचारावर ज्या प्रेरणांचा व विचारांचा प्रभाव असेल त्या पद्धतीने शासन यंत्रणा राबवणार, ह्यामध्ये जशा काही समाजाच्या फायद्याच्या बाबी प्रशासन राबवील तशा काही नुकसानीच्या बाबीही राबविल. तेव्हा योग्य अशा धोरणांचा, कार्य-

क्रमांचा पांठपुरावा होणे तसेच अन्यायाचा प्रतिकार होणे हेही आवश्यक आहे.

उदाहरणार्थ–वीस कलमी कार्यक्रमाखालील किमान वेतन, कर्जमुक्ती, वेठबिगारनिर्मुलन, वनीकरण ग्रामीण रोजगार या सर्व बाबींची अंमलबजावणी आदिवासी क्षेत्रात होत नाही हा सरकारचा कार्यक्रम असूनही शासनकर्त्यांपक्षाचे कार्यकर्ते ह्यांनाही ह्यासाठी काही करावेसे वाटत नाही. तेव्हा लोकांनीच संघटितपणे काही तरी करणे आवश्यक आहे

सरकार शत्रु कि मित्र ही भावना ठेवण्यापेक्षा सरकारने चांगले करावे. तळाच्या माणसाला न्याय द्यावा. ह्यासाठी वेळप्रसंगी संघर्ष झाला तर शासनाने आदिवासींना शत्रु मानणे हे गैर आहे.

**तुम्ही काम करीत असताना येणाऱ्या प्रमुख अडचणी कोणत्या ?**

आदिवासींसाठी काम करीत असताना बाहेरील राजकारणी व्यक्तीपेक्षा शासनकर्त्या पक्षाच्या आदिवासी स्थानिक आमदारांकडून फार मोठ्या प्रमाणात व्यक्तीगत जुलुम सुरू आहे. अधिकारी लोकांना हाताशी धरून माझ्यावर दोन खोटे फौजदारी खटले रचले आहेत. ते सध्या चालू आहेत. आणखी अशा खटल्यांत कशा पद्धतीने गोवता येईल त्याचे सतत प्रयत्न चालू असतात. तसेच मी शिक्षक–पर्यवेक्षक म्हणून काम करीत असताना सरकारने माझी नोकरी हिसकावून घेऊन मला उपासमारीला तोंड द्यावे लागून ह्या कार्यक्रमांतून मी बाहेर पडावे अशा प्रयत्नात शिक्षण खाते, मंत्री ह्यांचेकडे खोटेनाटी आरोपपत्र पाठवली जातात. नुकतेच माझ्या एकट्यासाठी सर्व शिक्षकांचा पगार अडकवून ठेवला आहे. मी आदिवासींत जाणीव जागृती करतो म्हणून मला नक्षलवादी ठरवण्याचे रेकॉर्ड करण्याकरीता ठाणेदारांवर दडपण आणण्यात येत आहे.

**शासनकर्त्या पक्षाच्या आमदाराचा आपल्याला नामशेष करण्याचा जो प्रयत्न चालू आहे त्यामुळे हे काम करताना आपणास भिती वाटत नाही का ?**

भिती वाटण्याचे काही कारण नाही. समाजामध्ये खरी दिशा देण्याचे काम कुणी तरी केलंच पाहिजे त्याशिवाय समाजाला दिशा मिळणार नाही. त्यासाठी काही वैयक्तिक मोल द्यावे लागले तर त्याचा आनंदाने स्वीकार करण्याची भूमिका घेऊनच ह्या कामाला सुरुवात केली आहे.

**–सविता तारे**
**वडसा देसाई**
**( गडचिरोली )**

# चुकत चुकत शिकायला मिळतं

**प्रदीप गायकवाड**

मराठवाड्यातील एका छोट्याशा खेड्यात जन्मलेला मी माझ्या आई–वडीलांनी मोठ्या जिद्दीने आणि कष्टाने मला शिकविले. मला नोकरी करून घरी मदत करावी लागणार होती; पण नोकरी कशा पद्धतीची मिळावी हे मनात नक्की ठरत नव्हते. नोकरीची तीव्र गरज असूनही नोकरीची ओढ नव्हती ! मग पोट कसे भरणार ? शालेय जीवनापासून नाटक व गाण्याचे वेड सोबत होते, वाटत होते, आपण कलेच्या क्षेत्रातच पडावे. त्याच क्षेत्रात वावरत होतो. पण पदवीधर स्वयंसेवी योजना मुंबई विद्यापीठात सामाजिक कृती अभ्यास करण्याची संधी मिळाली आणि जीवनाच्या प्रवाहाला वेगळे वळण लागले. आता थोडेसे विचार बदलले. जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला. सामाजिक कार्य करण्याची आवड निर्माण झाली. याच काळात एका शहरी आणि मध्यमवर्गीय मुलीशी गाठ पडली. विचार एक झाला आणि सामाजिक कार्याच्या प्रेरणेतून आमचा विवाह झाला.

मनात ठरविल्याप्रमाणे १९७८ पासून रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यात एका छोट्याशा आदिवासी खेड्यात राहून कमी संस्थेच्या माध्यमातून आमच्या सामाजिक कार्याला सुरुवात झाली.

सामाजिक कार्य करण्यासाठी मनात अपार उत्साह, जिद्द, गरिबीची जाणीव असल्याने आपुलकी, काय करू आणि काय नाही असे झालेले; पण नेमके काय करायचे व कसे ? याचे सुसंगत उत्तर नव्हते. मनात काही गोष्टी पक्क्या होत्या. गरीब, अडाणी, भोळा पिळलेला आहे. भांडवली लोक त्यांचे शत्रू आहेत, पुढारी लोक त्याला अंधारात ठेवत आहे आणि आता मी गरिबाचा कैवारी आहे, सर्व गरीब माझ्या पाठीशी आहेत. अशा गृहीत तत्त्वावर आणि भावनेवर कामाची सुरुवात केली.

सुरुवातीच्या २ वर्षांत सर्व ठीक होते. छोट्या–मोठ्या बैठका व्हावयाच्या. त्यातून काही कार्यकर्ते तयार होत होते. लोकांपेक्षा जास्त मीच बोलायचो, लोक ऐकायचे, समाधान व्यक्त करायचे, निर्धार दाखवायचे; पण त्यांचे मन त्या वेळी मी जाणू शकलो नाही. त्यांची कुवत माझ्या लक्षात आली नाही. गरीब अडाणी, भोळा नाही, तो हुशार आहे, चलाख आहे; परंतु तो परिस्थितीमुळे गप्प आहे. त्याला कळतं पण वळत नाही. म्हणूनच सर्व गरीब माझे विचार मान्य करीत नव्हते हे कळायला मला वेळ लागला. त्या वेळी आमच्या पुढे प्रश्न होते १) सावकारी विरुद्ध लढा २) रोजगार ३) दारूबंदी.

## शेतीच्या उत्पन्नावरच सर्व व्यवहार

या भागात आदिवासी कोळी, ठाकूर व कातकरी मोठ्या प्रमाणात राहतात. महादेवकोळी ही जमात त्यातल्या त्यात सुधारलेली म्हणजे हिंदू संस्कृतीत मिसळलेली. ठाकूर व कातकरी जास्त मागासलेले, अशात कातकऱ्यांची वस्ती फारच कमी आणि तेही वर्षाचे सहा महिने कामानिमित्त बाहेरगावी जाणारी. ठाकूर ही ह्या भागातील संख्येने मोठी जमात. आदिवासी हा मूलत: जंगलावर अवलंबून असलेला पण परिस्थितीमुळे तो बदलत गेला. जंगल कमी होत गेले आणि त्याला नाईलाजाने शेतीकडे लक्ष द्यावे लागले. साधारण शेतीचे प्रमाण ३ ते ४ एकर प्रत्येकी आहे. त्यात एक पीक देणारी जमीन भात. नागली व वरी ही येथील प्रमुख व एकमेव पिके. शिवाय कॅश क्रॉप नाही, त्यामुळे या भागातील लोकांना सर्व व्यवहार याच उत्पन्नावर करावे लागतात.

एकरी उत्पन्न ५ ते ६ क्विंटल, त्यामुळे ते कसे-बसे ७–८ महिने पुरते. त्यानंतर येथील माणसांना हात मजुरीवर पोट भरावे लागते. जेव्हा पावसाळा येतो, तेव्हा घरात अन्न नसते आणि शेती तर लावायची असते. तशात स्वत:चे बैल नसतात. येथील शेतकऱ्याला बैल ठेवणे परवडत नाही. कारण एक महिन्याच्या कामासाठी २००० रुपयांचे बैल ठेवणे त्याला जमत नाही; पण इथे बैल मिळण्याची पद्धत आहे. तिला 'बैल-वाफ्याने मिळणे म्हणतात. (बैल भाड्याने मिळणे) अशा कामासाठी काही लोक बैल भाड्याने देतात. एका बैल-जोडीला ६ मण भात भाडे म्हणून द्यावे लागते. (२४० किलो भात) शिवाय सहा महिने बैल सांभाळावे लागतात. अशा प्रकारे बैलांचा प्रश्न सुटतो. आता प्रश्न उरतो स्वतःच्या खावटीचा! तीही ह्या भागात सोय आहे. तिला मणकी पद्धत म्हणतात. एक गोण आट्याची घेतल्यास ( ७० किंवा ९० किलो गव्हाचे पीठ ) त्या बदल्याचे ७ मण भात द्यावे लागते. ( २८० किलो भात ) वरील सर्व परिस्थिती पाहिल्या नंतर आदिवासी हा शेती– त्यातील उत्पन्न– कर्जफेड या चक्रात गुंतलेला आहे हे स्पष्ट दिसते.

वरील सावकारी पद्धत पाहिल्यानंतर मुळातच माझा सावकारपद्धतीवर असलेला राग उफाळून बाहेर आला आणि मग स्पष्टपणे त्या लोकांचा धिक्कार करू लागलो. हे पाहून लोक खुष होते, कुणी तरी आपल्या मनातले, आपल्याला न जमणारे बोलून दाखवीत आहे. पण त्याच्या मनात एक वेगळीच भीती होती. हा बोलतोय खरे; पण उद्या आमचे काय ? आमची शेती कशी लागणार ? आम्हाला कर्ज कसे मिळेल ? म्हणून लोक दोन्ही संबंध तोडत नव्हते. जेव्हा ते सावकाराकडे जात, तेव्हा ते आपला सावकारी संबंध तुटू नये म्हणून माझ्याविषयी टिकात्मक बोलत. 'आम्ही काय वेडे आहोत त्याचे ऐकायला शेट' वगैरे बोलून सावकाराला खूष ठेवत.

ह्या परिस्थितीत माझी विचित्र अवस्था झाली. कारण माझ्या स्पष्ट बोलण्यामुळे मी भांडवली लोकांच्यात विरोधी झालो आणि लोक मात्र तटस्थ होते. अशा वेळी मी एकटा–एकटा वाटायला लागलो. मनाला खूप त्रास झाला; पण मार्ग सापडला. लोकांना पैशाची गरज आहे. पैसा मिळण्याचा त्यांना एकच मार्ग आहे ( सावकारी कर्ज ). त्याच्याशिवाय त्यांना पर्याय नाही. हा समंध एकाएकी तुटणे अशक्य आहे. फक्त प्रश्न आहे जास्त व्याजाचा. हे जेव्हा मला उमगले, तेव्हा ह्या प्रश्नावरील कडक धोरण बाजूला ठेवून पायरी–पायरीने जायचे ठरविले. बँकेचे कर्ज आणि गावकी फंड यांचा उपयोग केला आणि परिणाम बरा झाला.

## काम करण्याच्या मर्यादा

आदिवासींचे अर्धे जीवन रोजगारावर अवलंबून आहे. त्यांना कामसुद्धा निश्चित व शाश्वत नाही. योगायोगाने मिळत जाणारे काम तो करतो. त्यांच्या

काम करण्याच्या काही मर्यादा आहेत, त्याला खडी फोडणे आवडत नाही, खोदकामात त्याला विशेष आवड नाही, कातकरी–जमात सोडली तर इतर आदिवासींना कामासाठी लांब जाणे आवडत नाही. (बायकापोरांना घरी ठेवून) त्यांना जंगलातील काम आवडते; पण दुर्दैवाने जंगलात फक्त झाडे तोडायचेच काम मोठ्या प्रमाणात असल्याने त्यात तो रस घेतो. सुरुवातीच्या दिवसांत लोकांना काम मिळावे म्हणून आम्ही प्रयत्न केला. लोकांनाही काम हवे होते. काम मिळाले तेव्हा कामाला कोणी येईना. माझ्यापुढे मोठा प्रश्न पडला. कामाची गरज असूनही लोक कामाला का येत नाहीत? आज मला माहीत आहे, त्यांना न आवडणारे काम ते करू शकत नाहीत आणि जेव्हा घरात अन्न आहे तेव्हा ते कामाला जाण्यापेक्षा शिकारीला जाणे त्यांना आवडते.

'दारू.' दारूविषयी सर्वजण बोलतात. मग मी का बोलू नये? सरकार, पुढारी, कार्यकर्ते सर्वजण दारूविषयी बोलतात; पण संध्याकाळी बरेचजण दारूचे चवीने घोट घेताना दिसतात. दारूविषयी आदिवासी मात्र बदनाम केला गेला आहे असे मला वाटते. 'आदिवासी सुधारत नाही तो दारूमुळे' असा शिक्का मारून बहुतेक मोकळे होतात. 'जोपर्यंत आदिवासीची दारू सुटत नाही, तोपर्यंत आदिवासी सुधारू शकत नाही.' असे सांगणारेही काही महाभाग आहेत. मीही त्यातलाच एक. सरकारच्या दारूविषयक धोरणाबद्दल बोलायलाच नको. एकीकडे दारूचे शिथिल धोरण आणि एकीकडे दारूबंदीखाते चालूच, म्हणजे एका तोंडाने सांगायचे दारू पिऊ नका आणि दुसऱ्या तोंडाने सांगायचे हा एवढा एक ग्लास पिऊन बघा, परवाना दुकानातला आणला आहे–मला माहीत आहे आदिवासी लोक दारू पितात (हे प्रमाण ९० टक्के आहे) आदिवासींना एवढाच एक मोकळेपणा आहे. आपल्या भाषेत एवढाच चेंज. आदिवासी दारू घेतो; पण दारुड्यांचे प्रमाण कमीच आहे. हजारात पाच दारुडे मिळतील, बाकी सर्व दारू पिणारे!

आपणासाठी एक घटना सांगतो. एक दारुड्या, मतदानाचा दिवस, सकाळी मतदान करतो. खास मतदानाकरिता सोय म्हणून ठेवलेली भरपूर दारू घेतो. परत दुपारी मतदानकेंद्रावर येतो. तेथील पोलीस व इतर सर्व अधिकाऱ्यांशी अधिकाराने भांडतो. कुणालाही तो आवरत नाही. तो मोठ्याने विचारतो, 'का रे? आज तुम्ही आम्हाला दारू प्यायला देता आणि उद्या आम्ही स्वतःची दारू पितो तर आम्हाला दारुड्या म्हणून हाकलून देता!'


मलाही वाटायचं आदिवासींची दारू सुटली पाहिजे. गावात दारुबंदी व्हायला पाहिजे. मग काय? मी सांगे दारू विष आहे, दारूमुळे संसाराची वाट लागते आणि दारूवरील एखादे गाणे. झालं, लगेच निर्णय, दारू पिऊन मीटिंगला येईल त्याला ५० रु. दंड. गावात दारू बनवायची नाही आणि मग दारूच्या मडक्यांची होळी. हे सर्व सर्वांच्या मताने झटापट घडलं; पण दारू काही सुटली नाही. लोक दारू मोकळेपणाने पीत होते, ती लपूनछपून पिऊ लागले. त्यामुळे दोन गट निर्माण झाले; दारू पिणारे आणि दारू न पिणारे. 'संघटना ही आमच्यासाठी नाही. कारण–आम्ही दारू पिणारे आहोत.' असे मत दारू पिणाऱ्यांमध्ये झाले व ते आमच्यात मिसळणासे झाले. हे सर्व समजायला मला वेळ लागला; पण जेव्हा समजले तेव्हा ह्याविषयी मी बोलणेच बंद केले. माझं स्पष्ट मत आहे की, आदिवासीची दारू सुटणे हा प्रकारच वेगळा आहे. ती सोडण्यासाठी कुणी तसा प्रयत्नच करू नये; पण दारूविषयी मोकळे वातावरण ठेवल्यास त्यात फरक पडतो.

## त्यांच्यात मिसळायला हवं

माझी अशी कल्पना होती, आपण ज्यांच्याबरोबर काम करू त्यांच्याबरोबरच राहून काम करावे. त्यामुळे लोकांत विश्वास निर्माण होईल आणि त्यांच्यात नीट मिसळता येईल. 'हे कार्यकर्ते काहीही सांगतील म्हणून आपण ते मानायचेच का? हे आज आहेत उद्या नाहीत, उद्या आम्हालाच इथे राहायचे आहे.' हे लोकांचे बाहेरून येणाऱ्या कार्यकर्त्याविषयी उद्‌गार. हे ऐकले आणि मनात पक्का विचार केला, आपण इथेच कायम राहून काम करायचे. लोकांबरोबर आपले जीवन घालविण्यात एक वेगळा अनुभव आहे. आपण लोकांत पूर्णपणे मिसळतो; पण त्यामुळे कामावर काही मर्यादा पडतात, काही समस्या निर्माण होतात. आपण जिथे कायम राहण्यास सुरुवात करतो तेथे आपले हितसंबंध निर्माण होतात आणि

पृष्ठ ५५ वर

# जंगल, आदिवासी आणि धरण



**मोहन हिराबाई हिरालाल**

पर्यावरण संतुलनाकरिता भारताच्या एकूण जमिनी-पैकी किमान ३३ टक्के जमिनीवर जंगल असणे अत्यावश्यक आहे; परंतु प्रत्यक्षात काय स्थिती आहे? जंगलविभागाच्या आकडेवारीनुसार देशाच्या एकूण जमिनीपैकी २३ टक्के जमीन वनविभागांतर्गत आहे. ही आकडेवारी दिशाभूल करणारी आहे. वरील विधा-नाचा एवढाच अर्थ होतो की, वनविभागाचा अधिकार इतक्या जमिनीवर आहे.

प्रत्यक्षात त्या जमिनीवर जंगल असेलच असे नाही. १९८१ साली सेंट्रल फॉरेस्ट बोर्डासमोर बोलताना या देशाच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी स्वतःच मान्य करून टाकले आहे की, जंगलविभागाच्या अधि-कृत जमिनीपैकी अर्ध्या जमिनीवरच फक्त काय ते जंगल प्रत्यक्षात आहे. अलीकडेच आलेल्या राष्ट्रीय पर्यावरण नियोजन अहवालमध्येही स्पष्ट म्हटले आहे की, प्रत्यक्षात एकूण देशाच्या फक्त १२ टक्के जमिनी-वरच आज जंगल उभे आहे, १९५१ ते ७२ झालेल्या एका अभ्यासानुसार दरवर्षी देशात १,५५,००० हेक्टर्स (एक लक्ष पंचावन्न हजार हेक्टर) जंगल निरनिराळे धरणप्रकल्प, रस्ते, उद्योगधंदे, शेती व इतर कारणां-करिता कापून नष्ट केले जात आहे, भारतीय अंतरिक्ष शोध संस्थानाने अंतरिक्षातून केलेल्या एका सर्वेक्षणात असे आढळून आले की, अनंतपूर जिल्हा, आंध्रप्रदेश-मधील अनेक आरक्षित वनात झाडेच नाहीत.

या राष्ट्रीय पार्श्वभूमीवर चंद्रपूर व गडचिरोली या नैसर्गिक वनसंपत्तीने समृद्ध म्हणून नावाजलेल्या जिल्ह्यांमध्ये काय परिस्थिती आहे ते बघणे उद्बोधक ठरेल. भद्रावती डिफेंस प्रोजेक्टकरिता २५२० हेक्टर्स, निर्वासित पुनर्वसनाकरिता ८५७४ हेक्टर्स, फॉरेस्ट डेव्हलपमेन्ट कार्पोरेशनकरिता १९७७ पर्यंतच ५०४ चौ. किलोमीटर शिवाय ३ सिमेन्ट फॅक्टऱ्या व औष्णिक वीजकेंद्र याकरिता हजारो हेक्टर नैसर्गिक वनसंपत्तीची अक्षरशः कत्तल करण्यात आली आहे. शिवाय बल्लार-पूर पेपरमिल व इतर वनआधारित उद्योगांना कच्चा माल पुरविण्याकरिता उद्योगपतींनी तसेच नगदी नफ्याला चटावलेल्या धनदांडग्या जंगलठेकेदार व टोळक्याने केलेले जंगल-बलात्कार वेगळेच आणि हे सर्व कमी झाले म्हणून आता शासन गडचिरोली जिल्ह्याच्या आदिवासी जंगलपट्ट्यामध्ये एक-दोन नव्हे तर १७ धरणप्रकल्प उभारून प्रचंड जंगलतोड करणार आहे. नव्हे त्या नावावर अशी तोड सुरूही झालेली आहे. इंचमपल्ली धरणाकरिता १९५९३ हेक्टर्स, भोपालपट्टनम्‌करिता १९०१३ हेक्टर्स, शिवाय तुलतुली, कठाणी, सातनाला व कारवाफा इ. प्रकल्पा-करिता आणखी हजारो हेक्टर्स नैसर्गिक वनसंपत्ती नष्ट करण्याची योजना आखण्यात आली आहे. अशा धरणप्रकल्पाकरिता आवश्यक प्रत्यक्ष जाहीर क्षेत्रफळा-पेक्षा किती तरी जास्त भागातून अवैध जंगलतोड करण्यात येते. हा जुना अनुभव लक्षात घेता हे सर्व प्रकल्प झाल्यास प्रत्यक्षात लाखो हेक्टर्स नैसर्गिक वन-

संपत्ती नष्ट होऊन भावी पिढीचे स्मशानरूपी वाळवंट तयार करणारीच ही योजना आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही.

## जंगलाचे महत्त्व

मानवी शरिरांकरिता जितके हृदय, फुप्फुसे व मूत्रपिंड यांचे महत्त्व आहे तितकेच निसर्ग संतुलनाकरिता जंगलाचे महत्त्व आहे. जंगले विविध प्रकारे पर्यावरण-संतुलनाचे काम करीत असतात. ते वातावरणातील तपमान नियमित करतात, त्यांच्यामुळे पाऊस पडतो, ते भूक्षरण व जमिनीचे वाळवंटीकरण थांबवितात. पूर व वादळी वारे नियंत्रित करतात. हवेतील प्राणवायु, कर्बाम्लवायू व इतर वायूंचे प्रमाण योग्य राखतात. शिवाय आकाशातून पडणारे पाणी जमिनीत योग्य प्रकारे जिरवून भूगर्भातील पाण्याचे साठे सुरक्षित ठेवतात. ते सौरशक्ती आणि जीवसृष्टी यातील महत्त्वाचा दुवा असून निसर्गातील शक्तिप्रवाह व अन्नसाखळी कायम ठेवण्याचे महान कार्य करीत असतात. नैसर्गिक जंगले नष्ट होण्याने ही संपूर्ण प्रक्रियाच खंडित होते. इकडे–तिकडे काही झाडे लावून नैसर्गिक जंगल नष्ट झाल्याने झालेली हानी भरून निघू शकत नाही. नैसर्गिक जंगलातील एक झाड म्हणजे फक्त एकटे नसते तर त्या सोबत आणखी किती तरी वनस्पती, प्राणी, पशु, पक्षी व कीटक त्यांच्या आश्रयाने जगत असतात. अशा झाडांचा नाश म्हणजेच या सर्व वृक्षवंशांचा व प्राणिवंशांचा आणि पर्यावरणाचा नाश. नैसर्गिक वनाचा नाश करून मनुष्य स्वतःच्याच हाताने स्वतःच्या पायावर कुऱ्हाड मारून घेत आहे.

## वंशविच्छेदनाचा धोका

आदिवासी किंवा वनांवर आधारित जीवन जगणारे मानव आणि निसर्गाच्या सामंजस्यपूर्ण सहअस्तित्वाची प्रतीकेच आहेत. आदिवासी हा फक्त अन्न, वस्त्र, निवारा इ. भौतिक गरजांकरिताच फक्त जंगलावर अवलंबून नसून जंगल ही त्याच्या सांस्कृतिक अस्तित्वाकरिताही अत्यावश्यक बाब होय. जंगलाच्या सोबतीनेच आदिवासींची इतर समाजापेक्षा वेगळी अशी वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती टिकून राहिली व जोपासली गेली आहे; परंतु आज ही जंगलेच नष्ट होत असल्यामुळे व त्याचे सांस्कृतिक वेगळेपण लक्षात न घेता आखलेल्या विकासयोजनेमुळे विकासाच्या नावावर आदिवासींच्या सांस्कृतिक वंशविच्छेदनाचा धोका निर्माण झालेला आहे. तो वेळीच ओळखून योग्य उपाययोजना न केल्यास सर्वनाश अटळ आहे !

ज्या ज्या ठिकाणी या पूर्वी विकासाच्या नावावर जंगल नष्ट करून आदिवासीला त्याच्या नैसर्गिक पर्यावरणांपासून वंचित करण्यात आले तिथे काय झाले ते बघितल्यास प्रश्नांची भयानकता सहज लक्षात येऊ शकेल. विविध खाणी आणि मोठे उद्योगप्रकल्प यांनी उध्वस्त झालेल्या दक्षिण बिहारचा धनबाद, जमशेदपूर भाग असो की, विभिन्न धरण उद्योग-प्रकल्पामुळे उजाड झालेला ओरिसाचा कालाहंडी जिल्हा असो तेथील आदिवासी सामूहिकरित्या त्याच्या सांस्कृतिक जीवनातून उखडला जाऊन देशोधडीला लागला आहे. नवीन संस्कृतीत वाटेल त्या कमी किमतीत श्रमायला तयार असलेले मानवी मशीन व तथाकथित सुधारलेल्या समाजाच्या लैंगिक भुका शमविणारे लाचार शरीर एवढेच स्थान त्याच्या वाटचाला येते, हे सिद्ध झालेले आहे.

आदिवासींची वसतीस्थाने निसर्गतःच वन आणि खनिजांनी समृद्ध असल्यामुळे बाहेरील समाजाकरिता त्या वसाहतीच ठरत आहेत. ब्रिटिशांनी भारताचे केले तसेच शोषण आदिवासी विभागाचे करून बहुसंख्य समाज स्वतःचा तथाकथित विकास साधू इच्छित आहे. स्वतःच्या तथाकथित आर्थिक विकासासाठी एका मानवी समूहाला दुसऱ्या मानवी समूहाचा सांस्कृतिक वंशविच्छेद करण्याचा अधिकार आम्ही मान्य करतो काय ? या मूलभूत प्रश्नाचे उत्तर आम्हाला द्यावे लागणार आहे.

गडचिरोली जिल्ह्यात हाच प्रश्न आज उपस्थित झालेला आहे. इंचमपल्ली, भोपालपट्टणम् व इतर धरण-प्रकल्प, तसेच सुर्जागढ येथील प्रचंड लोहखनिज साठे यामुळे विकासाच्या नावावर जे उद्या येथे घडणार आहे ते काल धनबाद, जमशेदपूर, कालाहांडी व बैलाडीला येथे घडले आहे. निसर्गावर आधारित एका वैशिष्टयपूर्ण मानवीवंशाचे सांस्कृतिक वंशविच्छेदन करून, संपूर्ण मानवजातीकरता हानिकारक असे पर्यावरण असंतुलन निर्माण करून, संपूर्ण मुठभरांच्या आर्थिक प्रगतीकरिता आदिवासी विभागाचे वसाहतिक शोषण करून आम्ही कोणाचा व कोणता विकास (?)

साधणार आहोत ? याचा जर आम्ही आज विचार केला नाही तर कदाचित आम्ही 'बळी तो कान पिळी' न्यायाने आज निसटून जाऊ; परंतु येणारा काळ आम्हाला क्षमा करणार नाही. असे करून आम्ही स्वत:ची कबरच खोदीत आहोत एवढे मात्र निश्चित.

## कोणाचा विकास ?

आज धरणं म्हणजे प्रचंड फायदा व प्रचंड धरणं म्हणजे प्रचंड विकास असे काहीसे विचित्र आणि दुर्दैवी समीकरण रूढ झालं आहे.त्यानुसार अनेक प्रचंड धरण-प्रकल्प योजले गेले आहेत, योजले जात आहेत; परंतु आता प्रश्न विचारावयाची वेळ आली आहे की, हा ' विकास ' खरोखरचा किती ? कोणाचा ? कोणाच्या जिवावर ? व काय किंमतीला ? जगात सुरू असलेल्या वैज्ञानिक संशोधनातून उपलब्ध निष्कर्षांच्या आधारे या प्रश्नांचे उत्तर शोधणे आज शक्य आहे.

असे गृहीत धरले जाते की, जलशक्तीपासून होणारी विद्युत्‌निर्मिती ही इतर कोणत्याही शक्ति—ऊर्जेपासून होणाऱ्या विद्युत निर्मितीपेक्षा अधिक किफायतशीर असते. तसेच, महापूर, दुष्काळ आणि ऊर्जाटंचाई या तीन गंभीर प्रश्नांवर धरणे बांधणे हा एकच तोडगा आहे, हे गृहीत मुळातच खोटे ठरले आहे. विद्युतनिर्मिती उत्पादनखर्च काढतांना धरणामुळे नष्ट झालेले जंगल व उध्वस्त झालेले आदिवासींचे जीवन यांची किंमत त्यांत धरण्यात येत नाही. ती धरल्यास ही विद्युत काय किंमतीला पडते ते समजू शकेल. मोठ्या धरणात प्रचंड वेगाने गाळ साचून ती निकामी होत आहेत. त्यामुळे त्या धरणापासून जितक्या काळ पाणीपुरवठा होईल असे दाखविण्यात आले होते ती उघड फसवणूक आहे हे स्पष्ट झाले आहे. गेल्या तीन वर्षांत उत्तरभारतात उत्तरप्रदेश, बिहार व आसाममध्ये आलेले महापूर यापूर्वी इतके कधीही आलेले नव्हते तसेच महाराष्ट्रात कोयना धरणाच्या बांधकामानंतर झालेल्या भूकंपामुळे व नुकत्याच गुजरात राज्यात मोर्वी व मच्छू येथे घड-लेल्या धरणदुर्घटनामुळे महापूरनियंत्रणाचा दावाही खोटा ठरला आहे.

धरणे ही नेहमीच जंगल व आदिवासी भागात होतात व त्यामुळे नैसर्गिक वनाची प्रचंड हानी होते व आदिवासी जीवन उध्वस्त होते ही गोष्ट वेगळीच. या आदिवासींचे सांस्कृतिक पुनर्वसन अशक्य कोटीतीलच बाब होय. म्हणून जरी बाजूला ठेवली तरी निर्वासितांचे निव्वळ आर्थिक पुनर्वसन करण्याचे जे आश्वासन शासन देते तेही खोटे ठरल्याचे सिद्ध झाले आहे. उदाहरणार्थ कोयनाधरणामुळे निर्वासित झालेल्यांपैकी ७८१ कुटुंबातील ३५००० व्यक्तींचे पुनर्वसन अजूनही व्हायचे आहे.


अशी मोठी धरणे मंजूर करवून घेताना नफा व खर्चाचे गुणोत्तर दाखविले जाते ते कोणत्याही शास्त्रीय सिद्धांतावर आधारित नसते व निव्वळ प्रकल्प मंजूर करवून घेण्याकरिता धूळफेक करून खोटी आकडेवारी देऊन फसवणूक केलेली असते असे अलीकडच्या मूल्य-मापनात्मक अभ्यासावरून दिसून येत आहे. मोठ्या धरणप्रकल्पांनी विकास होतो तो फक्त बड्या बांध-काम—कंत्राटदारांचा व त्यांना साथ देणाऱ्या राजकीय पुढारी व नोकरदारांचा. बहुजन नागरिकांच्या अज्ञा-नाचा फायदा घेऊन निव्वळ ठेकेदार, पुढारी व नोकर-शहांच्या तिजोऱ्या भरण्याकरिताच केवळ धरण—विकास व मोठे धरण—मोठा विकास हे समीकरण तयार करून प्रचलित करण्यात आले आहे. या संबंधात ' मेजर डॅम्स: ए सेकंड लुक ' या पुस्तकाचा उल्लेख लक्षणीय ठरेल. शिवाय विजय परांजपे व त्यांच्या सहकाऱ्यांनी कर्नाटकातील बेडकी प्रकल्पाचा केलेला अभ्यासही उल्लेखनीय आहे. त्यांनी स्थानिक लोकांच्या सहकार्याने त्या प्रकल्पाचा अभ्यास केला व शासनाचा खोटेपणा चव्हाट्यावर मांडणारा समांतर प्रकल्प—अह-वाल प्रकाशित करून धरणाचे काम स्थगित करायला भाग पाडले आहे.

गडचिरोली जिल्ह्यात होऊ घातलेल्या सर्व धरण-प्रकल्पांनाही हे सर्व लागू आहे. नैसर्गिक वनाचा पर्यायाने वृक्षवंश व प्राणिवंश यांचा प्रचंड विनाश या भागात राहणाऱ्या गोंड—माडिया आदिवासींचा सांस्कृ-तिक वंशविच्छेद, पुनर्वसनाचा कधीही न सुटणारा प्रश्न यासोबतच तथाकथित विकासाच्या नावावर केवळ मूठभरांच्या आर्थिक फायद्याकरिता या प्रकल्पांना मान्यता देऊन आम्ही, मानवी विनाशाचे बी रोवले जात असताना निष्क्रिय राहून पुढील पिढीला आपल्या हाताने संकटाच्या गर्तेत लोटणार आहेत काय हाच काय तो खरा प्रश्न आहे.

या प्रश्नाचे उत्तर देण्याकरिताच केवळ गडचिरोली जिल्ह्यातील सर्व पक्षीय आदिवासी नेतृत्व ' जंगल-बचाव, मानव—बचाव कृतिसमिती 'त पक्षभेद व मतभेद विसरून एकत्रित आले असून परिसरातील जागृत व जबाबदार गैरआदिवासी नागरिकांचाही पाठिंबा त्यांना मिळालेला आहे.

**(द्वारा—सुखदेव बाबू उईके,**
**जागृत आदिवासी संघटना,**
**देसाईगंज— ४४१२०७.**
**जिल्हा— गडचिरोली.)**

# अस्मिता जागृतीचा कार्यक्रम




प्रमोद करंदीकर

तळागाळातील पददलितांच्या अंधःकारमय जीवनात आशेचा किरण फुटावा, वनवासी बांधवांची जीवने उजळून निघावीत, भारतीय समाजजीवनातील भेदाभेदांच्या भिंती उखडल्या जाऊन एकरस समाजाची निर्मिती व्हावी, यासाठी ३१ वर्षांपूर्वी मध्यप्रदेशात जशपूरनगरला कल्याण आश्रमाच्या नावाने जे रोपटे लावले गेले, त्या रोपट्याला आलेला मोहर सर्वदूर सुगंधित वातावरण निर्माण करीत आहे.

अंधारामध्ये अडखळलेलं एक अश्राप समाजज.वन. अशा तिमिरालिप्त वनवासी जीवनाचा अंतिम उच्छ्वासही अंधाराचा पदर धरून अंधारात मिसळून जातो. या शोकांतिकेच्या कारणांचा शोध घेतला मा. ठक्करबाप्पांनी आणि त्यांच्याच प्रेरणेने कल्याणआश्रमाची स्थापना झाली.

वनवासी क्षेत्रात आर्थिक, सामाजिक, राजकीय वा धार्मिक कारणाने काम करणाऱ्या कुणाही कार्यकर्त्याला गुरुस्थानी वाटेल असे कै. ठक्करबाप्पांचे व्यक्तिमत्त्व. १९५२ साली मध्यप्रदेशातल्या जशपूरनगरला श्री. बाळासाहेब देशपांडे यांनी सुरू केलेल्या 'कल्याण-आश्रमा' मागची मुख्य प्रेरणाही तीच होती. गेल्या ३१ वर्षांत कल्याणआश्रमाचा वेलू गगनावरी गेला आहे. जवळपास ५ हजार वनवासी खेड्यात कल्याण-आश्रमाचे कार्यकर्ते पोहोचले आहेत.

मध्यप्रदेशातील रायगड जिल्ह्यात जशपूरनगर या ठिकाणी १९५२ साली वनवासी कल्याण आश्रमाची स्थापना झाली. जशपूरनगर हे तसे पूर्वीचे संस्थान. मध्यप्रदेशाच्या छोटा नागपूर या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या भागात वनवासी-वस्तीही मोठी आहे. इंग्रजांच्या काळात मिशनऱ्यांना रान मोकळे. त्यांनी ह्या भागात स्वतःचा मोठा 'गड' निर्माण केला. केवळ धर्मांतर करून ही मंडळी थांबली नाही, त्यांनी विद्रोहाची बीजेही पेरली. 'स्पिन्सर मुव्हमेंट' नावाची चळवळ सुरू करून स्वतंत्र झारखंड स्थापन करण्याची तयारी झारखंडपक्षाचे नेते जयपालसिंग यांनी केली होती. ब्रिटिश सेनादलातून निवृत्त झालेले काही ख्रिश्चन सैनिक व अधिकारी शस्त्रास्त्रे जमवीत होते; परंतु या कटाचा केंद्र सरकारला पत्ता लागला व सरदार पटेल यांनी हे संकल्पित बंड उधळून लावले.

## चिंतनातून आश्रमाची उभारणी

याच काळात मध्यप्रदेशाचे नेतृत्व श्री. रविशंकर शुक्ल यांच्याकडे होते. त्यांनी ही समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न सुरू केले आणि 'मागास विभाग कल्याण योजने' खाली बाळासाहेब देशपांडे यांची नेमणूक झाली. याच काळात देशविरोधी कारवायांवर प्रकाश पाडण्यासाठी न्यायमूर्ति भवानीशंकर नियोगी यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी-आयोग नेमण्यात आला. या आयोगापुढे पुरावा सादर करण्याचे काम श्री. देशपांडे यांच्यावर सोपविले गेले. त्यामुळेच परदेशी हस्तकांच्या देशद्रोही कारवायांचा अभ्यास करता आला आणि त्याच चिंतनातून कल्याण-आश्रमाने जन्म घेतला.

**ध्येय :** कल्याणआश्रमाचे मुख्य ध्येय म्हणजे वनवासी समाजाला आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या स्वावलंबी आणि स्वयंपूर्ण बनवून, राष्ट्रजीवनाच्या

मुख्य प्रवाहात त्याला समाविष्ट करून घेणे. अधिक स्पष्ट करून सांगायचे झाले म्हणजे १) वनवासी समाजाची अस्मिता जागृत करणे, त्यांच्यात आकांक्षा निर्माण करणे, २) त्यांना सर्व प्रकारच्या संधी उपलब्ध करून देणे, आणि ३) वनवासी व शहरवासी यांच्यातील दरी कमी करणे.

ही सर्व उद्दिष्टचे साध्य करण्यासाठी जी साधने आवश्यक असतील त्या सर्वांचा कल्याणआश्रमाने उपयोग केला आहे. ह्या साधनांचा उपयोग करताना सेवाभावी दृष्टिकोन व विधायक अशा रचनात्मक पायाचा आधार कल्याणआश्रमाने घेतला आहे. आवश्यक त्या ठिकाणी संघर्षही केला आहे; परंतु संपूर्ण कार्याचा ढाचा संघर्षात्मक न ठेवता विधायक रचनात्मकतेची जोड त्याला दिली आहे.

## वसतिगृहाला प्राधान्य

या सर्व साधनांमध्ये वसतिगृह व दवाखाने, कृषी व उद्योगकेंद्रे, बालवाड्या, प्रौढ साक्षरकेंद्र, भजनीमंडळी इ. चा समावेश आहे. ही साधने चालविली जाणारी संस्था एवढेच काही कल्याणआश्रमाचे काम नाही. उपरोक्त तीन ध्येये पूर्ण करण्यासाठी जेवढे हवे तेवढेच ह्या साधनांचे महत्त्व आहे. कल्याणआश्रमाच्या सेवाकार्यात वसतिगृहाला जास्त प्राधान्य आहे. त्याला कारणही आहेच. आज वनवासींच्या विकासासाठी शासनातर्फे लक्षावधी रुपये खर्च होतात. अनेक पंचवार्षिक योजनांमधून आदिवासींसाठी शेती–पशुपालन–जंगलउद्योग आणि आरोग्यविषयक सोयी उपलब्ध करून देऊनसुद्धा वनवासींच्या परिस्थितीतील परिवर्तनाची चिन्हे दिसत नाहीत. आजही वनवासी हा गरीब, अशिक्षित, घाबरलेला, दबलेला, वेठबिगारी करणारा, कर्जबाजारी, व्यसनात बुडालेला, असाच राहिला आहे. हा दोष शासनाचा किंवा वनवासींचाही नाही. दोष आपलाच आहे. आपणच त्यांना न पेलणाऱ्या, मोठ्या, भव्य–दिव्य योजना त्यांच्यावर लादत असतो. त्यामुळे मुळातच दबलेला वनवासी जास्तच दडपला जातो. लहान–लहान आणि वास्तवतेला धरून अशा योजनाच शासनातर्फे राबविल्या जात नाहीत. त्यामुळे सरकारचा प्रचंड पैसा खर्च होऊनही अपेक्षित यश अद्यापि हाती आलेले नाही.

कल्याणआश्रमाचा विश्वासच प्रथमतः अस्मिता-जागृतीवर आहे. जोपर्यंत वनवासी माणसाला त्याचे स्वत्व, त्याची संस्कृती, त्याच्या चालीरीती आणि परंपरा याविषयी स्वाभिमान निर्माण होणार नाही.

तोपर्यंत त्याच्यात जीवनाकांक्षा निर्माण होणार नाही. त्याच्याकडून कोणतीही धडपड होणार नाही. केवळ मरेपर्यंत जगायचे म्हणूनच तो निर्जीवपणे जगेल; पण एकदा का त्याला स्वत्वाची जाणीव करून दिली, त्यात अस्मिता जागृत झाली, त्याच्या जीवनाला आकांक्षेचे धुमारे फुटू लागले तर जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात वनवासी उत्तुंग अशी उसळी घेऊ शकेल आणि कल्याणआश्रमातर्फे चालविल्या जाणाऱ्या वसतीगृहात याच गोष्टीवर नेमका भर दिला जातो. आजची वसतीगृहातील चिमुकली बालके उद्या पाड्यापाड्यांवर समर्थपणे नेतृत्व निर्माण करतील आणि एक एक विद्यार्थी एक एक ज्योत निर्माण करील. वनवासी क्षेत्रातील नेतृत्व या बालकांतून निर्माण होत आहे. त्यामुळेच वसतीगृहातील सर्व संस्कारांचे, शिकवणुकीचे सूत्र जिज्ञासा–निर्मिती, अस्मिता जागरण, मातीची ओढ, परंपरेची अभंगता, गुणांचा सन्मान आणि यातून वनवासी संघटन असे आहे. याचमुळे केवळ मुलांना सांभाळणाऱ्या संस्थेचे रुप कल्याणआश्रमाचे नाही. तेजस्वी पहाटेचे स्वप्न सांभाळत हे जीवन विकसीत होईल असे वातावरण निर्माण करण्याचे कार्य कल्याण आश्रम करीत आहे.

## सामाजिक ऋण

वसतीगृह, दवाखाने, शेतीप्रकल्प इ. सर्व चालविण्यासाठी प्रचंड पैसा लागतो. त्याबाबतही कल्याणआश्रमाची निश्चित अशी भूमिका आहे. वनवासीसमाज आपल्यापेक्षा फार फार मागे राहिला हा दोष आपल्या संपूर्ण समाजाचा आहे आणि समाजातील प्रत्येक घटकाने त्यासाठी सहाय्य करणे आवश्यक आहे. म्हणून ही सर्व कामे कल्याणआश्रम समाजाकडून पैसा उभा करून पूर्ण करतो. यांत नागरी समाजाला या समस्येचे स्वरुप समजावे, त्यांच्यातही कर्तव्याची जाणीव निर्माण व्हावी, हाच प्रमुख भाग आहे. हे कार्य एवढे प्रचंड आहे की, केवळ सरकारने काम करून भागणार नाही, तर समाजाच्या प्रेमावर व साहाय्यावर हे काम पूर्ण होऊ शकेल. खरे म्हणजे शासनाला संरक्षण, उद्योग, कायदा, सुव्यवस्था इ. प्रचंड कामे असताना समाजानेच

हे आपले कर्तव्य म्हणून अशी सामाजिक कार्ये करणे आवश्यक आहे. प्रत्येक वेळी सरकारी अनुदान आणि योजनांवरच अवलंबून राहाणे निकोप राष्ट्राचे लक्षण नव्हे.

कल्याणआश्रमाचे कार्य सुरुवातीस फक्त जशपूर-नगरपुरतेच मर्यादित होते. पुढे १९७८ पासून अखिल भारतीय पातळीवर हे काम सुरू करण्यात आले. आज सर्व भारतात जेथे म्हणून वनवासी जमाती राहातात, त्या सर्व जमातींमध्ये, प्रांतांत, जिल्ह्यात कल्याण-आश्रम पोहोचलेला आहे. गेल्या पाच वर्षांत कल्याण आश्रमाने केलेल्या प्रगतीचा आढावा खालीलप्रमाणे--

सध्या देशभरात ३५० विविध प्रकल्प कल्याण आश्रमातर्फे चालविले जातात. हे प्रकल्प चालविण्या-साठी २५० पूर्णवेळ कार्यकर्ते अविश्रांत धडपड करीत आहेत. त्यातील ६० वनवासी कार्यकर्ते आहेत तर १४ महिला कार्यकर्त्या आहेत. ह्या सर्व प्रकल्पांद्वारे आज प्रत्यक्ष ५००० वनवासी खेड्यांपर्यंत कल्याणआश्रम जाऊन पोहोचला आहे.

हे सर्व लिहीत असताना एका गोष्टीची प्रकर्षाने जाणीव होते.

अंधार हटविण्याची धडपड.

एक खूप दाट अंधार असलेली खोली होती. एका शहाण्याला तेथे पाठविले. त्याला खोलीतला अंधार हटवायचा होता. तो कामाला लागला. त्या खोलीतून अंधार हटविण्यासाठी त्याने खूप प्रयत्न केला. अविश्रांत अहोरात्र. अंधार हटतच नव्हता. त्याने अंधाराला हटवायचा जेवढा प्रयत्न केला तेवढा अंधार येतच राहिला. एका सत्पुरुषाने ते पाहिले. तो म्हणाला, अंधार अशाने हटविता येणार नाही. तू प्रकाशाला रुप दे. अंधार आपोआप जाईल. नकारात्मक होऊ नको. तू गुणांची प्रतिष्ठा कर.

प्रचंड अंधाराचे सोबती असणाऱ्या वनवासींमध्ये कल्याणआश्रमाने तेजाची ज्योत पेटविली आहे. वन-वासींच्या जीवनात तांबडफुटी होत आहे...

❋


(द्वारा : वनवासी कल्याणआश्रम
मु. वैजनाथ. पो. हुमगांव
ता. कर्जत, जि. रायगड,
पिन : ४१०२१४)

# गडमंडल्याची महाराणी

दुर्गावती--!
गोंडवनासाठी विझलेले तुझे आयुष्य
देऊन जाते इथल्या वनपुत्रांना क्रांतीची दिशा
अन् तुझ्या विद्रोही अस्तित्वाची शौर्यकथा--
सांगून जाते ह्या जगण्याचा अर्थमान्यच झाले नाही तुला
येथील वर्णभेदाचे सन्माननीय तत्त्वज्ञान
दलपतशहा नांवाच्या वीरतेशी त्या काळी जडलेले--
तुझ्या हृदयाचे अटूट नाते--
करून जाते तुझ्या वर्णविद्रोही भूमिकेचे समर्थन--
पण तुझ्या सुखासीन जीवनाचा चंद्र
वैधव्याच्या ग्रहणाने गिळला तेव्हा
काळोखले असेल तुझ्या स्वप्नांचे अंतराळ
कोसळल्या असतील संघर्षाच्या सहस्र धारा
पण भयभीत कधी झालीच नाही
तुझी जीवनदर्शी जाणीव--
अन् झालाच नाही कधी हतबल
धिरगंभीरांच्या कुळीचा तुझा जीवनाशय
नेहमीच राहिला तुझ्या स्वाभिमानाचा संघर्ष
गोंडवनाशी शत्रुत्वाची भाषा बोलणारांशी--
वनपुत्रांना गुलाम करू पाहणारांशी वीरांगना-- !
ठाऊक आहे मला तू गोंडवनाची सम्राज्ञी म्हणून
गडामंडल्याची महाराणी म्हणून--
पण पाहता आले नाही मला तुझे
धगधगणारे विरली आयुष्य--
शत्रूशी झुंजलेले तुझे अजोड शूरत्व--
युद्धभूमीवरील तुझे कुशल नेतृत्व--
मी सावरू शकलो नाही तुझी
रणभूमीवर लढतांना कोसळलेली शूर काया
सहस्र वेदनांनी तेव्हा तू विव्हळली असशील
पण त्या मरण्यातही झाला असेल
तुला एक असीम आनंद आपल्या पावित्र्याचा--
प्राणपणाने लढण्याचा--गोंडवनाची अस्मिता राखल्याचा
तेजस्विनी-- !
घडवून गेलीस तू ह्या गोंडवनाचा इतिहास
अन् शिकवून गेलीस इथल्या आदिपुत्रांना
स्वातंत्र्यातील जगणे--मरणे
तुझ्या मुक्तिस्वप्नांचे विखुरलेले अवशेष
मी वेचणार आहे पुढच्या शतकांसाठी
कारण रानावनातील दुःखपुत्रांचा अनुभव
वेदनांच्या चक्रव्यूहात आजही तडफडतो आहे--

**--विनायक तुमराम**
भद्रावती, जि. चंद्रपूर

# भूमिसेना व काळुरामची हकीगत



वसंत देशपांडे

ठाणे जिल्ह्यातील भूमिसेना या संघटनेची उभारणी काळुराम धोदडे या वारलीनेत्याने केली. काळुरामच्या कामाची पद्धत व भूमिसेनेची इतर कार्ये या लेखात दिलेली आहेत.

मनोरला पाऊल ठेवले की, भूमिसेनेच्या अस्तित्वाची जाणीव होते आणि भूमिसेनेचे नाव घेतले की काळुराम धोदडे ही व्यक्ती डोळ्यांपुढे उभी राहते. आदिवासी लोकात परिवर्तनाचे कार्य अनेक कार्यकर्ते करताना आढळतात. भूमिसेनेचे उद्दिष्ट, कार्य आणि पद्धती या सर्वांपेक्षा निराळे आणि वैशिष्टचपूर्ण आहे. आदिवासीवर्ग मागासलेला, शोषित असा आहे; पण या समाजातही असा एक वर्ग आहे की, या वर्गाचे शोषण, दारिद्रय आणि एकूण हलाखी यांचे वर्णन करण्यास शब्द अपुरे पडतात. वेठबिगार किंवा सरळ सांगावयाचे म्हणजे गुलाम, भूमिहीन मजूर आणि अल्पभूधारक यांचा या वर्गात समावेश होतो. प्रामुख्याने या वर्गातील लोकांच्या मुक्ततेसाठी आणि उन्नतीसाठी भूमिसेना झगडत आहे.

भूमिसेना १९७० मध्ये अधिकृतरीत्या अस्तित्वात आली; पण काळुराम धोदडे याआधी कित्येक वर्षे आपल्या साथीदारांसह झटत होता. त्याच्या एकाकी कार्याची परिणती म्हणजे भूमिसेनेची स्थापना.

मनोरपासून चार मैलांवर असलेल्या कोंढाण या गावात सुमारे १९४३ मध्ये काळुरामचा जन्म झाला. त्याच्या वडिलांकडे, १२ एकर जमीन, कोणाचे तरी कूळ म्हणून वहिवाटीखाली होती. मालकाने एकाएकी त्यांना हुसकावून लावले आणि जमीन ताब्यात घेतली. काळुरामचे वडील त्यानंतर एका गुजराथी जमीनदाराकडे कूळ म्हणून काम करू लागले. कूळ म्हणून त्यांना मालकास जबरदस्त खंड द्यावा लागे. एकूण उत्पन्नाचा अर्धा वाटा मालक घेई; त्याशिवाय बियाणे, खत इत्यादी वस्तूंचा खर्च म्हणूनही काही उत्पन्नाचा वाटा घेई. हे सर्व दिल्यानंतर मालकाची मर्जी राखण्यासाठी काही ना काही द्यावे लागेच. वारंवार कोंबडी देणे आणि मालकाच्या घरी फुकट राबणे हे कुळाच्या अंगवळणी पडले होते, यामुळे शेतीवर काळुरामच्या कुटुंबाचे भागत नसे. त्यासाठी काळुरामच्या वडिलांना इतरत्र मजुरी करून पैसे मिळवावे लागत.

## सामाजिक कार्याचे धडे

काळुरामचे तिसरीपर्यंत शिक्षण कोंढाणच्या परिसरात झाले. केवळ शाळा होती, आणि काळुराम हुशार होता म्हणूनच काळुराम शाळेत जाऊ शकला. तिसरीनंतर शिक्षण वास्तविक थांबायचे. कारण चौथीचा वर्ग तेथील शाळेत नव्हता आणि दूरवरच्या शाळेत मुलाला घातले पाहिजे एवढी शिक्षणाविषयीची आच घरात कोणास नव्हती; पण मास्तरांनी काळुरामच्या वडिलांना गळ घातली आणि काळुराम मनोरच्या शाळेत दाखल झाला. येथून पुढील आठ वर्षे काळुरामने मनोर-वाडा, पालघर आणि मुंबई येथील बोर्डिंगस्कूलमध्ये काढली. वाडा येथील बोर्डिंगमध्ये असताना काळुराम सार्वजनिक कार्याचे पहिले धडे शिकला. या बोर्डिंगमधील नियमाप्रमाणे प्रत्येक विद्यार्थ्याला, आदिवासी लोकांचे तक्रारीअर्ज लिहून देण्यासाठी किमान वेळ

द्यावा लागत असे. काळुरामने या कामास सुरुवात केली आणि त्यातून आदिवासी लोकांच्या जीवनाचे दुःख त्याला समजू लागले. हे काम काळुराम फार मन लावून करू लागला. इतके की, त्याची ख्याती इतर बोर्डिंगमध्येही पसरली आणि त्याने आपल्या बोर्डिंग-मध्ये यावे म्हणून इतर बोर्डिंगचे व्यवस्थापक खटपट करू लागले. हे काम करत असतानाच बोर्डिंगच्या व्यवस्थापनातील गैरकारभारही काळुरामच्या लक्षात येऊ लागला. आदिवासी विद्यार्थ्यांच्या नावाखाली सर-कारकडून पैसा घेणे व त्यातला जमेल तेवढा भाग आपल्या घशात घालणे हे बऱ्याच वसतिगृहांच्या व्यव-स्थापकांचे उद्योग होते. या भ्रष्टाचारांमुळे विद्यार्थ्यांच्या सुखसोयीसाठी हात राखून खर्च होई. आदिवासी विद्यार्थी याबाबत उदासीन असत. घरच्यापेक्षा वसति-गृह बरे असायचे त्यामुळे ते तक्रार करीत नसत. बहुतेक विद्यार्थ्यांना अभ्यासातही रस नसे. आरामशीर रहावयास मिळत असल्यामुळे ते आपला वेळ टिवल्या-बावल्या करण्यात घालवीत. काळुरामने त्यांना संघटित करण्याचे प्रयत्न केले. वसतिगृहातील गैरकारभारा-बाबत त्यांच्याशी चर्चा केली; पण त्याचे प्रयत्न त्याच्याच अंगाशी आले. व्यवस्थापकांना काळुरामच्या या कामाची कुणकूण लागली आणि त्याच्यावर पाळत ठेवण्यात येऊ लागली. काही विद्यार्थ्यांमार्फत त्यास दमबाजी आणि मारहाणही करण्यात आली.

सरतेशेवटी त्याची उचलबांगडी दादरच्या एका वसतिगृहात झाली.

एका बोर्डिंगमधून दुसऱ्या बोर्डिंगमध्ये अशी काळुरामची उचलबांगडी होत गेली. प्रत्येक ठिकाणी काळुरामने विद्यार्थ्यांना संघटित करण्याचे आणि बोर्डिंगमधील गैरव्यवस्थेबाबत आवाज उठवण्याचे आपले प्रयत्न चालूच ठेवले. काळुराम यामुळे व्यवस्था-पकांना नकोसा झाला.

पण येथे आल्यावर काळुरामने शिक्षणास रामराम ठोकण्याचे ठरविले. काही काळ टायपिंग शिकण्याचा प्रयत्न केला. नोकरीही शोधण्याचा प्रयत्न केला; पण हाती काहीच लागले नाही म्हणून निराश होऊन तो परत कोंढाणला येऊन दाखल झाला.

पण कोंढाणला आल्यावर 'पुढे काय करायचे' हा प्रश्न उभा राहिला. घरची माणसे 'काळुराम खूप शिकलास आता नोकरी बघ' म्हणून मागे लागली. नोकरी शोधण भागच होते. नाही तर मग 'एवढा कशाला शिकलास' हा वडिलांचा निरुत्तर करणारा प्रश्न होता. सुदैवाने ओळखीच्या एका कॉंग्रेसकार्य-कर्त्याने काळुरामला एका सहकारी सोसायटीत कारकून म्हणून चिकटवून दिले. १९६० सालची ही गोष्ट.

## भ्रष्टाचाराविरुद्ध आवाज

या सोसायटीत जेमतेम सहा महिनेच तो काम करू शकला. सोसायटीमधील भ्रष्टाचार त्याला पदोपदी दिसू लागला. इतर सोसायट्यांत काय चालते पहावे म्हणून एकूण ६० सोसायट्यांच्या कारभाराविषयी त्याने माहिती गोळा केली. व्यवस्थित टाचण केले. त्या-वर आधारित एक रिपोर्ट सरकारकडे पाठवण्याचे त्याचे मनात घोळू लागले. काळुराम दैनंदिनी ठेवीत आहे आणि सरकारकडे निवेदन पाठवण्याचे विचारात आहे, याची कुणकूण वरच्या अधिकाऱ्यांना लागली. त्याला ज्या गृहस्थाने नोकरीस लावले तो एक दिवस अचानक काळुराम काम करीत होता तिथे येऊन उभा ठाकला. त्याने काळुरामची दैनंदिनी आणि टाचण मागितले; पण काळुरामने शिताफीने कागदपत्र लपवले व तेथून तो कसाबसा सटकला; परंतु नंतर काळुरामचे मित्र आणि इतर आदिवासी कर्मचारी 'असे काही करू नको' म्हणून आवर्जून सांगू लागले. काळुरामपुढे पेच निर्माण झाला. भ्रष्टाचार उघडकीस येऊ नये, आपलेच लोक आपले पाय मागे खेचीत आहेत, आपलेच लोक भ्रष्टाचारात गुंतले आहेत, त्याचे त्याला आश्चर्य वाटले. ज्या आदिवासींसाठी सोसायट्या काढल्या त्या आदिवासींचे हित कसे साधले जाणार? या सर्व सोसायट्या दहा वर्षांच्या कालावधीत पूर्णपणे आदि-वासींकडे चालवण्यास द्याव्यात असे ठरले होते; पण तसे काही घडण्याची शक्यता दिसत नव्हती आणि घडले तर आदिवासींचा खरा फायदा होणार की नाही याविषयी त्याच्या मनात शंका निर्माण झाल्या होत्या. त्याने हे विचार मोकळेपणाने त्याला नोकरीस लाव-णाऱ्या कार्यकर्त्यापुढे मांडले. त्याची अपेक्षा होती त्याला आपले म्हणणे पटेल व तो काही मार्ग सुचवेल; पण तसे काही न होता, या कार्यकर्त्याने काळुरामलाच सुनावले. त्याला समज दिली. तेव्हा रागावून काळुरामने राजीनामा दिला. पुनश्च काय करायचे हा प्रश्न; पण काळुरामचे आदिवासींमध्ये समाजकार्य मात्र निश्चित-

पणे सुरू झाले होते आणि त्यास नाडलेल्या आदिवासींकडून दादही मिळू लागली होती. १९६२ मध्ये निवडणुका आल्या. सर्वच पक्षांचे कार्यकर्ते काळुरामकडे अपेक्षेने पाहू लागले. कॉंग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी काळुरामची मदत मागितली; पण काळुरामने साफ नकार दिला. उलट त्याने सी. पी. आय. (एम्.) च्या उमेदवारास मदत करावयाचे ठरविले. असा निर्णय घेताना काळुरामने विविध पक्षांचा विचार केलेला नव्हता. त्याला पक्षापेक्षा कार्यकर्ता महत्त्वाचा वाटत होता. तसे त्याला कोणत्याच पक्षाचे आकर्षण नव्हते. कॉंग्रेसविषयी मात्र तो पूर्ण निराश होता. कारण आदिवासींच्या सहकारी सोसायट्या चालवणारे सर्व भ्रष्ट लोक कॉंग्रेसपक्षाचे सभासद होते. समाजवादी पक्षाचे नवनीत शहांविषयीही काळुरामला आदर होता. निवडणुकीत सी. पी. आय. (एम्) चा उमेदवार निवडून आला. त्याचे श्रेय निदान काही प्रमाणात तरी काळुरामलाच द्यावे लागेल.

निवडणुकीनंतर काळुरामने मनोर येथे आपले ऑफिस उघडण्याचे निश्चित केले. आदिवासींच्या तक्रारी निवारणार्थ काम करण्यास त्याने सुरुवात केली.

## समाजवादी पक्षात प्रवेश

पहिले महत्त्वाचे काम निर्माण झाले ते कूळकायद्यासंबंधीचे. १९५७ च्या कूळकायद्याची अंमलबजावणी या भागात होत नव्हती. काळुरामने त्यासंबंधी कृती करण्याचे ठरविले. पुन्हा एकदा सर्व पक्षांनी काळुरामला चुचकारण्यास सुरुवात केली. तीन महिने त्याने निरनिराळ्या पक्षांचा विचार केला आणि सरतेशेवटी समाजवादी पक्षात जाण्याचे ठरविले. १९६३ मध्ये काळुरामने समाजवादी पक्षाचे सभासदत्व स्वीकारले. काळुरामच्या कामास आता निश्चित दिशा मिळाली. परिसरातील सर्व खेड्यांतून हिंडणे, कुळांसंबंधी आणि इतर गरीब आदिवासींविषयी माहिती गोळा करणे व त्यांना संघटित करणे हे त्याच्या कामाचे उद्दिष्ट ठरले. सर्व पीडित संघटित झाल्याशिवाय शासन कायद्याची अंमलबजावणी करणार नाही हे त्यास उमगले होते. वसतिगृहात असताना त्यास सरकारच्या धोरणाविषयी प्रचंड आदर होता. खरोखरच सरकार प्रामाणिकपणे सुधारणा करीत आहे असे त्याला वाटत होते. आता त्यास कळून चुकले होते की, लोकांसाठी कायदे, योजना केल्या जातात त्या आपोआप अंमलात येत नाहीत. त्यासाठी त्यांच्यावर संघटनांमार्फत दडपण आणावे लागते.

लढ्याचा पहिला महत्त्वाचा प्रसंग १९६६ मध्ये उद्‌भवला. हलेली गावातील सरपंचाने लँडरेकॉर्डमध्ये फेरफार करून बरीच जमीन घशात घालण्याचा प्रयत्न चालविला होता. लोकांनी रीतसर तक्रार केली. मग त्याची दाद न लागता उलट नावकऱ्यांवर दडपण आणण्यासाठी प्रयत्न सुरू झाले. कॉंग्रेसचे कार्यकर्ते काळुरामकडे आले आणि लोकांनी आपली तक्रार मागे घ्यावी असा त्यांनी आग्रह धरला. त्यांनी सबइन्स्पेक्टरलाही आपल्या बाजूला ओढले होते. सबइन्स्पेक्टरला सर्व तक्रार करणाऱ्यांना बोलावून तक्रार मागे घेण्याविषयी फर्माविले. दरम्यान काळुरामने वरच्या अधिकाऱ्याशी संपर्क साधला व सर्व हकिकत कळवली. सबइन्स्पेक्टरला त्याचा पत्ता नव्हता. त्याने काळुरामला गाठून दम दिला. काळुरामच्या घरीच त्याने मुक्काम ठोकला आणि काळुरामच्या वडिलांना त्यांनी काळुरामला असल्या उद्योगांपासून परावृत्त करण्याचा सल्ला दिला. काळुरामचे लग्न लवकर करून टाका असाही अनाहूत सल्ला त्याने दिला. इकडे काळुरामच्या सांगण्यावरून डीएसपी गावात येऊन दाखल झाले. त्यांनी चौकशी केली आणि सर्व कारस्थान त्यांच्या लक्षात आले. त्यांनी सबइन्स्पेक्टरला ताकीद दिली. त्याचा सबइन्स्पेक्टरच्या मनावर परिणाम झाला. त्यात त्याने आत्महत्येचा प्रयत्न केला; पण त्यातून तो वाचला. काळुराम आणि त्याचे मित्र यांनी या परिस्थितीत सबइन्स्पेक्टरला सहानुभूतिपूर्वक बरीच मदत केली.

कूळकायद्याची अंमलबजावणी सनदशीर मार्गाने करत असतानाच १९७० च्या सुमारास भूमिमुक्तीआंदोलन सुरू झाले. समाजवादी पक्षाने या आंदोलनाची लाट या भागात नेण्याचे ठरविले. काळुरामने या आंदोलनात उतरायचे ठरविले.

ऑगस्ट १९७० मध्ये १२० लोकांनी सत्याग्रह केला. अंजुमन ट्रस्टची जमीन हे या सत्याग्रहाचे लक्ष्य होते. या ट्रस्टच्या ताब्यात सुमारे २००० एकर जमीन होती.

मुख्य कार्यक्रम, सावकारांनी बेकायदेशीररीत्या

आदिवासी शेतकऱ्यांच्या जमिनी आपल्या ताब्यात घेतल्या होत्या त्या सोडवणे, निदान त्यावरील पिके कापून नेणे. या भागात सावकार थोडे खावटीकर्ज देऊन, त्याच्या बदल्यात आदिवासी शेतकऱ्यांच्या जमिनी कसण्यासाठी घेत असत. ही प्रथा फार मोठ्या प्रमाणावर अस्तित्वात होती. आजही काही प्रमाणात आहे. वर्षानुवर्षे अशा तऱ्हेने स्वतःची जमीन आदिवासी शेतकरी सावकाराकडे गहाण ठेवतो आणि स्वतः स्वतःच्याच शेतावर तुटपुंज्या वेतनावर सावकाराची मर्जी सांभाळीत मजूर म्हणून राबतो. काळुरामने अनेक गावांत पाहणी करून हा कार्यक्रम हाती घेण्याचे ठरवले. गावोगावी तळ ठोकून गावकऱ्यांना कायद्याची माहिती देणे आणि आपल्या हक्कांविषयी कृती करण्यास त्यांना तयार करणे हे महत्त्वाचे काम त्याने पार पाडले आणि मगच अशा सत्याग्रहास सुरुवात केली.

## भूमिसेनेचा जन्म

पहिला पीककापणीचा कार्यक्रम बंधन या गावी सागाशेट यांच्या शेतावर झाला. सुमारे ६०० आदिवासी कोयता घेऊन हजर होते. काळुरामने त्यांना आपल्या कामाची कल्पना दिली, संघटनेचे महत्त्व समजावून दिले. आपण करतो ते कायद्याच्या कक्षेतील काम आहे हे पटवून दिले आणि मग 'जय भूमिसेना' असा उत्स्फूर्तपणे नारा देऊन पीककापणीचा कार्यक्रम पार पडला. 'भूमिसेना' अशा तऱ्हेने जन्मास आली. अनपेक्षितरीत्या भूमिसेना येऊन धडकल्यामुळे प्रतिकार झाला नाही.

वाडा–खाडकोना गावात मात्र मालकाने पोलिसांस आगाऊ सूचना देऊन ठेवल्या होत्या; परंतु काळुरामचे सैन्य पोलीस पाहून डगमगले नाही. काळुरामने पोलीसअधिकाऱ्यांना प्रकरण समजावून दिले. ज्या जमिनीवरील पीक कापण्याचा कार्यक्रम चालू होता ती जमीन आदिवासी शेतकऱ्याची आहे, तेव्हा पीक कापणे यात कायद्याचे उल्लंघन नाही, असे त्याने प्रतिपादन केले. पोलिसांनी काळुरामला ताब्यात घेतले. नंतर सोडून दिले. हे सर्व होईपर्यंत पीककापणीचा कार्यक्रम पार पडलेला होता. या उपक्रमामुळे अनेक ठिकाणी उत्स्फूर्तपणे आदिवासी शेतकऱ्यांनी आपल्या मालकीच्या पण सावकारांच्या ताब्यातील जमिनीचा अशा तऱ्हेने ताबा घेण्यास प्रारंभ केला. एकूण दहा खेड्यांतून सुमारे ८० शेतकऱ्यांच्या अशा जमिनीवर हा कार्यक्रम पार पडला.

या चळवळीचा साहजिकच गाजावाजा होऊ लागला. सावकार चिंतातुर झाले. काळुरामवर सरकारी यंत्रणेकडून दडपण येण्यास सुरुवात झाली. सब-डिव्हिजनल ऑफिसरने काळुरामास निरोप पाठविला. 'तुम्ही येऊन भेटा, आपण सर्व प्रकरणांचा निकाल लावू.' गेल्या सोळा वर्षांत ज्यांनी काही केले नाही ते आता सरकार करावयास तयार झाले यावर काळुरामचा विश्वास बसेना. 'आपली मुख्य कचेरी मनोरला आणावी असे काळुरामने सुचविले. S. D. O. ने ते मान्य केले. केवळ तीन दिवसतात S. D. O. ने सुमारे ७०० प्रकरणांचा निकाल लावला. यातील फक्त एकाच प्रकरणात निकाल सावकाराचे बाजूने लागला. भूमिसेनेचे हे यश मोठे आहे.

## स्वतःचेच धान्यसाठे

या कार्यक्रमाचा पुढचा भाग म्हणून धान्यसाठा करण्याची. खावटीसाठी सावकाराकडे धान्य मागावे लागते व त्याच्या बदल्यात त्यास जमीन द्यावी लागते. म्हणून आपणच सामुदायिकरीत्या धान्यसाठे तयार करण्याची कल्पना काळुरामने मांडली. अशा धान्यसाठ्यांतून गरजूंना धान्य द्यायचे म्हणजे सावकाराकडे जाण्याची गरज भासणार नाही. या योजनेनुसार काही धान्यसाठे तयार करण्यात आले. वाडाखाडकोन या गावातील साठ्यावर सावकारांच्या हस्तकांनी हल्ला केला. आदिवासी रक्षकांनी त्यांना परतवून लावले; परंतु या झगड्यात एक हल्लेखोर जबरदस्त जखमी झाला. सावकारांनी भूमिसेनेविरुद्ध फिर्याद लावली. तीन आदिवासींना अटक झाली आणि त्यांना बेफाम मारझोड झाली. नखांत टाचण्या रोवून त्यांच्याकडून खोटी जबानी घेतली. काळुरामने एक मोठा मोर्चा आयोजित केला व न्यायाची मागणी केली. नवनीत शहा यांनी मोर्चाचे नेतृत्व केले. त्याचा परिणाम झाला आणि खोटी फिर्याद रद्द झाली.

काळुरामचे नाव आता आसपास पसरू लागले. जव्हार तालुक्यात एका सावकाराने अंदाजे दहा एकर जमीन गडप केली होती. तिथे आदिवासी शेतकऱ्यांनी सत्याग्रह ठरवला व काळुरामला निमंत्रण दिले. काळु-

रामने सर्व परिस्थिती पाहून सुमारे ६० लोकांना घेऊन पीक कापण्यास प्रारंभ केला. सावकार बंदूक घेऊन आला व सर्वांना मारण्याची धमकी दिली. तेवढ्यात पोलीस आले व त्यांनी काळुरामसह सर्वांना अटक केली. बारा दिवसांनंतर नवेजण सुटले; परंतु हे प्रकरण कोर्टात लढवावे लागले आणि बऱ्याच अवधीनंतर निकाल काळुरामचे बाजूने लागला! दरम्यानच्या काळात काळुरामने सावकाराचे घरावर मोर्चा नेला व लोकमत जागृत केले.

## आर्थिक व्यवस्थेशी झगडा

भूमिमुक्तीचे हे काम चालू असतानाच काळूराम आपल्या समाजवादी मित्रांशी आदिवासींच्या समस्यांवर बोलत होता. अनेक चर्चांतून एक गोष्ट स्पष्ट दिसू लागली होती, केवळ जमीन मिळवून भागणार नाही, ती जमीन चांगल्या प्रकारे कसली पाहिजे, त्यामधून जास्तीत जास्त उत्पादन काढले पाहिजे. त्यासाठी नैसर्गिक साधनसंपत्तीचा शास्त्रशुद्ध वापर करण्यास शिकवण्याची गरज काळुरामला पूर्वीपासून भासत होती. त्या दृष्टीने पाऊल टाकणे मात्र जमले नव्हते. आपल्या समाजवादी विचारांच्या मित्रांच्या सहाय्याने हे काम करावे असे त्या वाटत होते. या कामासाठी आबा करमरकर तयार झाले. ते शेतीतज्ज्ञ होते व आपल्या व्यवसायातून निवृत्त होऊन त्यांनी कोंढाणला तळ ठोकण्याचे मान्य केले. पूर्वी ते समाजवादी पक्षाचे कार्यकर्ते होते. आबांनी विचार करून आपली योजना मांडली. आदिवासींचा झगडा दुहेरी स्वरूपाचा. एका बाजूस निसर्गाशी झगडा करून नैसर्गिक साधन-संपत्तीचा उत्पादनवाढीसाठी वापर करणे आणि दुसऱ्या बाजूस मानवनिर्मित सामाजिक–आर्थिक व्यवस्थेशी झगडा देऊन तो बदलण्यासाठी प्रयत्न करणे. दोन्ही झगडे सारखेच महत्त्वाचे. या झगड्यांत यश मिळवण्यासाठी संघटित होणे, राष्ट्रीकृत बँकांची मदत घेऊन शेती-उत्पादन वाढविणे, सरकारी योजना, कायदे यांच्या अंमलबजावणीसाठी दडपण आणून त्याचा फायदा पदरात पाडून घेणे आणि जुनाट जाचक चालीरीती, अंधश्रद्धा इ. घालवण्यासाठी सामाजिक सुधारणांचा कार्यक्रम तरुण मंडळाच्यामार्फत हाती घेणे अशा अनेक प्रकारच्या आघाडींवर आपण झगडले पाहिजे, हा विचार आबांनी मांडला. तो सर्वांना मान्य झाला. त्याप्रमाणे एकेका उपक्रमाची आखणी होऊन कार्यक्रम पार पाडण्यास सुरुवात झाली.

आबांची तात्त्विक भूमिका जरी काळुरामाला पटली तरी त्यानुसार कार्यक्रम आखताना आणि राबवताना मतभेद निर्माण झाले. आबांचा कार्यक्रम आदिवासी लोकांची कुवत लक्षात घेता त्यांना तो पेलणारा नाही अशी काळुरामची भावना होती. चार वर्षांच्या प्रयोगानंतर आबांनी आपला मुक्काम हलवला.

## लोकजागृतीचे काम

आबा गेल्यानंतर काळुरामने नवीन धर्तीवर लोकजागृतीचे काम करण्यास सुरुवात केली. पोलो फ्रेअरी यांच्या विवेकजागरण (Conscientisation) पद्धतीचा अभ्यास केलेले काही कार्यकर्ते काळुरामला लाभले होते. त्यांच्या मदतीने तरुणांच्या संघटना बांधून त्यामार्फत नवीन उपक्रम हाती घेण्याचे काळुरामने ठरविले. वेठबिगार, भूमिहीन, मजूर, स्त्रिया अशा पददलित शोषित वर्गातील तरुणांचे अभ्यासगट घ्यायचे अशा अभ्यासगटात शोषण व्यवस्थेविषयी त्यांना टप्याटप्याने उमगेल अशा पद्धतीने चर्चा करावयाच्या व काही महत्त्वाच्या निष्कर्षावर पोहोचल्यानंतर कृतीस प्रवृत्त करावयाचे ही पद्धतीची ढोबळ रूपरेषा. उदाहरणार्थ–दारूचे व्यसन, जुन्या पद्धतीनुसार कर्ज घेऊन लग्नविधी पार पाडणे, काही अंधश्रद्धा इत्यादी, बळकट होण्यामध्ये सावकार, मोठे शेतकरी, व्यापारी राजकारणधुरंधर इत्यादींचे हितसंबंध कसे गुंतलेले आहेत हे या पद्धतीनुसार पटवून दिले जाते किंवा त्यांना ते आपोआप उमगेल अशा पद्धतीने चर्चा आखल्या जातात. त्यामुळे तरुणांची मने विचार करू लागतात. ते त्याविरुद्ध उपाययोजना करण्याचा विचार करून, प्रत्यक्ष कृतीस तयार होतात. लहान लहान कृती आणि उपक्रमांमार्फत त्यांचा आत्मविश्वास वाढतो, संघटना अधिक बळकट होते आणि अधिक महत्त्वाचे, अवघड उपक्रम हाती घेणे शक्य होते. या पद्धतीत व्याख्याने नसतात आणि प्रत्यक्ष कृतीसाठी उपलब्ध कायदे, योजना यांचा आधार पुरेपूर घेतला जातो. उदा. रोजगारहमीयोजना, किमान वेतनाचा कायदा, हस्तांतरित जमिनीचा कायदा इत्यादी. ही पद्धत आजकाल अधिक लोकप्रिय होत आहे.

### तीन प्रमुख कार्यक्रम

या पद्धतीचा अवलंब करून आज भूमिसेनेचा जो कार्यक्रम आहे त्याचे तीन प्रमुख भाग पडतात : (१) वेठबिगार व कर्जनिर्मूलन कायद्याप्रमाणे लग्नगड्या-सारखे गुलाम गुलामगिरीतून व कर्जातून मुक्त करणे, त्यांना इतरत्र रोजगार मिळवून देण्यासाठी खटपट करणे आणि त्यांच्या संघटना बांधणे. (२) किमान वेतनाप्रमाणे रोजगारी मिळावी यासाठी संप, सत्याग्रह या मार्गांचा आवश्यक असल्यास अवलंब करणे. (३) जंगलविभागातील वहितीखाली असलेल्या जमिनी कायमच्या मालकीच्या होण्यासाठी झगडा करणे.

या तीन कार्यक्रमांखेरीज, विविध स्वरूपाच्या सामाजिक सुधारणा आणि शेतीसुधारणांसंबंधीचे उपक्रमही हाती घेतले जातात. सामाजिक सुधारणांमध्ये लग्न-सोहळा सोपा, सुटसुटीत व स्वावलंबी करणे, दारूच्या व्यसनापासून लोकांना मुक्त करणे इ. कार्यमांचा समावेश आहे. शेतीसुधारणेत एकदम नवीन तंत्राचा अवलंब करण्याऐवजी त्या शेतीपद्धतीतच हळूहळू, टप्प्याटप्प्याने एकेक सुधारणा पचनी पाडण्यावर अधिक भर आहे. ही संघटना तशी लहानच आहे. पूर्ण वेळ काम करणाऱ्यांची संख्या दहाचे आसपास आहे. अनेक अडचणींना तोंड देऊन यांना काम करावे लागते. दरवेळेस यश मिळतेच असे नाही; पण सातत्याने काम करीत राहिल्याने सामान्य गरीब आदिवासींच्या मनात भूमि-सेनेस स्थान मिळालेले दिसते. अशा स्वयंस्फूर्तीने काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना प्रोत्साहन आणि सर्व तऱ्हेची मदत मिळणे आवश्यक आहे.

( 'पुरोगामी सत्यशोधक' या त्रैमासिकाच्या डिसेंबर–१९७८ च्या अंकावरून.) ❋

# आदिवासी जागा होतोय !

## देविदास गिरी

**आई**–वडिलांच्या अशिक्षितपणामुळे, घरादारांच्या प्राथमिक गरजांच्या गैरसोयीमुळे आणि पोटात पेटलेल्या भुकेच्या आगडोंबामुळे आदिवासी समाजातील मलांना शिक्षण घेणे अशक्य होते. त्या सर्व अडचणींवर मात करून शिकण्यासरखी परिस्थिती किंवा पर्यावरण निर्माण केले पाहिजे.

ज्यांच्याजवळ उत्पादनाची साधनसामुग्री नाही त्यांच्याजवळ शिक्षणाचेही हत्यार नाही ही भयानक वस्तुस्थिती आहे. म्हणून 'आदिवासी' समाजाचा विकास व्हावयाचा असेल तर प्रथम त्यांच्या बुद्धीचा विकास झाला पाहिजे' असे जनार्दनमहाराज म्हणतात ते खरोखरच आहे. कारण बुद्धीचा विकास न झाल्यामुळे आदिवासीसमाज आपल्यावर होत असलेले अन्याय-अत्याचार निमूटपणे सहन करीत आला आहे. ही परिस्थिती बदलण्यासाठी शिक्षण महत्त्वाचे आहे; शिक्षणाचे महत्त्व आज या शोषित समाजाला पटलेले आहे.

या बाबतीत आता आदिवासी खडबडून जागा होतोय ! हे न पटणारं सत्य, सत्य होतंय याचे ताजे उदाहरण म्हणजे पुनदखोऱ्यातील आदिवासींचे मोठ्या प्रमाणात मिळालेले सहकार्य, डांग सेवा मंडळ संचलीत सिद्धेश्वर आश्रम शाळा सुळे, ता. कळवण, जि. नासिक. या आश्रमशाळेमध्ये १५८ विद्यार्थी–विद्यार्थिनी आज शिक्षण घेत आहेत. १ ली ते सातवी-पर्यंत वर्ग असून, ५ शिक्षक व १ व्यवस्थापक आहेत. या सात गाँवत दोन वर्ग जोडवर्ग आहेत. अशा परिस्थितीत निसर्गात रमलेली ही शाळा,

मात्र या शाळेला खोल्या फक्त तीनच. शासन अजून खोल्या बांधायला अनुदान देत नाही. त्यामुळे शाळेला खोल्या कमी पडत होत्या. आता एकच पर्याय होता हे दुःख मुलांच्या पालकांना सांगायचे व सहकार्यातून नवीन वर्गखोल्या बांधावयाच्या. सर्व शिक्षक तयारीला लागले. यासाठी पालकमेळावा भरविण्यात आला. अध्यक्षस्थानी दादासाहेब बिडकर व प्रमुख पाहुणे म्हणून आमदार हरिभाऊ महाले होते. पालक मेळाव्यात सर्व वस्तुस्थिती समजावून देण्यात आली आणि पालकांना आवाहन करण्यात आले–शाळा आपल्याला आपल्या सहकार्यातून बांधावयाची आहे. त्यासाठी सर्वांनी मदतीचा हात दिला पाहिजे आणि काय आश्चर्य ? या आदिवासी पालकांनी ३००० रु. जमा करून दिले आणि आज ही शाळेची इमारत उभी झाली. ती आदिवासींच्या जागेपणाची साक्ष देतेय. इमारत साधीच, मातीचीच पण तिला हात लागलाय आदिवासींच्या जागेपणाचा. त्यामुळे इमारत जिवंत बनली आहे. आता आदिवासी जागा होतोय. त्याला कळून चुकले आहे की, शिक्षणाशिवाय आपला तरणोपाय नाही. ह्या शाळेत आपलीच मुले शिकतील, मोठी होतील आणि आपल्या समाजाचा विकास होईल. ❋

सिद्धेश्वर आश्रमशाळा सुळे,
मु. सुळे, पो. पिंपळे,
ता. कलवण, जि. नासिक

# अंबरसिंगांनी कामाची प्रेरणा दिली

**वीरसिंग पाडवी**

धुळे जिल्ह्यात बहुसंख्य आदिवासीलोक राहतात व ते दारिद्र्यरेषेखाली जीवन जगत आहेत. या स्वतंत्र देशात आर्थिक विकासाच्या ज्या विविध योजना आखल्या गेल्या त्यांमधून दारिद्र्य तर हटले नाहीच परंतु रोजगाराचा प्रश्नही सुटला नाही. तळागाळातील माणसे उपेक्षित, शोषितच राहिली आहेत. त्यांच्यात राहून त्यांना जागे करणे, संघटित करणे अत्यंत अवघड आहे, साधनवान, संपत्तीवान व सत्तावान मंडळी त्यांच्या जीवावर आपले वैभव भोगीत आहेत. या गरीबांच्या प्रतिक्रियेला जबरदस्त विरोध होत असतो. शासनयंत्रणा उपेक्षितांची बाजू किंचितच घेत असते.

अशा कमालीच्या परिस्थितीत जनसामान्यांच्या चळवळी उभारण्याचे आव्हान पत्करून, लोकांच्यात राहून त्यांना संघटित करण्याचे काम सातपुड्याच्या पायथ्याशी राहणाऱ्या आदिवासींमध्ये व इतर कष्टकरी व गरीब जनतेमध्ये ग्रामस्वराज्यसमिती ही एक संस्था करीत होती.

कै. अंबरसिंग सुरतवंती (अंबरसिंगमहाराज) या भिल्ल कार्यकर्त्याने येथील कामाची सुरुवात केली, चळवळ उभी केली. त्यास माझ्यासारख्या तरुणांनी वाहून घेतले. त्या वेळी त्यांनी तरुणांना आवाहन केले की, येथे काम करणारे आदिवासी तरुण पाहिजेत. आदिवासींवर होणारे अन्याय, अत्याचार याविरुद्ध आदिवासींना जागृत करण्याचे काम होते. कुठलाही पक्ष झेंडा न आणता आदिवासींना जागृत करण्याचे काम होते. मी त्यांच्याकडे वेगळ्या कामासाठी गेलो; परंतु त्यांनी मला जागृत केले. 'तू समाजासाठी काही तरी कर. आपल्या समाजावर अन्याय, हत्याचार होतो. तुमच्यासारखे तरुण या कामासाठी पुढे आले पाहिजेत.' मुळातच मला सामाजिक कामाची आवड असल्याने त्यांचे म्हणणे मला प्रेरक ठरले. मी कामाला सुरुवात करण्याचे ठरविले. चळवळीत पडण्याआधी मी एका कामावर सुपरवायझर होतो; परंतु कंपनीचा मालक आपल्या कंपनीच्या हिताचे बघत असे व मजुरांना पगार लवकर देत नसे. एकदा एका पगाराच्या वेळेस मजुरांना संप करायला लावला. पगार मिळवून घेतला. आधीपासून माझ्या अशा विचाराला प्रोत्साहन मिळाले. अधिक जाण येण्यासाठी कै. अंबरसिंगमहाराजांनी मला एक वर्षासाठी श्री. बाबा आमटे यांच्याकडे पाठवले. एक वर्षानंतर शहाद्याला कामाला सुरुवात केली. काम करत असताना प्राणघातक हल्ला झाला. माझ्या डोक्यावर कुऱ्हाडीचे घाव घालण्यात आले. श्री. तुळशी परब यांच्यावरदेखील हल्ला झाला. त्यांच्याही हाताचे हाड मोडले. ५ ऑक्टोबर १९७३ या दिवशी आमच्यावर हा हल्ला झाला. शासनाने लॉटरीपद्धतीने भूमिहिनांना दिलेली जमीन गुंड प्रवृत्तीचे लोक त्यांना ती मिळू देत नव्हते म्हणून त्या जमिनीत पाहणी करताना हा हल्ला आमच्यावर करण्यात आला. यानंतर मला बाजूला करण्यात आले; परंतु मला स्वस्थ बसवत नव्हते. श्री गोविंदराव शिंदे यांच्या मार्गदर्शनाने ग्राम स्वराज्यसमितीच्या कामाला लागलो. हे काम करत असताना सेवादलाचेही काम करत होतो. सेवादलाकडून मला फार शिकायला मिळाले. चळवळ व समाज जागृत करण्याच्या कामाला लागणारे विचार तेथेच मला मिळाले. कै. अंबरसिंग सुरतवंतीचे स्थानिक आदिवासी नेतृत्व हे या चळवळीचे वैशिष्ट्य.

या भागातील आदिवासींची पिळवणूक अनेक प्रकारे होत होती. सावकार व जमिनदारांनी बेकायदेशीररित्या त्यांच्या जमिनी हडप केल्या होत्या. मजुरी कमी दिली जात होती. गुलामासारखी वागणूक दिली जात होती. पोलिस व वनखात्याचे कर्मचारी त्यांना हवे तसे छळत व लुबाडत होते. बिगरआदिवासींकडे गेलेल्या आदिवासींच्या जमिनी त्यांना परत मिळण्यासाठी महाराष्ट्र सरकारला कायदा करावा लागला, किमान वेतन मिळण्यासाठी कायदा करावा लागला. या कायद्यांची अंमलबजावणी होण्यासाठी गावोगावी संघर्ष करावा लागला.

संघर्षाबरोबरच रचनेचे कार्य ग्रामस्वराज्यसमिती करत होती. प्रौढ शिक्षण, आरोग्यसंवर्धन, शेतीसुधार दारुबंदी, शिक्षण, तक्रारनिवारण यासारखी कामे चालू होती.

चळवळ ही समुद्राच्या लाटेसारखी असते. भरती-ओहोटी, झीज भर होत असते. ग्रामस्वराज्य समितीचे कार्य जरी मंदावले असले तरी आम्ही कार्यकर्ते धीर धरून आहोत, आमचे मनोधैर्य खचलेले नाही.

मु. करडे, पो. तुळाजे
ता. तळोदे, जि. धुळे.



# हलबांच्या सवलती आणि आदिवासींचा विकास

**मदन धवकर**

महाराष्ट्रासाठी असलेल्या अनुसुचित जमातींच्या यादीत ४७ जमाती असून त्यापैकी १८ जमाती आज अस्तित्वात नाहीत. अशा वेळी अस्तित्वात नसलेल्या जमातींच्या नावावर सवलती उपटण्याच्या गैरव्यवहारास उत आला आहे. म्हणून या यादीचे पूर्ण संशोधन व छाननी करून नवीन यादी तयार करण्यात यावी अशी मागणी आदिवासींचे झुंझार नेते आमदार बाबूराव मडावी यांनी केली.

### नवी यादी तयार करा

नवी यादी मूळ प्राचीन जमातींची असेल व त्यामुळे अनेक वाद संपुष्टात येतील असेही श्री. मडावी म्हणाले. आदिवासींमधील विभिन्न जातीजमातींतील सामंजस्य एकात्मता प्रस्थापित झाली पाहिजे असे प्रतिपादन करून ते म्हणाले, शासकीय मागासवर्गीय वसतीगृहात सर्वांना प्रवेश मिळावा म्हणून शासनाने परिपत्रक काढून कोणत्याही एका जातीस वा जमातीस ३० टक्केपेक्षा अधिक जागा न देण्याचा नियम केला आहे. हा नियम सर्वच बाबतीत लागू केला तर सर्व जातीजमातींची प्रमाणशीर प्रगती होईल व परस्पर वैमनस्यास कुठेही जागा उरणार नाही.

जाती जमातींच्या आधारावर मिळणाऱ्या सवलतीत एक विशिष्ट टक्केवारी सर्वांच्या संमतीने ठरवून घ्यावी त्या टक्केवारीवर त्या त्या सोईसवलतीच्या बाबतीत ती जात अथवा जमात आल्यावर तिचे नाव यादीतून काढून टाकावे म्हणजे तुलनेने मागे राहिलेल्यांना पुढे आपोआप जाता येईल.

आदिवासींच्या प्रगतीसाठी कृतीने वचनबद्ध असलेले पक्षातील सर्वात मोठे व विश्वसनीय नेतृत्व पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांचेच आहे, असे स्पष्ट मत देऊन सत्तेत आदिवासींना लाभलेल्या प्रतिनिधित्वाबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. महाराष्ट्र विधानसभेतील आदिवासी आमदारांची संख्या १६ वरून २३ वर आली असून एक मंत्री व एक राज्यमंत्री दिल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला. लोकसभेत ४० आदिवासी खासदार आहेत; पण राज्यसभा व विधानपरिषद यावरील प्रतिनिधित्वाचे खाते लवकरच उघडले जाईल अशी आशा व्यक्त केली. महाराष्ट्राची लोकसंख्या सध्या ६,२७,८४,१७१ असून आदिवासींची लोकसंख्या ५७,७२,०३८ एवढी म्हणजे ९ टक्के आहे.

### आदिवासी उपयोजना

आदिवासींच्या सर्वांगीण विकासाकरिता केंद्र सरकारच्या निर्देशाप्रमाणे १९७६–७७ पासून आदिवासी उपयोजना सुरू करण्यात आली आहे. ५० टक्क्यांपेक्षा अधिक लोकसंख्या आदिवासींची असल्यास असे क्षेत्र उपयोजनाक्षेत्र धरून त्यातील आदिवासींचा व परिसराचा सर्वांगीण विकास यात अभिप्रेत आहे. योजनेच्या अंमलबजावणीवर १९८३–८४ पर्यंत ३८९ कोटी ३० लक्ष खर्च झाला आहे. १९७६–७७ पासूनचे चढत्या भाजणीचे खर्चाचे आकडे देऊन श्री. मडावी पुढे म्हणाले प्रत्यक्षात या योजनेत क्षेत्रविकासास प्राधान्य मिळून आदिवासींच्या वैयक्तिक व कौटुंबिक विकासाकडे दुर्लक्ष झाले आहे. उपयोजनेने एक प्रकारे नवे क्षेत्रबंधन

कायम केले असून उपयोजनेबाहेरील आदिवासींच्या विकासाचे काय असा प्रश्न उपस्थित केला आहे.

महाराष्ट्रात ५७ लक्ष आदिवासी आहेत. यांपैकी २३ लक्ष उपयोजना क्षेत्रात येतात. त्याबाहेर ३४ लक्ष राहतात. उपयोजनेवर अवाढव्य खर्च करूनही विकासापासून वंचित उपेक्षित राहिलेल्या आदिवासींचे काय ? आदिवासी उपयोजनेत होणाऱ्या खर्चापैकी ७० टक्के क्षेत्रविकासावर खर्च होतो. ३० टक्क्यांपैकी २० टक्के आश्रमशाळांवर खर्च होतो, फक्त १० टक्के वैयक्तिक व कौटुंबिक विकासावर खर्च होतो. व्यक्तिगत व कौटुंबिक लाभार्थी अतिशय कमी आहेत. यावर लक्ष वेधून श्री. मडावी पुढे म्हणाले, महाराष्ट्रात ११ लक्ष ४० हजार आदिवासी कुटुंबे आहेत. यापैकी सवलतीच्या दराने बी-बियाण्यांची प्राप्ती, बैलजोडी व दुभत्या जनावरांसाठी व्यवस्था आणि विजेचे पंप आदि कौटुंबिक लाभार्थी योजनेखाली १९८३–८४ पर्यंत ५१६०० कुटुंबांना याचा फायदा फक्त मिळाला आहे. उरलेल्या कुटुंबांना याचा स्पर्श होण्यास किती अवधी लागेल ?

## आरक्षणातील परवड

अनुसूचित जमातींच्या यादीतील अनेक जमातींच्या नावांचा फायदा घेऊन गैरआदिवासींनी खऱ्या आदिवासींना प्रगतीपासून वंचित ठेवले असा स्पष्ट आरोप करून श्री. मडावी म्हणाले, महाविद्यालये आणि विद्यालये यातील प्रवेश आणि रोजगारी यात कोष्टच्यांनी हलबांच्या, धनगरांनी धनवर नावाखाली, तेलगू शिंप्यांनी छत्री म्हणून, तेल्यांनी तिरुमल म्हणून, राजपुतांनी ठाकूर नावाखाली, धोबी यांनी धोबा म्हणून, खैरे कुणब्यांनी खैरवार किंवा खरिया म्हणून तर समुद्रकाठच्या मच्छिमार लोकांनी एमकोळी ( मुंबईचा परिसर ) म्हणून सवलती उपटल्या आहेत. उपलब्ध माहितीनुसार सुमारे ३२ जमातींनी आदिवासी जमातींच्या यादीतील नावांचा उल्लेख करून गैरमार्गाने स्वार्थ साधला. यामुळे शिक्षणसंस्थांतील प्रवेश व नोकऱ्या यातील आरक्षणात खऱ्या आदिवासींची प्रचंड वाढ झाली.

यावर विदारक प्रकाश टाकताना श्री. मडावी यांनी सादर केलेली आकडेवारी चिंतनीय आहे. १९८१ ते ८३ या काळात मेडिकल कॉलेजेसमध्ये आदिवासींकरिता १६४ जागा राखीव होत्या. या भरलेल्या सर्व जागात खरे आदिवासी फक्त २४ निघाले. याच काळातील इंजिनिअरिंगमधील आरक्षित १२२ जागात खरे आदिवासी फक्त २८ निघाले. निरनिराळ्या इतर शिक्षणसंस्थात १९८१–८२ मध्ये प्रवेश घेतलेल्या ३७२ आरक्षित जागांपैकी ५६ खऱ्या आदिवासींना मिळाल्या १९८२–८३ मध्ये ३१८ जागांपैकी ४८ खऱ्या आदिवासींना प्राप्त झाल्यात म्हणजे ६१० जागांपैकी १०४ जागाच खऱ्या आदिवासींना प्राप्त झाल्या. महाराष्ट्र लोकसेवा आयोगान्तर्गत व पॉलिटेक्निकमधील उपलब्ध २२२ जागांपैकी डिसेंबर १९८३ अखेर फक्त ५६ खऱ्या आदिवासींनाच नोकऱ्या मिळाल्या. उपजिल्हाधिकारी व तहसीलदारांच्या ३६० जागांपैकी खऱ्या आदिवासींना फक्त २० जागा मिळाल्या. म्हणजेच एकूण १२७२ जागांपैकी आदिवासींना १८० जागा प्राप्त झाल्यात.

## छाननी समिती

आदिवासींच्या नावावर प्राप्त सवलती खऱ्या आदिवासींनाच मिळतात किंवा नाही याची पाहणी व छाननी करण्यासाठी १९८० साली महाराष्ट्र शासनाने समिती नेमली. यात आपला अंतर्भाव नव्हता हे स्पष्ट करून श्री. मडावी म्हणाले, यात समाजकल्याण खात्याचा संचालक, आदिवासी संशोधनसंस्था पुणेची प्रतिनिधी आणि कर्वे समाजकार्य संस्थेतील मानववंश शास्त्रज्ञ यांचा समावेश होता. या शासकीय समितीने व्यक्तिगत मुलाखती घेऊन शास्त्रीय कसोटीवर छाननी केली. या छाननीतील जमातवार बोगस आकडे आपल्याजवळ उपलब्ध असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. यानंतर २९ ऑक्टोबर १९८० चा जी. आर. निघाला.

## खऱ्या हलबांची संख्या

विदर्भातील खरे हलबा व कोष्टी किती याची संख्या निश्चित कळावी म्हणून भोपाळ येथून पुराणवस्तू संशोधन विभागात उपलब्ध आकडेवारी आपण आणली आहे असे श्री. मडावी म्हणाले. जुन्या मध्यप्रदेशाशी या गोष्टीचा संबंध असल्यामुळे १९३१ साली झालेल्या जनगणनेतील आकडेवारी त्यांनी सादर केली. यात स्पष्ट कोष्टी व हलबा अशी नोंद असल्याचे त्यांनी सांगितले. या आकडेवारीनुसार नागपूर जिल्ह्यात ४७१४९ कोष्टी तर ५२३ हलबा, वर्धा जिल्ह्यात ७४८७ कोष्टी तर १२२७ हलबा, चांदा जिल्ह्यात १३५६६ कोष्टी तर ३२८७ हलबा, भंडारा जिल्ह्यात १८७५२ कोष्टी तर १९२३३ हलबा. अमरावतीत ६७७७ कोष्टी तर २३२९ हलबा, अकोला जिल्ह्यात

१९५६ कोष्टी तर ४८२ हलबा. बुलढाणा जिल्ह्यात ७३५ कोष्टी तर २० हलबा आणि यवतमाळ जिल्ह्यात ३०३८ कोष्टी तर १०६७ हलबा असल्याची नोंद आहे.

भारतातील लोकसंख्यावाढीचे प्रमाण ( सामान्यतः २२ टक्के ) लक्षात घेऊन विचार केला तर कोष्ट्यांची लोकसंख्या ३ लक्ष तर खऱ्या हलबांची संख्या ७६ हजार भरते. धंद्यावरून जाती आल्या हे स्पष्ट असताना कोष्टी जात नाही, व्यवसाय आहे हे म्हणणे सयुक्तिक आहे काय असाही प्रश्न त्यांनी पुढे केला. रसेल व हिरालाल यांनी कास्टस् अँन्ड ट्राईब्ज ऑफ सेन्ट्रल प्रोव्हिन्सेस अँड बेरार या ग्रंथाच्या ३ ऱ्या भागात प्रत्येक जातीचे वर्णन केले आहे. पुढे वेरियर एल्विन यांनीही लिहिले आहे. त्याचा आधार घेतला तर गैरसमज राहणार नाही. खऱ्या हलबा समाजातील जमीनदाऱ्या होत्या हे सांगून ते म्हणाले, चंद्रपूर जिल्हा परिषदेचे पहिले समाजकल्याणसभापती स्व. रामदासबापू प्रधान सोनसरीचे जमीनदार होते. ते हलबा होते. धानोरा तालुक्यातील पेंटरी येथील जमीनदार श्री. जयरामबापू पवार, भंडारा तालुक्यातील डव्वा येथील श्री. जीवनबापू कुसंगी, कुरखेडा विकासगटातून निवडून आलेले माजी जि. प. सदस्य श्री. रघुनाथ चवारे व आजचे मध्यप्रदेशातील वित्तमंत्री श्री. छनकलाल भेडिया हे सारे हलबा होते व आहेत.

## अनेक जी. आर.

कोष्टी समाजाने रसेलच्या खंड ३ पान ५८२ वरील एका वाक्याचा आधार घेतला आहे असे सांगून आ. मडावी यांनी ते वाक्य 'हलबीज अॅपीअर टू बी अॅन ऑफ शूट ऑफ प्रिमिटिव्ह हलबा ट्राईब हू हॅव टेकन टू विव्हिंग' याचा आधार घेताना विणकरातील गडेवाल, सालेवार, लाड, देवांगण, कुचीवाले, पद्मशाली व मराठा कोष्टी इत्यादी जातींचे व पोटजातींचे काय ? आज सवलती मागणाऱ्याचे आजोबा कोष्टी, वडील हलबा कोष्टी तर मुलगा हलबा असा प्रवास आपणास दिसतो. त्यानंतर यासंबंधी वेळोवेळी निघालेल्या विविध अनुकूल प्रतिकूल जी. आर. चा आढावा घेऊन श्री. मडावी म्हणाले की, शासनाने २० जुलै १९६२ रोजी काढलेल्या परिपत्रकाप्रमाणे कोष्टी हलबा म्हणून फायदा घेत होते. त्यानंतर २२ ऑगस्ट १९६७ रोजी नवा जी. आर. काढून शासनाने अगोदरचा जी. आर. परत घेतला. त्यानंतर श्री. रंभाड नावाच्या उपसचिवाने आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करून २७ सप्टेंबर १९६७ रोजी नवे परिपत्रक काढून अनुसूचित जमातीसाठी असलेल्या सर्व सवलती हलबा कोष्टी यांना द्याव्यात असे सुचविले. हा जी. आर. श्री. शंकरराव चव्हाण मुख्यमंत्री असताना आदिवासी सल्लागार परिषदेच्या शिफारशीने घटनेच्या ५ व्या शेडयूलनुसार ४ ऑगस्ट १९७६ रोजी नवीन जी. आर. काढून रद्द केला. तरीदेखील गैरआदिवासींकडून घेण्यात येणाऱ्या गैरफायद्यास आळा घालण्याकरिता ज्येष्ठ आय. ए. एस. अधिकारी श्री. श्रीनिवासन यांच्या अध्यक्षतेखाली समिती तयार करण्यात आली. समितीने सतत तीन महिने बैठकी घेऊन व अभ्यास करून २९ ऑक्टोबर १९८० चा जी. आर. काढला. त्यावर श्री. ए. आर. अंतुले मुख्यमंत्री असताना राजकीय दबाव आणून ३१ जुलै १९८१ चा नवा जी. आर. पुढे निघाला; पण हा जी. आर. म्हणजे जुन्या जी. आर. चे शुद्धिपत्र नसून स्वतंत्र जी. आर. आहे व त्यातील उल्लेख स्पष्ट आहे असेही ते म्हणाले.

## कोष्टीविरोधी नाही

आपण कोष्टीसमाजाचा कधीही विरोध केला नाही व करण्याचे कारण नाही. शासनाने त्यांना हव्या तेवढ्या सवलती स्वतंत्रपणे द्याव्यात. फक्त ते हलबा म्हणजेच आदिवासी नाहीत व त्या नावावर त्यांनी सवलती घेऊ नये एवढेच आपले म्हणणे आहे. याचा ठाम पुनरुच्चार करून श्री. मडावी म्हणाले, अनुसूचित जाती जमातींची यादी भारतीय राज्य घटनेने १९५० साली राष्ट्रपतींच्या आदेशाने प्रसृत केली आहे त्यात फेरबदल करण्याचे अधिकार राज्यसरकारला नाही. फक्त संसदेला आहे. हा प्रश्न भारतीय घटनेच्या सन्मानाचा व सामाजिक न्यायाचा आहे. मानव वंश शास्त्र व इतर मार्गांनी उपलब्ध पारंपारिक शास्त्राच्या पालनाचा आहे. हा प्रश्न केवळ आर्थिक मदत व सवलती यांचा नाही हे सर्वांनी समजून घ्यावे.

आदिवासी उपयोजना क्षेत्राचा विकास करताना ६० टक्के क्षेत्र विकासावर खर्च व्हावा तर ४० टक्के रक्कम कौटुंबिक व वैयक्तिक लाभासाठी खर्च व्हावी या तत्त्वास १६ जून १९८३ रोजी मुख्यमंत्र्यांचे निवासस्थानी झालेल्या सभेत मान्यता देण्यात आली. आदिवासी आमदारांची ही सभा मुख्यमंत्र्यांचे अध्यक्षतेखाली भरली होती. त्याची त्वरित अंमलबजावणी होईल अशी आशा आ. मडावी यांनी व्यक्त केली. ❋

( दै. लोकमत, नागपूरच्या सौजन्याने )

# आदिवासी सेवा व मसूद-प्रकरण

**( कै. नानासाहेब ठकार यांच्या भिल्लसेवेच्या कार्यातील त्या वेळचे गाजलेले मसूदप्रकरण 'देशाचा संसार' या साधना प्रकाशनाने प्रसिद्ध केलेल्या पुस्तकावरून येथे पुनर्मुद्रित केले आहे. त्या वेळच्या अधिकाऱ्यांनी आदिवासी भिल्लांचा कसा छळ चालवला होता व नानांसारखे कार्यकर्ते या अन्यायाविरुद्ध कसे झगडत होते याची कल्पना यावरून वाचकांना येईल. )**

पश्चिम खानदेश (धुळे) जिल्ह्यात १९२३ सालापासून ते १९४८ पर्यंत नानांनी ग्रामसेवा, खादीप्रसार, काँग्रेसकार्य, आदिवासीसेवा अशा विविध प्रकारे सार्वजनिक कार्य केले. प्रथमपासून जिल्ह्यात मोठ्या संख्येने, म्हणजे एकंदर लोकसंख्येच्या जवळजवळ एकतृतीयांश इतक्या संख्येने, असलेल्या आदिवासी भिल्लांच्या दु:स्थितीकडे त्यांचे लक्ष वेधले गेले होते. सुमारे १९३७ सालापासून तर त्यांनी जवळजवळ पूर्णपणे भिल्लसेवेसाठीच स्वत:ला वाहून घेतले होते. १९४२–४३ च्या 'चले जाव' चळवळीमध्ये या कार्यात काही खंड पडला असेल तेवढाच.

नानांच्या या कार्याचे विविध स्वरूप होते. सातपुड्याच्या पहाडी व जंगलमय प्रदेशात राहणाऱ्या भिल्ल जमातींचे प्रश्न त्यांनी प्रत्यक्ष निरीक्षणाने समजून घेतले त्यातील एका खेड्यात स्वत:च सहकुटुंब राहून त्यांनी ते जीवन अनुभवले. १९३८ मध्ये पश्चिम खानदेश भिल्ल–सेवा मंडळ' या संस्थेची स्थापना केली व तिच्याकरवी भिल्लांसाठी शाळा व छात्रालये उघडणे, वैद्यकीय मदत, धान्यपुरवठा व समाजजागृती करणे, सभा–परिषदा घडवून अखिल भारतीय पुढाऱ्यांचे भिल्लांच्या प्रश्नाकडे लक्ष वेधणे, सावकारी पाश व दारू यांपासून त्या समाजाची मुक्तता करणे अशा अनेक आघाड्यांवर काम केले. भिल्लांच्या प्रश्नांसाठी परकीय सरकारच्या व स्वकीय सरकारच्याही दरबारी झगडणे हा या कार्याचा महत्त्वाचा भाग होता.

जिल्ह्यातील भिल्लवस्ती प्रामुख्याने असलेल्या विभागाला १९३५ च्या कायद्यान्वये सरकारने 'अंशत: वगळलेला विभाग' केले होते, व त्यांच्या कल्याणासाठी एक खास अधिकारी नेमावयास सुरुवात केली होती. वास्तविक हा अधिकारी सरकारच्या बॅकवर्ड क्लास खात्यातील असावयास पाहिजे होता; परंतु सरकारच्या अनेकवारच्या अजब न्यायाप्रमाणे, रेव्हेन्यू खात्यातील प्रांतऑफिसर व सबडिव्हिजनल मॅजिस्ट्रेट असलेला अधिकारी नेमण्याची प्रथा पडली. हरघडी सत्ता गाजविणारी ही माणसे भिल्लांची सेवा करतील अशी अपेक्षा करणेंच चुकीचे झाले असते. अधिकारशाही, जुलूम–जबरदस्ती, लहरीपणा, विटंबना, अत्याचार यांचा नंगा नाचच सुरू झाला. १९४२ पासून सुमारे तीन वर्षे या जागेवर असलेल्या एम. मसूद या आय. सी. एस. अधिकाऱ्याने केलेल्या लीला व त्याविरुद्ध भिल्लसमाजाच्या बाजूने कित्येक वर्षेपर्यंत अनेक प्रकारे व अनेक पातळ्यांवर नाना व त्यांचे सहकारी यांनी दिलेली लढत, यांनी हे 'मसूद–प्रकरण' गाजले. सार्वजनिक कार्यकर्त्यांचे धैर्य, धाडस, चिवटपणा, अमर्याद कष्टांची तयारी या सर्वांची येथे कसोटी लागली. सत्तेतून नव्हे तर सेवेतून समाजहित करू पाहणाऱ्या कार्यकर्त्यांच्या वाट्याला येणारे अपमान, उपेक्षा, निराशा, हेत्वारोप, एकाकीपणा इत्यादी सर्वांची येथे रेचचेल होती. नानांच्या आयुष्यातील हे एक अतीव मनस्ताप देणारे प्रकरण ठरले. विद्यार्थीदशेपासून ज्या स्वातंत्र्याचा त्यांनी ध्यास घेतला होता व जे मिळविण्याचा मार्ग म्हणून निष्ठेने व परिश्रमाने सेवाव्रत चालवले होते, ते स्वातंत्र्य मिळाले, लढ्यात बरोबर असलेले सहकारी मानाच्या व अधिकारांच्या जागांवर जाऊन पोचले, तरी त्यांना अपेक्षित असलेला स्वच्छ व मूलभूत न्याय मिळाला नाही. जितपत होऊ शकले तेवढ्यावरच त्यांनी व जिह्यातील जनतेने संतुष्ट न राहणे म्हणजे हेकटपणा आहे असा सल्लाही त्यांना मिळाला.

त्या काळची भिल्लाची समाजस्थिती आणि नानांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी चालवलेले सुधारणेचे प्रयत्न व त्यात त्यांना मसूद–महाशयांचा अवतार होण्यापूर्वी-पर्यंत आलेले यश, याची थोडी फार माहिती झाल्या-नंतरच मसूद–प्रकरणाचे रहस्य कळू शकेल. १९२६ साली स्वतः भिल्ल भागात फिरून व अनुभव घेऊन त्यावर आधारीत असा लेख नानांनी प्रसिद्ध केला होता, त्याचा सारांश खाली प्रथम दिला आहे. पुढील दहा वर्षांत तरी या स्थितीत फारसा काहीच फरक पडला नव्हता. नानांची भिल्लसेवेबद्दलची भूमिका स्पष्ट करणारा एक उतारा नंतर दिला आहे. त्यापुढे मसूद महाशयांचा अवतार होण्याच्या वेळेपर्यंतच्या भिल्ल सेवा मंडळाने घडविलेल्या भिल्ल जागृतीविषयी थोडक्यात माहिती दिली आहे. ही माहिती मंडळाच्या १९४२ च्या अहवालातून घेतली आहे. त्यानंतरचा मसूद प्रकरणाचा सारांश या विषयावरील उपलब्ध कागदपत्रे, माहिती, पत्रव्यवहार व नानांची स्वतःची टाचणे यावर आधारित आहे.

## भिल्लांची समाजस्थिती

'पश्चिम खानदेश जिल्ह्याच्या एकंदर साडेसात-लाख लोकसंख्येपैकी सुमारे अडीच लाख भिल्ल आहेत. यामध्ये मावची, गावीत, पाडवी, वसावे, वळवी, पावरा, कोकणी इत्यादि जातींचा समावेश होतो. सातपुडापर्वताच्या आसपासच्या भागात, डांग भागात व सर्वसाधारणपणे जिल्ह्याच्या पश्चिम भागात, असा बराचसा प्रदेश आहे की, जेथे बहुतेक सर्व भिल्लांचीच वस्ती आहे. भिल्ल समाजाची सामान्य स्थिती फार केविलवाणी आहे. अशी किती तरी गावे सापडतील की, ज्यात एकही साक्षर मनुष्य नाही. असा एकही मनुष्य सापडावयाचा नाही की, ज्याची शेंडी साव-काराच्या हातात नाही. हे लोक स्वतः लंगोटी लावून उघडेवाकडे फिरतील; पण दुसऱ्याच्या एका चिंधीलाही हात लावणार नाहीत. स्वतः बंटी, कोदरा, नागली इत्यादि वन्य व काही अंशी विषारी अशा धान्याची रोटी करून खातील किंवा घाटा करून पितील; पण सरकारी, अबकारी, सावकारी वगैरे कामांसाठी आलेल्या यःकश्चित माणसालासुद्धा चांगले निवडून, कांडून, सडून तयार केलेले डाळ, तांदूळ, तेल, तूप, पीठमीठ देतील. वधस्तंभाजवळ नेलेले मेंढरू जसे दीनवाण्या स्थितीत असलेले आढळते, तद्वतच ही माणसे विशेषतः सावकाराच्या दाराशी बसलेली दिस-तात. जे पिकेल ते सर्व आपल्या सावकाराच्या घरी आणून टाकावयाचे व मग बियाणे, इतकेच नव्हे तर संसारखर्चास लागणारे किरकोळ द्रव्यही, सावकारा-पासून घ्यावयाचे... मद्यपान सर्रास केले जाते...दारू-मुळे लोक कर्जात इतके बुडून गेले आहेत की त्यातून आपला उद्धार होईल अशी आशाही त्यांना वाटेनाशी झाली आहे.

या समाजाची सेवा करू इच्छिणाऱ्यांनी आपली शक्तिबुद्धी प्रथम प्रामुख्याने दारूबंदीच्या कार्यातच खर्चिली पाहिजे. कारण या समाजातील अनेक दोषांच्या मुळाशी त्यांचे दारूचे व्यसनच आहे. भिल्ल साधू श्री गुलामहाराज यांनी आपल्या समाजातून दारूचे उच्चा-टन करण्याचा जो यशस्वी प्रयत्न केलेला आहे, त्यावरून त्यांनी आपल्या समाजाची नाडी बरोबर ओळखली हीच गोष्ट सिद्ध होत आहे. मिशनऱ्यांनी भिल्ल समाजात जारीने कार्य चालविले आहे...उलट-पक्षी, एतद्देशीय लोकांनी मात्र आपल्या या लाखो देशबांधवांच्या कल्याणार्थ तनमनधनादि साधनां-द्वारा मदत करू नये, इतकेच नव्हे तर त्यांच्या अज्ञा-नाचा व भित्रेपणाचा यथास्थित फायदा घेण्यासाठी त्यांना पिळून काढावे व आपली तुंबडी भरावी ही अत्यंत लाजिरवाणी गोष्ट होय.'

## भिल्लसेवेबद्दलची नानांची भूमिका

विद्यानिधी सिद्धेश्वरशास्त्री चित्राव यांच्या 'भारत-वर्षीय अर्वाचीन चरित्रकोशा' तील नानांच्या चरित्रात त्यांच्या भिल्लविषयक भूमिकेबद्दल पुढीलप्रमाणे उल्लेख आहे :

'१९३५ च्या कायद्यानुसार देशावर लादलेल्या घटनेत संपूर्ण वगळलेले व अंशतः वगळलेले असे देशाचे विभाग पाडण्यात आले होते. देशाचे अखंडत्व व ऐक्य या दृष्टीने यांना (नानासाहेबांना) असे करणे राजकीय कावा वाटला आणि यांनी आपल्या कार्याची दिशा लागलीच बदलून भिल्ल समाजाची सेवा करण्याचा निर्णय घेतला...

... सरकारकडून भिल्लांच्या उत्कर्षाकरिता प्रयत्न चालू आहेत; पण ते राष्ट्रीय वृत्तीच्या लोकांना पसंत नाहीत. कायद्याने त्यांना अलग करून संस्कृतीनेही

त्यांना अलग करण्याचे सरकारी धोरण त्यात दिसते... ... त्यांनाच जगापासून अलग ठेवण्याचे असे प्रयत्न होणे अनिष्ट आहे असे यांचे मत आहे. या एका विशिष्ट दृष्टीने काम करणारे यांच्यासारखे लोकच सध्याच्या काळातील खरे राष्ट्रीय मिशनरी होत.'

## भिल्ल सेवामंडळाचे कार्य

**' शिक्षणाचा प्रसार :** मंडळाने भिल्लटापूतील दूर-दूरच्या खेड्यांतून उघडलेल्या प्राथमिक शाळांची संख्या १२० होती. एकंदर विद्यार्थ्यांची संख्या ५१८९ होती. पैकी ७३९ मुली होत्या.

सध्या तीन रात्रीच्या शाळा चालू असून त्यात ४५ प्रौढ लोक शिक्षण घेत आहेत.

शाळा चालविण्याच्या कामातील अडचणी : मलेरियाने दूषित हवापाणी, वाहतुकीच्या साधनांच्या अभावी दूरदूरच्या खेड्यांत शिक्षकांस भोगाव्या लागणाऱ्या सांसारिक अडचणी, अव्वल दर्जाच्या व सेवाप्रवण शिक्षकांची उणीव, शिक्षकांस आकर्षक वेतन देण्याची मंडळाची असमर्थता.

**वाचनालये :** शहादे व तळोदे तालुक्यांत पुस्तके दिली जातात. नंदुरबार तालुक्यात वाचनालये उघडण्यात आली आहेत.

**छात्रालये :** तळोदे येथे एक मुलांचे व एक मुलींचे (शबरी कन्या मंदिर) अशी दोन छात्रालये उत्तम प्रकारे चालविली आहेत. त्यात २५ विद्यार्थी व १८ विद्यार्थिनी शिकत आहेत.

**उद्योगमंदिर :** बऱ्याच शाळांतून सूत कातण्याचे व नंदुरबार येथील उद्योगमंदिरात कापूस पिंजण्याचे व पेळू करण्याचे काम केले जाते.

**आरोग्यसेवा :** शाळांतून ठेवलेल्या औषधाच्या पेट्यांचा फायदा गतसाली ५७७० रोग्यांनी घेतला. दोन गावी पिण्याच्या पाण्याची सोय केली.

**आर्थिक मदत :** शेकडो मुलांना पाठ्यपुस्तकांअभावी किंबहुना कपड्यांच्याही अभावी, शाळेत येणे अशक्य होऊन जाते, अशा मुलांना मदत दिली जाते.

**धान्यकोठारे :** नवापूर पेट्यात दोन व तळोदे तालुक्यात एक अशी तीन धान्यकोठारे ( Grain-Banks ) मंडळाने स्वखर्चाने चालविली आहेत. इतर चार गावी स्थानिक भांडवलावर अशी कोठारे चालविण्यास उत्तेजन दिले आहे.

**दारूबंदी :** काँग्रेस मंत्रिमंडळाने या बाबतच्या प्रचारार्थ खास ग्रँट दिली होती. त्यामुळे व भिल्ल साधू श्री गुलामहाराज यांनी भिल्ल समाजात दारूबंदीला जे अपूर्व चालन दिले त्यामुळे, या प्रकरणी महत्त्वाची कामगिरी मंडळ बजावू शकले

**इतर सेवा :** अत्यंत घातुक अशी 'झगड्याची पद्धती' नष्ट करणे, रोग–निवारणार्थ 'डाकीण' नावाखाली स्त्रियांना छळण्याची भगतलोकांची अघोरी-पद्धती बंद करणे, कायद्याची व योग्य सल्लामसलतीची मदत घेणे इत्यादि विविध कामे मंडळास प्रसंगानुसार करावी लागतात.'

## मसूद–प्रकरण

१९४२ च्या नोव्हेंबरमध्ये सरकारने श्री. एम्. मसूद या आय्. सी. एस्. अधिकाऱ्याची ' स्पेशल भिल्ल अपलिफ्ट ऑफिसर ' म्हणून नेमणूक केली. या अधिकाऱ्याने प्रथम प्रथम अरेरावी करून का होईना, एकदोन चांगल्या गोष्टी केल्या. नंतर त्याने एकीकडे भिल्लांची अनेक प्रकारे विटंबना, तर दुसरीकडे नानासाहेबांसारख्या कार्यकर्त्यांना छळणे, हे प्रकार सुरू केले. त्या काळात बॅ. जिनांची मुस्लिम लीग आकार घेऊ लागली होती. मसूदने 'खानदेश भिल लीग' अशी संस्था स्थापण्याचा घाट घातला. या नावाला काही सुशिक्षित भिल्लांचा विरोध पहाताच अकांडतांडव करून त्याने 'खानदेश भिल संघ' स्थापन केला व आपल्या ताटाखालची मांजरे तयार केली. भिल्लांचे राष्ट्रगीत व निशाण करविले. निशाणावर ७८६ आकडा घातला. त्यांची 'राम राम' म्हणण्याची पद्धती बंद करून त्यांनी 'जय भील' म्हणावे म्हणून जबरदस्ती सुरू केली. भिल्ल मुलांसाठी एक बोर्डिंग सुरू केले. त्यात ज्या मुलांचे कपडे खादीचे दिसले, त्यांना धारेवर धरले.

आपल्या अधिकाराच्या जोरावर आणि काही स्वार्थी आणि लाचार भिल्लांना हाताशी धरून मसूदने नाना व त्यांचे सहकारी यांच्या विरुद्ध रान उठवले आणि त्यांना 'हिंदूंचे पुढारी' ठरविण्याचा प्रयत्न केला.

भिल्लांचा वंश व संस्कृती भारतीय जनतेपेक्षा वेगळी आहे व त्यांच्या पुरातन चालीरीती ( दारू पिण्यासह ) तशाच चालू राहाणे आवश्यक आहे, असा त्याचा प्रचार सुरू झाला. मानववंशशास्त्राच्या नावाखाली भिल्ल स्त्री-

पुरुषांचे निरनिराळ्या अवस्थांत फोटो व फिल्म्स घेणे, त्यांच्या नाक–कान–कवट्यांची मापे घेणे, अशा गोष्टींचा धडाका सुरू झाला. भिल्ल स्त्रियांना बळजबरीने उरोभाग उघडे करावयास लावावयाचे, लगट करून स्वतःच त्यांच्या अंगावरील वस्त्र दूर करावयाचे व अशा अवस्थेत त्यांना नृत्य करावयास लावायचे, असे प्रकार सुरू झाले. पुरुषांना केवळ लंगोटीनिशी नृत्यात भाग घ्यावयास लावायचा, नदीमध्ये त्यांची अंगे चोळून स्त्रिया त्यांना आंघोळ घालीत आहेत अशा दृश्यांचे फोटो घ्यावयाचे, पतिपत्नींचे जमत नाही म्हणून नवरा–बायकोला जबरदस्तीने ओढून नेत आहे, हिंदू सावकार भिल्लांना लाथांनी तुडवीत आहे असे देखावे मुद्दाम करावयास लावून या सर्व दृश्यांचे फोटो व फिल्म्स घ्यावयाच्या, अशा गोष्टींना ऊत आला.

वरीलसारख्या, तसेच भिल्ल स्त्रियांशी मसूदने केलेल्या गैरवर्तनाच्या इतरही तक्रारी भिल्ल बांधवांकडून नानांकडे आल्या. त्यांनी सरकारकडे निवेदन सादर करून, तसेच अधिकाऱ्यांना व पुढाऱ्यांना भेटून, मसूदसाहेबाच्या वर्तनाची चौकशी करावी व त्यांना कडक शासन करावे अशी जोरदार मागणी व खटपट सुरू केली. त्यासाठी ते श्री. बाळासाहेब खेर (त्या वेळचे मुंबईचे मुख्यमंत्री–त्यांना पंतप्रधान म्हणत) यांना भेटले. त्यांनी सर्व प्रकरण सविस्तर पाहिले व मसूद आय. सी. एस. अधिकारी असल्यामुळे इतर अधिकारी त्याला पाठीशी घालण्याचा प्रयत्न करतील म्हणून या प्रकरणी वृत्तपत्रांतूनच ओरड करावी असा सल्ला दिला. काही वृत्तपत्रांच्या संपादकांना उद्देशून पत्रेही दिली. त्याच वेळी नानांनी हे प्रकरण सरदार पटेलांच्याही कानांवर घातले. सर्वांनीच आश्चर्य, दुःख व संताप प्रकट केला. तसेच अनेकांनी मसूदवरील आरोपांच्या संभाव्य परिणामांविषयी नानांना सावधही केले. एका पत्रात नाना म्हणतात,

## अल्लाबक्ष झाला तरी चालेल . . .

'या प्रकरणी माझाही 'अल्लाबक्ष' होईल अशी भीती कित्येक मित्राने प्रकट केली; परंतु भिल्ल बंधुभगिनींच्या अब्रूरक्षणार्थ काय वाटेल ते होवो या वृत्तीनेच मी हे प्रकरण हाती घेतले आहे.'

श्री. बाळासाहेब खेरांनी ज्या संपादकांना पत्रे दिली होती, त्यांपैकी कोणी त्या पत्रानुसार काम केले नाही. नाना लिहितात, 'शेवटी अगतिक होऊन मुंबईस भटकत असताना 'वंदे मातरम्' चा बोर्ड पाहून आत शिरलो व श्री. सामळदास गांधींनी स्वतंत्र बुद्धीने हिंमत केली.'

'वंदे मातरम्' पत्राने ऑगस्ट १९४५ मध्ये या प्रकरणाला मोठी प्रसिद्धी दिली, अग्रलेखही लिहिला. यामुळे खूपच खळबळ उडाली; पण सरकारने त्या प्रकरणाची न्याय्य बुद्धीने चौकशी केली नाही. उलट मसूद व त्याचे दोस्त यांनी आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करून ठिकठिकाणी जाबजबाब घेतले व सह्या मिळविल्या. तसेच काही इंग्रजी, मराठी व उर्दू–वृत्तपत्रांतून स्वतःच्या उदोउदो करणारे व नानांची भयंकर नालस्ती करणारे लेख छापविले. या सर्व खोट्या माहितीच्या आधारावर मुंबई सरकारने ऑक्टोबर १९४५ मध्ये एक खास प्रेसनोट प्रसिद्ध केली. या प्रेसनोटमध्ये सरकारने ज्या गोष्टी आपले अधिकृत मत म्हणून प्रसिद्ध केल्या, त्या वाचून कोणाही सहृदय माणसाचा न्यायावरील विश्वासच उडाला असता :

–मसूद यांनी भिल्ल अपलिफ्ट ऑफिसर या नात्याने केलेल्या कामाची सरकारने प्रशंसा केली

–त्यांच्यासंबंधी घेण्यात आलेले आक्षेप हे त्यांनी भिल्लांच्या आर्थिक कल्याणार्थ केलेल्या खटपटीमुळेच नाराज झालेल्या सावकारांच्या प्रेरणेच निर्माण झाले असून, ते 'सर्वथैव खोटे व निराधार' आहेत असे ठासून म्हटले, व

– या आरोपांबद्दल कोणत्याही तऱ्हेची चौकशी करण्याला सरकार तयार नाही, इतकेच नव्हे तर मसूद यांची जिल्ह्यातून बदलीही न करता, कलेक्टरचे पर्सनल असिस्टंट ही एक नवी जागा त्यांच्यासाठी निर्माण केल्याचे जाहीर केले !

ही प्रेसनोट म्हणजे सरकारचा सार्वजनिक कार्यकर्त्यांना व जनतेला खासा अहेर होता ! या प्रेसनोटच्या आधारे मसूदने आपल्या फोटोसह मोठी पत्रके तयार केली. ही पत्रके सर्व जिल्हाभर वाटण्यात आली व भिंतींवर डकविण्यात आली ! नानांच्या व त्यांच्याबरोबरच्या कार्यकर्त्यांच्या अब्रूंची लक्तरे वेशीवेशीवर टांगली गेली. जनमनाचा इतका उपमर्द क्वचितच झाला असेल.

इकडे महात्मा गांधींकडून नानांना खास निरोप येतच होते की हे प्रकरण तडीस लावा !

'पूज्य बापूजीकी साफ राय है कि हमे इस विषयको छोड देना न चाहिये।'

नानांचे जिवापाड कष्ट, भिल्लभागातील दौरे, मुलाखती, मसूदच्या गैरकृत्याविषयी माहिती व पुरावे जमविणे, सर्वच चालू होते. त्या वेळच्या एका पत्रात ते म्हणतात, 'प्रेसनोटने माझे मसूदवरील आरोप 'Completely false and without foundation' असे म्हटलेले माझ्या हृदयात शल्यासारखे टोचत आहे. या बेछूट प्रेसनोटने केवढे दुष्परिणाम जिल्ह्यास भोगावे लागत आहेत हे गव्हर्नरला कळवावे अशी माझी तळमळीची इच्छा आहे. तसा ड्राफ्ट तयार करण्याचा मी विचार करीत आहे; पण सध्या भयंकर थकवा आला आहे. तरी पण हा ड्राफ्ट लवकरच तयार करून आपले अवलोकनार्थ पाठविण्याचे योजिले आहे.'

प्रेसनोटचे शिफारसपत्र मिळाल्यानंतर मसूदसाहेब फारच शेफारले. जिल्ह्याचे नवीन आलेले कलेक्टर श्री. गॅलाघर, आय. सी. एस. व मसूद दोघेही नोव्हेंबर १९४५ मध्ये एक आठवडाभर सातपुड्यातील तोरणमाळ येथे थंड हवेत मौज मारण्यासाठी जाऊन राहिले. तेथे त्यांनी बराच आचरटपणा केला. गोरखनाथाच्या मंदिरात बुटांसह शिरणे, तेथील पुजाऱ्यांवर जबरदस्ती करून त्यांच्याकडून अंगमर्दन करून घेणे, नागार्जुनाच्या मंदिरातील पुरातन मूर्ती मुंबईच्या संग्रहालयात ठेवण्यासाठी हलविण्याचा प्रयत्न करणे, इत्यादि. भिल्लांनी साहेबांच्या खूप विनवण्या केल्या व आपल्या धार्मिक भावना दुखवू नयेत अशी विनंती केली. त्यांना बाजूला सारून तेथील ख्रिश्चनांकरवी मूर्ती हलविण्याचाही प्रयत्न झाला. याबाबतच्या तक्रारीची नानांनी स्वतः जाऊन शहानिशा करून घेतली व जाहीर सभा व वृत्तपत्रे यांतून त्यांचा परिस्फोट केला. त्या वेळच्या ९३ कलमी सरकारने मौन धारण केले. गॅलाघरने आरोप नाकबूल केले व उलट दमदाटी सुरू केली. जानेवारी १९४७ मध्ये त्याने बोलावल्यावरून नाना त्याच्या भेटीला गेले, त्या वेळचा प्रसंग त्यांच्याच शब्दात असा :

'मला त्याने शेकहँड करून खुर्चीवर तर बसवले; पण हे सर्व त्याने बटावणीच्या आवेशाने केले. यापुढील ४–५ मिनिटे त्याने मजशी इतक्या दटावणीच्या व धमकीच्या आवेशाने बोलण्यास सुरुवात केली की मी ताडकन् खुर्चीवरून उठून,

'I have not come to receive this treatment from you; I am not a man to be bullied like this Do whatever you like..'

असे म्हणून जावयास निघालो. त्याने अजीजी करून बसण्यास विनंती केली...'

मुलाखतीच्या वेळी बाहेर काही मित्रमंडळी आतुरतेने व वेळप्रसंग पडला तर हजर असावे अशा भावनेने आली होती! मुलाखतीत गॅलाघरने मालिश करून घेतल्याचे कबूल केले; पण इतर आरोपांबाबत उडवाउडवी केली.

## अखेर संबंध संपला

नानांनी या सर्व प्रकरणी चालू ठेवलेल्या चिकाटीच्या प्रयत्नांमुळे शेवटी निदान एक गोष्ट साध्य झाली मसूदची कुलाबा जिल्ह्यात बदली झाली. तेथेही त्याने काही चाळे केले, त्याचा श्री. रामभाऊ मंडलिक यांनी बोभाटा केला. तेव्हा तेथून अल्पावधीतच त्याची सिंधमध्ये हकालपट्टी झाली. मसूदची दुष्कीर्ती तोपर्यंत सिंधमध्येही पोचली होतीच. अशा माणसाला आपल्याकडे का घेतले म्हणून सिंध सरकारला जाब विचारण्याची तेथील कार्यकर्त्यांनी तयारी चालवली. सिंध प्रांतिक काँग्रेसपक्षाचे श्री. परशुराम ताहिलरामाणी यांनी मसूदच्या लीलांबद्दल व मुंबई सरकारने त्याबद्दल घेतलेल्या पवित्र्याबद्दल सविस्तर माहिती मिळवावी म्हणून नानांशी पत्रव्यवहारही सुरू केला. तेवढ्यात पाकिस्तान–निर्मिती होऊन मसूदचा व या देशाचा संबंध संपला!

परंतु नानांच्या व जिल्ह्यातील कार्यकर्त्यांच्या हृदयातील प्रेसनोटचे शल्य तसेच राहिले! 'ऑक्टोबर १९४५ मध्ये ९३ कलमी सरकारने काढलेली प्रेसनोट चुकीच्या माहितीवर आधारित होती, मसूदवर करण्यात आलेले आरोप खरे होते, म्हणून तो प्रेसनोट हे सरकार रद्द करीत आहे.' असे नवे ठणठणीत पत्रक सरकारने काढावे व त्याला जिल्ह्यामध्ये भरपूर प्रसिद्धी द्यावी अशी त्यांची मागणी होती. मसूदने काढलेले फोटो व फिल्म्स जप्त कराव्यात, म्हणजे त्यांचा प्रसार होण्याचा धोका राहणार नाही, अशीही त्यांची मागणी होती. जिल्ह्यातील अनेक जबाबदार कार्यकर्त्यांच्या सहीनिशी तशी पत्रेही सरकारकडे गेली होती. डोंडवे येथे मे १९४६ मध्ये 'पश्चिम भारत आदिवासी कार्यकर्त्यांचे संमेलन' झाले, त्यातही या प्रकरणाचा सरकारने फेरविचार करावा असे आग्रहाने सुचविण्यात आले व एक मेमोरॅण्डम् काँग्रेस मंत्रिमंडळास सादर करण्यात आला. या संमेलनाला अखिल भारतीय कीर्तीचे आदिवासी व हरिजन कार्यकर्ते, तसेच काँग्रेस-पुढारी हजर होते. मुंबईच्या असेंब्लीत प्रश्न विचारण्यात आले व त्यांची सरकारी खाक्याप्रमाणे सारवा-

सारवीची उत्तरेही देण्यात आली; परंतु सरकारने नवे पत्रक काढले नाही. यामुळे एक अनिष्ट परिणाम असा झाला की, नानासाहेबांची आता काय किंमत राहिली आहे असे भिल्ल भागातील उपद्व्यापी लोकांना वाट लागले व तसा ते प्रचार करू लागले ! नानासाहेबांवर व त्यांच्या सहकाऱ्यांवर खोटे खटले भरून त्यांचा छळ करणे सुरू झाले. निष्ठावंत व तत्त्वांचा आग्रह धरणाऱ्या कार्यकर्त्यांची त्यांच्या विरोधकांना व छुप्या हितशत्रूंनाच नव्हे तर मित्र म्हणवणाऱ्या पुढाऱ्यांनाही अडचण होत असते हेच दिसून आले.

### थंडपणे बोळवण

आदिवासी कल्याणाचे व्रत अंगीकारून नानांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी वर्षानुवर्षे कष्ट केले होते. राष्ट्रातील जनता व राष्ट्रीय विचारांचा प्रवाह यापासून भिल्लांना अलग पाडण्याचे प्रयत्न हाणून पाडावेत, व माणूस म्हणून जगण्याची त्यांची क्षमता व शक्यता वाढवावी, या विचाराने हे लोक प्रेरित झालेले होते. या दृष्टीने त्यांची चळवळ ही अखिल भारतात चाललेल्या कॉंग्रेस व गांधीप्रणीत चळवळीचाच एक भाग होता. तरीही या सर्व प्रयत्नांची कॉंग्रेस सरकारने, कॉंग्रेस पुढाऱ्यांनी व गांधीवादी प्रतिष्ठितांनी थंडपणे जी बोळवण केली, ती पाहिली म्हणजे विषाद वाटतो. भिल्ल भागात उभ्या केलेल्या चळवळीचे, व अखेर भिल्लांच्या कल्याणाचेच. आपण नाक ठेचत आहोत हे त्यांना कळले नाही.

मसूद प्रकरणी या लोकसेवकांनी जो मनस्ताप व ज्या हालअपेष्टा सहन केल्या, त्या सर्वांची एक मखळ अखेर खालील दोन पत्रांनी झाली असे म्हणावयास हरकत नाही.

### मुंबई सरकारकडून २९ एप्रिल १९४८ चे नानांना आलेले पत्र :

' ...No useful purpose will be served by making any public statement in this behalf at this late stage. This Government stated on the floor of the Legislative Assembly that it did not agree with the Press Note issued by the Section 93 regime. This Government does consider that the behaviour of these two officers was objectionable.'

( बरोबर आहे, योग्य वेळ होती त्या वेळी आपल्याच आय. सी. एस. अधिकाऱ्यांपुढे मान खाली घातली, आता फार उशीर झाला. जनतेची शक्ती अशा तऱ्हेनेच वाढत असते ! )

### नानासाहेबांकडून ४ मे १९४८ चे उत्तर :

' ..the concluding sentence is the only assuring statement, and under the circumstances I have to rest satisfied with the same. I therefore take this unhappy and unfortunately prolonged chapter to be closed.'

याचबरोबर नानासाहेबांच्या जीवनातील पश्चिम खानदेशचा अध्यायही संपला.

---

# आदिवासींसाठी स्वतंत्र न्याययंत्रणेची गरज

उल्हास देसाई

५ सप्टेंबर १९८३ रोजी दिल्लीच्या सर्वोच्च न्यायालयाने पाच आदिवासींना जामिनावर मुक्त केले. १९७९ साली कपडे चोरल्याबद्दल रायगडच्या जिल्हा न्यायाधिशांनी वीस वर्षे शिक्षा दिली. मध्यप्रदेशच्या जबलपूर उच्च न्यायालयाने नंतर एक वर्षाने त्यांना निर्दोष सोडून दिले. त्यावर सर्वोच्च न्यायालयात अपील केले. मधल्या काळात ते पाचही आदिवासी रायगडच्या जिल्हा तुरुंगात खितपत पडलेले होते.

आदिवासी जाती–जमातींना घटनेने मागास जमाती म्हणून मान्यता दिलेली आहे. सामाजिक–आर्थिकदृष्टचा या जाती इतर जातींच्या खूप पाठीमागे आहेत. गैरआदिवासी, शहरी, सुसंस्कृत जाती-जमातींशी त्यांचा संबंध नव्यानेच येऊ लागला आहे. आदिवासींच्या स्वतःच्या सामाजिक रूढी व नियम आहेत. या नियमांनी त्यांचे सारे आयुष्य बांधून टाकलेले असते. अनेकदा हे नियम शहरी–सुसंस्कृत जीवनप्रणालींमधील कायदेकानूंपेक्षा वेगळे असतात. कधीकधी ते थेट परस्परविरोधीदेखील असतात. जमातींचे नियम आणि तुमचे–आमचे कायदे यामध्ये असणाऱ्या एवढ्या टोकाच्या विसंगती आदिवासींना माहीतदेखील नसतात.

त्यामुळे आदिवासींच्या जिवावर बेतण्याची वेळ येते. आदिवासींचे कृत्य हे आपल्या कायद्याप्रमाणे गंभीर गुन्हा ठरतो व तो थेट गजाआड जातो. वास्तविक कोणत्याही गुन्ह्यामध्ये घटना जेवढी महत्त्वाची तेवढेच महत्त्व गुन्ह्याचा हेतू होता अथवा नाही याला असते.

आदिवासींचे हेतू तपासताना त्यांच्या सामाजिक रूढी व नियम लक्षात घेतले पाहिजेत. या आदिवासींना कायद्याचे संरक्षण कसे घ्यायचे हेही माहीत नसते. जमातीच्या प्रमुखाचा शब्द हा त्यांच्या दृष्टीने प्रमाण असतो आणि हा जमातीचा प्रमुख ही त्यांच्याइतकाच अज्ञानी असतो. मजुरी व जंगली चीजवस्तू विकण्याच्या निमित्ताने हल्ली-हल्ली या जाती-जमातींचा शहरांशी संबंध येऊ लागला आहे, याचे उदाहरण म्हणून ओरिसामधील आदिवासी जमातींमधील रूढी सांगता येतील. ओरिसा राज्यातील बोंडा जमातीमध्ये ताडीचे झाड हे कुटुंबातील मोठ्या मुलाची मालमत्ता समजली जाते. मग या झाडांवर दुसऱ्या कोणाचाही हक्क चालत नाही. अगदी त्याच्या बापाचादेखील. जो त्या झाडापासून ताडी काढण्याचा प्रयत्न करील त्याचा वध करण्याचा हक्क त्याला जमातीने दिलेला असतो. मग ताडी काढणारा त्याचा बाप का असेना ? बापाचा वध करून मोठ्या ऐटीत दोन्ही हातांवर प्रेत घेऊन तो जमातीच्या प्रमुखाकडे जातो व सांगतो 'पहा, माझ्या बापाने माझ्या झाडाची ताडी चोरली, मी त्याचा शेवट केला !' आणि आपला कायदा काय करेल ? कितीही सवलत द्यायची ठरवली तरी त्याचे बापाचा जीव घेणे हा खूनच ठरते. मग खुनाची ठरलेली शिक्षा त्याच्यापाठोपाठ चालत येते आणि कायद्याच्या नजरेत हा आदिवासी-हा शहरी असे नसते. कायदा माहीत नव्हता ही सबब चालत नाही. तरीदेखील एखाद्या शहरी माणसाने मालमत्तेच्या वादातून बापाचा शेवट करणे व झाडावरून ताडीचा वाद झाला म्हणून या आदिवासीने बापाला मारणे हे समान-एकसारखे होऊ शकते का हा प्रश्न उरतोच. मग आदिवासी जे फौजदारी गुन्हे करतात ते तुमच्या-आमच्या न्यायालयात चालावेत का ? का त्यासाठी एखादे स्वतंत्र न्यायालय किंवा आयोग वगैरे असावा ?


## सुधारण्याची संधी द्यावी

हल्लीच्या कायद्यात सोळा वर्षांखालील मुलांनी केलेल्या गुन्ह्याला स्वतंत्र न्यायालय असते त्याप्रमाणे हे नवीन न्यायालय असावे का ? त्यामुळे मग गुन्ह्यांसाठी वीस-वीस वर्षे तुरुंगात खितपत पडणे तरी टळेल. याबाबत अजून एक उदाहरण सांगता येईल. कलकत्त्याच्या अमृतबझारपत्रिका या प्रमुख दैनिकाने याची बातमी प्रसिद्ध केली होती. २५ एप्रिल १९८३ रोजी संथाल जमातीचे चौदा आदिवासी मिदनापूर तुरुंगात २० ते २३ वर्षांपर्यंत अडकले होते आणि सामान्यत: खुनाच्या गुन्ह्यातील कैदी सुटतो १४ वर्षात. संथाल जमातीतील एक कवी महादेव हेसदा व त्यांना सहकार्य करणारे वकील हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेल्यानंतर यातील आठ लोक तातडीने सुटले. अशा घटनांमुळे आदिवासींसाठी स्वतंत्र न्यायालयाची मागणी करणे अधिक सयुक्तिक वाटते. या स्वतंत्र न्यायालयाचे न्यायमूर्ती अनुभवी असावेत, ज्येष्ठ असावेत व त्यांना न्यायदानाच्या प्रक्रियेत दोन आदिवासी जमातींमधून आलेल्या सहकाऱ्यांनी मदत करावी. अशा न्यायालयांनी जेव्हा शक्य असेल तेव्हा शिक्षा करण्याऐवजी आदिवासींना सुधारण्याची संधी देण्याचा प्रयत्न करावा. असे खास न्यायालय तयार करण्यासाठी भारतीय फौजदारी संहितेत बदल करावा लागेल. ते सर्वोच्च संसदेचे काम आहे. अशा खास न्यायालयांच्या कामकाजांचा तपशील ठरवणे हा पुढचा भाग असेल. अधिक प्रयत्न करून तो ठरवता येईल. त्यात अवघड असे काही नाही. मोफत कायदेशीर सल्ल्याची केवळ शासकीय पातळीवरून जाहिरात करून आदिवासींचे प्रश्न सुटणार नाहीत. आदिवासींच्या मालमत्तेची शहरी धनिकांकडून लूट होऊ नये यासाठी नवनवीन तरतुदी अस्तित्वात येत आहेत. आदिवासींच्या प्राथमिकदृष्टया गुन्हेगारी स्वरूपाच्या वाटणाऱ्या कृत्यांचा वेगळा अन्वयार्थ लावण्यासाठी वरीलप्रमाणे स्वतंत्र यंत्रणेची गरज भासते.

(मूळ लेख अशुतोष मुकर्जी या प. बंगालमधील न्यायाधिशांनी लिहिला असून तो डिसेंबर ८३ मध्ये प्रकाशित झाला आहे.)

'श्याम शिल्प'
४१, जेधेनगर
बिबवेवाडी, पुणे ४११०३७

# पारंपरिक आरोग्य पद्धती



आर. पी पालेकर

कर्जत तालुका हा पुणे–मुंबई रस्त्यावरील एक मध्याचे ठिकाण. ह्या तालुक्यातील आदिवासी भागात ४४ गावे व त्यास संलग्न ९५ वाड्यांचा समावेश होतो. येथे महादेवकोळी, ठाकर, कातकरी ह्या आदिवासींत मोडणाऱ्या प्रमुख जमाती व मराठा, बौद्ध, आग्री या आदिवासींत न मोडणाऱ्या जाती आहेत. हा भाग जंगलव्याप्त असल्यामुळे दवाखाने इत्यादींच्या सोयी अल्प. येथे सुमारे २००० वर्षांपूर्वीपासून चालत आलेली त्यांची एक स्वतंत्र आरोग्यपद्धत आजही अस्तित्वात आहे. अभ्यासांती असे आढळून आले की ह्या पद्धतीचे आयुर्वेदाशी बरेच साम्य आहे.

त्यांच्या चिकित्सेच्या अनेक पद्धती आहेत. त्यातील प्रमुख पद्धती पुढीलप्रमाणे आहेत.

**वनस्पती औषध पद्धत :** ह्यात केवळ वनस्पतीज औषधानेच रोग बरा केला जातो. हगवण, खोकला, थंडी, ताप ह्यांसारख्या रोगांवर, काही दंश उदा. सर्पदंश, विंचूदंश इत्यादीवर वनस्पती औषधपद्धतीचा अवलंब केला जातो.

**२) तांब्याचे तावीज पद्धत :** ह्या पद्धतीत एखादे तांब्याची किंवा इतर ठराविक धातूची पेटी बनवून त्यात औषधी मसाला भरतात. ही पेटी रुग्णाच्या दंडास किंवा गळ्यास बांधण्यात येते. जुनाट रोग, भूतबाधा ह्याकरीता ह्या पद्धतीचा अवलंब केला जातो.

**३) लिंबू टाचणी पद्धत :** ह्या पद्धतीत एक लिंबू घेऊन त्यात एक टाचणी टोचून ठेवतात. ही टाचणी लिंबू शरीराच्या ठराविक भागावर टोचून रोग दुरुस्त करतात. ही पद्धत अंग दुखत असल्यास, चमक भरल्यास उपयोगात आणतात. ह्या पद्धतीचे साम्य ॲक्युपंक्चर थिअरीशी जुळेल असे वाटते.

**४) तांब्या फूल पद्धत :** ह्या पद्धतीत एक पाण्याने भरलेला तांब्या घेतात. त्यात गुलाल अक्षदा टाकतात व त्यात एक चापयाचे फूल वर पाकळ्या करून सोडतात व त्यावर गुलाल टाकतात. काही वेळाने ते फूल पाण्यात बुडते. जर ते फूल पाण्यात बुडून वर आले तर इच्छित फल मिळते व जर बुडून वर आले नाही तर आशा निष्फल होतील असे समजतात. ही पद्धत लग्न जुळेल किंवा नाही, स्त्रीस मूल होणार किंवा नाही इत्यादीकरीता उपयोगात आणली जाते.

**५) चाबूक पद्धत :** ह्या पद्धतीत एक तागाच्या किंवा आंबाड्याच्या धाग्यापासून बनविलेला चाबूक घेतात. त्या चाबकास गंध, गुलाल लावून उदीची धुरी देतात. हा चाबूक नेहमी देवीजवळ ठेवतात. ह्या चाबकाचा भाग शेंड्याकडे निमुळता व हातात धरावयाचा भाग गोल चेंडूच्या आकाराचा असतो. ह्या चाबकाचा वापर करण्याअगोदर देवीचे नमनपूजन केले जाते नंतर ह्या चाबकाने रुग्णास समोर बसवून किंवा उभा करून तीन फटकारे मारले जातात. असे तीन मंगळवार मारल्यानंतर अंगातील रोग दूर होतो अशी कल्पना आहे. ह्या पद्धतीचा उपयोग 'भगत' उन्मादरोगाकरीता करतात. ह्या पद्धतीचे साम्य मेंदूला दिल्या जाणाऱ्या शॉकसारखे आहे. ह्या पद्धतीचा उपयोग भूतबाधा, पिशाच्च दूर करण्याकरीताही होतो.

६) ठराविक सफेद झील कागदावर पाहून रोग निदान : ह्या पद्धतीत एक ठराविक अगदी पातळ कागद न चुरगळणारा घेऊन ह्या कागदावर एकाच विशिष्ट ठिकाणी पाहून रोगाचे निदान केले जाते. तत्पूर्वी रुग्णास सर्व लक्षणे विचारली जातात. रोग बरा होईल किंवा नाही. रोग बरा होण्याकरीता काय करावे इत्यादी माहिती याच्या साहाय्यने सांगितली जाते.

७) पंचधातू कडे पद्धत : ह्या पद्धतीत तांबे, पितळ, लोखंड, चांदी आदि पाच धातु येतात व त्याचे मनगटास किंवा दंडास घासण्यासारखे कडे बनवतात. हे कडे धुपदीप गंधाक्षदाने भारून रुग्णाच्या दंडास किंवा मनगटास घालतात. त्यामुळे जुनाट ताप जातो अशी कल्पना आहे.

८) मातीचा लेप पद्धत : घुंगुरटी किंवा अशाच किटकाच्या दंशावर किंवा बोटास नखुर्डे झाल्यास किंवा काही कारणाने बोटास किंवा अंगास सूज आल्यास वारुळाच्या मातीचा, काळचा मातीचा किंवा घुंगुरटीच्या घराच्या मातीचा किंवा अशाच मृदु मातीचा जखमेवर लेप लावतात वर फडक्याने बांधतात. यामुळे वरील प्रकारचे रोग दूर होतात अशी कल्पना आहे.

९) भरला तांब्या पद्धत : ह्या पद्धतीत पाण्याने भरलेला तांब्या घेतात व त्यास उदाची किंवा आगरबत्तीची धुरी देतात व त्यावर मंत्र विभूती टाकून ते पाणी रुग्णाच्या चेहऱ्यावर तीन वेळा शिंपडतात व थोडे पिण्यासही देतात. ह्या पद्धतीचा उपयोग भूत, पिशाच्च, दचकणे इत्यादींवर करतात.

१०) तांब्या फिरवण्याची पद्धत : ह्या पद्धतीत एका तांब्यात पाणी घेऊन विभूतीच्या साहाय्याने तांब्या फिरविला जातो व त्याची विभूती रुग्णास लावली जाते त्यामुळे रोग बरा होतो अशी कल्पना आहे.

११) डाग देण्याची पद्धत : ह्या पद्धतीत सूज असेल उदर-शूळ–जीर्ण असेल तर त्या भागावर लोखंडाच्या किंवा अन्य धातु किंवा हळदीच्या खोंबाने डाग दिला जातो. त्यामुळे रोग बरा होतो अशी समजूत आहे.

१२) औषध सूर्यास दाखविण्याची पद्धत : ह्या पद्धतीत रुग्णाकरीता तयार केलेले औषध रुग्णास देण्याअगोदर त्या औषधातील दोन थेंब सूर्याकडे बोटावर घेऊन अर्पण करतात व नंतर रुग्णास पिण्यास देतात. डोळयाच्या विशिष्ट आजारात उगवत्या सूर्याकडे पाहण्यास सांगतात. वनस्पती ठिकाणाहून काढून आणतेवेळी वनस्पतीची व सूर्याची पूजा करतात.

१३) कांडी बांधण्याची पद्धत : ठराविक वनस्पतीची कांडी लाल किंवा काळया धाग्यात बांधून ती दंडास बांधण्यास देतात. ही कांडी ठराविक वनस्पतीची ठराविक मुहूर्तावर काढून आणली जाते.

१४) मं त्रतंत्रपद्धत : ह्या पद्धतीत लिंबू किंवा नारळ, ऊद घेऊन ठराविक मंत्र रोग्याच्या अंगावर टाकतात व नंतर नारळ किंवा लिंबू अंगावरून उतरून टाकतात. किंवा मंत्रतंत्राच्या साहाय्याने लहान मुलास दृष्ट लागल्यास, गुप्त धन पाहण्यास उपयोग करतात.

१५) भारलेला ओटा किंवा देऊळ पद्धत : ह्या पद्धतीत एखाद्या झाडास किंवा ओटयास मंत्रून ठेवलेले असते आणि ह्या भारलेल्या ओटयावर रुग्णास झोपविल्यास रोग दूर होतो अशी कल्पना आहे.

१६) रासायनिक द्रव्य पद्धत : या काही रासायनिक प्रक्रिया होईल अशा वस्तू वापरून रोग्यास ठराविक अंगास लावण्यास देतात. उदा. गुळ व चुना किंवा नवसागर व चुना इत्यादी.

१७) पट भारण्याची पद्धत : ह्या पद्धतीत लिंबू, गुलाल, शेंदूर लिंबाच्या झाडाचा पाला घेऊन चौकोनाकृती किंवा गोल सारविलेल्या जागेत सर्व वस्तू पसरवितात व रुग्णास त्या पटाशेजारी बसवून रोग दूर करण्याची प्रथा आहे. याकरीता एखादा कोंबडा नारळ बळी दिला जातो.

१८) झुडुपावरील दगड पद्धत : ह्या पद्धतीत एका विशिष्ट प्रकारच्या झाडावरील दगड आणून तो दगड मनुष्याच्या किंवा गुराच्या अंगावरून उतारला जातो. त्यामुळे गुण येतो. गाईस किंवा स्त्रीस दूध चालू होते अशी कल्पना आहे.

१९) गरम शेकाटा पद्धत : ह्या पद्धतीत एखादे मातीचा ढेकूळ, तुपाचे गाडगे किंवा दगड विस्तवर साधारण गरम करून शेकले जाते. यामुळे काही विशिष्ट रोग बरे होतात अशी कल्पना आहे.

ह्याशिवाय यंत्रपद्धत; हाडुकपद्धत; धान्य उतारण्याची पद्धत; प्राणी उतरण्याची पद्धत; भराडा काढण्याची पद्धत अशा अनेक पद्धती आहेत.

वरीलपैकी काही पद्धतीत शास्त्रीय दृष्टीकोण दिसून येतो वनस्पती औषध पद्धतीत व आयुर्वेदीक औषध

पद्धतीत बरेच साम्य दिसून येते.

औषधाच्या विविध पद्धतीप्रमाणे चिकित्सकाच्याही विविध पद्धती आहेत त्यात वैदू; भगतीन; भगत; मंत्र्या, हाडवैदू, सुईन, गुराचे वैदू इत्यादी.

**आमची वाटचाल :—**

१) राहणीमान हे रोगाला कारणीभूत असते. कारण आहार यात स्वच्छ पाणी व पौष्टीक आहार याची गरज आहे. आर्थिक परिस्थिती बिकट असल्यामुळे पौष्टीक आहार एक तर मिळत नाही. यांच्या आहाराची शास्त्रीय गुणवत्ता तपासणे आवश्यक आहे. चांगले व स्वच्छ पाणी मिळण्याकरीता पाण्याची सुविधा होणे आवश्यक आहे. आम्ही ह्या संदर्भात शुद्ध पाण्याची सोय करणे; पोषणाचा अभ्यास करणे ही कामे करीत आहोत.

२) ह्या ठिकाच्या बऱ्याच वनस्पती औषधी उपयोगाच्या असल्यामुळे येथील वनस्पतीचे शास्त्रीय गुणधर्म परिक्षण करणे व त्याची योग्य उपज वाढ करणे आवश्यक आहे. ह्या संदर्भात देखिल आमची कामे चालू आहेत.

३) वनस्पतीची ओळख देखभाल करण्याकरिता ह्या भागातील वैदू संघटित होणे आवश्यक आहे. ह्या संदर्भात त्यांना संघटना बांधण्याचे काम चालू आहे.

४) त्यांची परंपरा आता कमी होत चाललेली दिसून येते म्हणून शास्त्रीय पायावर आधारलेले नववैदू परंपरा बनविणे आवश्यक आहे तसे प्रयोग आम्ही करीत आहोत.


५) वैदूच्या काही उपचार पद्धती महत्त्वाच्या वाटतात त्या पद्धतीचा विकास करणे व त्यांच्या इलाज पद्धतीची देवाण घेवाण करणे महत्त्वाचे आहे.

६) आरोग्यशिबीर आयोजित करून वैदूना निदान चिकित्सेची माहिती देणे व सार्वजनिक मालकीची एखादी उपचार शाळा तयार करणे वनस्पतीचा सदुपयोग कसा होईल ह्या दृष्टीने आमची वाटचाल चालू आहे.

अशा स्वरुपाची परंपरा बऱ्याच ठिकाणी अस्थित्वात आसण्याची शक्यता आहे तरी त्या त्या ठिकाणी अशी परंपरा मजबूत करून आरोग्याची निसर्ग संपत्तीचा सदुपयोग करण्याकरीता तयार होणाऱ्या सेवाभावी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन व्हावे अशी इच्छा आहे. अशाच स्वरुपाचे कार्य पुसेसावळी, नांदेड, गडचिरोली येथेही चालू केले आहे. (ह्या संदर्भात काही पत्रव्यवहार करावयाचा असल्यास पुढील पत्त्यावर करावा.)

□

(अॅकेडमी ऑफ डेव्हलपमेन्ट सायन्स
मु. पो. कशेळे
ता. कर्जत, जि. रायगड, पि. ४१०२०१)



# ग्रामसेवक कसा हवा?

.. ... ग्रामसेवा करू इच्छिणाऱ्याने आपण कोणावर काही मोठा परोपकार करीत आहोत किंवा आपण फार विद्वान आहोत व खेड्यापाड्यांतील मूर्ख लोकांना शहाणे करण्याचे व त्यांचा उद्धार करण्याचे काम आपण पत्करले आहे अशी वृत्ती बाळगू नये.

ही वृत्ती त्याच्या आत्मिक विकासाला मारक आहे, इतकेच नव्हे तर त्याच्या अंगीकृत कार्यालाही ती मारकच आहे. कारण त्याने हे ओळखले पाहिजे की, त्याला जे ज्ञान शाळा-कॉलेजांतून मिळालेले असते, ती शाळाकॉलेजे अस्तित्वात येण्यास ग्रामीण जनतेने सरकारला दिलेला करभार बऱ्याच अंशी कारणीभूत असतो. तेव्हा ग्रामीण जनतेची सेवा केल्याने त्या जनतेवर उपकार केलेसे न होता त्यांच्या ऋणातून अंशतः मुक्त होण्याची संधी आम्हास मिळत आहे अशी विनम्र बुद्धी त्याने बाळगली पाहिजे. अशी बुद्धी व वृत्ती धारण न करता तो घमेंडखोरपणाने जर ग्रामीण जनतेत वागू लागेल तर त्याच्या असे लक्षात येईल की, त्याच्या आचारविचारांची इष्ट ती छाप ग्रामीण जनतेच्या मनावर न पडता लोक त्याचा कंटाळा करतील. कारण ग्रामीण जनतेला 'यसफ्यस्' करता न आले किंवा त्यांच्यात पुस्तकी पांडित्य नसले तरीही व्यवहारज्ञानाचा इतका मोठा साठा त्यांच्याकडे असतो की, ग्रामीण जनतेची सेवा करणाऱ्यालाही त्यांच्याकडून पुष्कळ शिकण्याजोगे आढळते. त्याचप्रमाणे ग्रामीण जनतेत आढळणारी शिक्षणाबाबतची अनास्था, आरोग्याच्या मूलभूत सिद्धांताबद्दलचे त्यांचे अज्ञान, अन्यायापुढे नमते घेण्याची त्यांची वृत्ती, रूढीच्या दडपणाखाली निमूटपणे चिरडली जाणारी त्यांची मनोरचना, पिळवणूक करणाऱ्यांपासून मुक्त होण्याचा मार्ग न सापडल्यामुळे त्यांची होणारी हतबद्धता, त्यांच्यातील आत्मविश्वासाचा व महत्त्वाकांक्षेचा अभाव इत्यादि स्वरूपाच्या दौर्बल्याबद्दल ग्रामीण जनतेला टोमणे मारणे म्हणजे त्यांच्या दुःखावर डागण्या देणेच होय. हे सर्व दौर्बल्य त्यांच्या वाट्यास का व कसे आले याची कार्यकर्त्याने छाननी करून या दौर्बल्यापासून त्या जनतेने मुक्त कसे व्हावयाचे हे प्रत्यक्ष कृतीनेच त्यांना दाखविले पाहिजे.

## खेड्यांशी समरस व्हावे

शहरातील शिकलेल्या माणसांनाही ग्रामीण जीवनातील किती तरी गोष्टींबद्दल गाढ अज्ञान असते. हे आपले अज्ञान त्यांनी झाकून न ठेवता उलट ते दूर करण्यासाठी आपण खेड्यांशी संबंध जोडीत आहोत अशी वृत्ती राखली पाहिजे व जिज्ञासू वृत्तीने त्यांनी खेड्यातील जाणत्या, वृद्ध व अनुभविक गृहस्थांकडून नवीनवी माहिती मिळवून घेतली पाहिजे. असे केल्याने त्यांचे अज्ञान तर दूर होईलच; पण त्यापेक्षा अधिक महत्त्वाचे एक ध्येय साध्य होईल. खेड्यांशी समरस होण्याचा त्यांचा हेतू सिद्धीस जाईल व खेड्यांतील जनतेचा विश्वास संपादन करण्यास त्यायोगे चांगलीच मदत होईल.

अशा वृत्तीने जी ग्रामसेवा करावयाची ती एकांगी असता कामा नये. उदाहरणार्थ खादीकार्यकर्त्याने असे म्हणून चालणार नाही की, जे विणकर खादी विणतात त्यांना जीवनवेतनाच्या सिद्धांतानुसार योग्य मजुरी देणे एवढेच माझे काम. मग ती मजुरी तो दारूबाजीत खर्चीत असेल तर मला काय त्याचे? एवंच, खेड्यांची खरी सेवा एकांगी दृष्टी ठेवून होणार नाही. सर्वांगीण दृष्टी पाहिजे. याच दृष्टीने समग्र ग्रामसेवेची विचारसरणी रूढ होऊ पाहात आहे. अर्थातच समग्र ग्रामसेवेमध्ये महात्मा गांधींच्या विधायक कार्यक्रमातील नानाविध अंगोपांगांचा समावेश होऊ शकतो व झाला पाहिजे, हे निराळे सांगणे नकोच.

अशा प्रकारची समग्र ग्रामसेवा करण्याचे धोरण अंगीकारिले तरच खेड्यांची भरभराट होईल, तरच खेड्यातील निरसपणा नाहीसा होऊन शहरी जीवनाला चटावलेले लोकही काही तरी ग्रामीण जीवनाचा आस्वाद घेण्यासाठी खुषीने खेड्यात जाऊ-येऊ लागतील, खेड्यांची प्रतिष्ठा वाढेल. ग्रामीण जीवनाचा शहरी लोकांना हेवा वाटण्याजोगी परिस्थिती निर्माण झाली म्हणजेच ग्रामसेवेच्या कार्याला यश लाभले असे म्हणता येईल.

**समग्र ग्रामसेवा हवी**

अशा खेड्यात सर्वत्र आरोग्य नांदेल. मलमूत्रविसर्जनाच्या बाबतीत बिलकुल ओंगळपणा नसेल. सर्व जनता उद्योगशील असेल. सर्वांचे उद्योगधंदे व हालचाली जास्तीत जास्त हित साधणाऱ्याच असतील. उच्चनीचभाव, वर्गविद्वेष इत्यादींना थारा मिळणार नाही; असेच गावातील सामाजिक व आर्थिक जीवन असेल. राज्यसत्तेला जुलूम करण्यास फावणार नाही इतकी जागरूकता, जूट व प्रजेचे हक्क आणि कर्तव्ये याबाबतची जाणीव गावकऱ्यांत वसत असेल. अशी खेडी अस्तित्वात येतील असे मानणे म्हणजे निव्वळ कल्पनासाम्राज्यात दंग राहणे होय, असे मानण्याइतकी निराशाजनक आजची स्थिती आहे हे जरी खरे असले, तरी इतके निराश होण्याचे कारण नाही. गेल्या पंचवीस वर्षांपासून अशा विचारांनी भारलेल्या लोकांनी जे अल्पस्वल्प काम खेड्यापाड्यांत चालवले आहे ते वाया जाणार नाही. युद्धाचे परिणाम म्हणून देशभर अन्नवस्त्रादिकांच्या बाबतीत बिकट परिस्थिती निर्माण झाली आहे. महात्मा गांधींचा वध करीपर्यंत फोफावलेल्या आसुरी वृत्तीचा वीट देशभर अनुभवास येत आहे. सर्वोदयाची विचारसरणीच जगाचे तारण करील व हाच महात्मा गांधींचा जगाला संदेश आहे ही जाणीव आज जनतेस होऊ लागली आहे. म्हणूनच ग्रामराज्य व रामराज्य या गोष्टी नुसत्याच स्वप्नसृष्टीत राहातील असे मानण्यापेक्षा त्या सत्यसृष्टीत उतरण्याला अनुकूल वातावरण निर्माण होत आहे असेच म्हणावे लागेल.

**—नानासाहेब ठकार**

**(लोकशक्ती – लोकराज्य गांधी – श्रद्धांजली – अंक १९४९)**

**( 'जागतो संयमी तिथे' वरून पुनर्मुद्रित)**

---

# हार्दिक अभिनंदन व शुभेच्छा !

पुणे विद्यापीठाच्या मानवशास्त्र विभागातील प्रपाठक व महाराष्ट्र मानवविज्ञान-परिषदेचे सचिव प्रा. रामचंद्र मुटाटकर हे पाँटिफिकल अकॅडमी ऑफ सायन्सेस या विश्वविख्यात संस्थेच्या खास निमंत्रणावरून व्हॅटिकन ( इटली ) येथे नुकतेच रवाना झाले. तेथे Immunological Epidemiological and Social Aspects of Leprosy या विषयावरील अभ्यासगटाच्या २८ मे–१ जून दरम्यान होणाऱ्या बैठकीत ते सहभागी होतील. जगातील १२ नामवंत शास्त्रज्ञांचा समावेश असलेल्या या अभ्यासगटामध्ये प्रा. मुटाटकर हे आशिया खंडातील एकमेव शास्त्रज्ञ आहेत. या बैठकीत ते सामाजिक शास्त्रांचे प्रतिनिधित्व करतील. यापूर्वी प्रा. मुटाटकर यांनी कुष्ठरोगाच्या सामाजिक प्रश्नाबाबत जागतिक आरोग्यसंघटनेचे सल्लागार म्हणूनही काम केले आहे. व्हॅटिकन येथील बैठकीनंतर ते प. जर्मनीतील म्युनिच येथील एका प्रख्यात कुष्ठरोगसंस्थेच्या कार्याची पाहणी व अभ्यास करतील.

या बहुमानाबद्दल महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेच्या वतीने प्रा. मुटाटकर यांचे हार्दिक अभिनंदन व शुभेच्छा !

---

# ‘मला चालेल तुमची खिचडी’

‘नानासाहेब, तुम्ही आम्हा गरिबांच्या गाऱ्हाण्यांची दाद लावण्याकरिता खटपट करता; पण आमच्या गावच्या दुःखाची दाद लावा ना!’ सार्वजनिक कामानिमित्त मी एका मित्रांशी बोलत असल्याचे ऐकून थोड्या दूर अंतरावर बसलेला एक भिल्ल धिटाईने मला म्हणाला—

पश्चिम खानदेश जिल्ह्यातील लोकसमाजाचे निरीक्षण करून चार-दोन वर्षे होतात न होतात तोच १९२५ साली मी असे प्रसिद्ध केले होते की, या जिल्ह्यात भिल्लसमाजाची सेवा करण्यासाठी एखादी संस्था स्थापण्याची अत्यंत आवश्यकता आहे. ‘भिल्ल सेवा मंडळ’ ही संस्था स्थापन करण्याचे भाग्य १९३८ साली मला लाभले; पण वर उल्लेखिलेला प्रसंग तत्पूर्वीचा (१९३७) सालचा आहे.

दूर बसलेल्या त्या भिल्लाचे शब्द ऐकून मला सानंद आश्चर्य वाटते. कारण भिल्ल हा सामान्यतः निबोलका व भीरु प्रवृत्तीचा असल्याचे मी ओळखले होते. जो आपले दुःख मिमूटपणे गिळतो, त्याचे दुःख समजणे कठीण. मग ते दूर करण्याचा प्रश्नच नको. अर्थातच या प्रस्तुतच्या भिल्लाच्या तोंडचे धिटाईचे शब्द ऐकून मला आश्चर्य वाटणे साहजिकच होते. सेवा करण्याची एक संधी मला लाभणार, या विचाराने मला आनंदही झाला.

त्या गृहस्थास मी जवळ बोलावून त्याचे नाव, गाव व दुःख समजावून घेतले. मनमोकळेपणाने त्याने सर्व सांगितले. त्याने सांगितलेल्या वृत्तांताचा सारांश असा :

‘एका सावकाराने एका खेडेगावच्या कुळावर वसुलीच्या बाबतीत फार जुलूम चालवला. कुळाकडून अपेक्षेप्रमाणे वसुली होत नाहीसे पाहून त्याला चौदावे रत्न दाखविण्याच्या इराद्याने त्या वृद्ध कुळाला व त्याच्या मुलाला दिवसाढवळ्या दोन खांबांना बांधून त्यांना चोप देण्यास त्या सावकाराच्या नोकराने सुरुवात केली. काही वेळाने त्या मारामुळे वृद्ध बाप बेशुद्ध पडल्याचे पाहिल्यावर, तो नोकर जरा घाबरला व मग त्याने त्या दोघांना मोकळे केले. त्या माराचा परिणाम म्हणूनच वृद्ध भिल्ल पुढे चार-सहा दिवसांनी गतप्राण झाला!’

हा सर्व प्रकार ऐकून माझा पारा साहजिकच चढला व मी त्या गृहस्थाबरोबर ताबडतोब त्या गावी जाण्यास निघण्याची तयारी दाखविली. माझी इतकी उत्कटता व तयारी पाहून त्याला आश्चर्यच वाटले. कारण हे बोलणे चालले होते त्या गावापासून वरील प्रसंग घडलेला गाव कित्येक मैल लांब होता व वाहन तर मुळीच नव्हते. तरीसुद्धा मी पायी जाण्याची तयारी दाखविली! इतका तापट सेवक पाहाण्याचा त्याच्या आयुष्यातला तो कदाचित पहिलाच प्रसंग असेल! दिवे लागल्यानंतर आम्ही त्या गावी पोहोचलो. गावी गेल्यावर प्रथम काय करावयाचे ते मी त्याला वाटचाल करीत असताना सांगून ठेवले होते. तथापि त्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवून मी इतका लांब पायीच चालत आल्यामुळे, त्याने ठरलेल्या कामास न लागता खाण्या-पिण्याची गोष्ट काढली. मी सांगितले, ‘आधी आपण ठरल्याप्रमाणे काम करू. नाही तर लोकांची निजानीज होईल व मी योजल्याप्रमाणे लोकांचे जाबजबाब ताबडतोब घेता येणार नाहीत.’

मला भीती होती की, मी रात्र तशीच घालविली तर मी आल्याची कुणकुण लागून सावकाराचे पक्षपाती लोक साक्षीदारांना फितवतील व मला यथातथ्य साक्ष देण्यास साक्षीदार कचरतील. मी खाण्या-पिण्याचे साफ नाकारताच मला घेऊन येणारा गृहस्थ लोकांना गोळा करण्याच्या उद्योगाला लागला.

चार-सहा गावकरी सहज जिज्ञासेने मी बसलेल्या झोपडीवरून घिरट्या घालत होते; पण बराच वेळ खटपट केल्यानंतरही तो गृहस्थ लोकांवर चिडून व त्यांना शिव्याशाप देत माझ्याकडे ओशाळगत होऊन आला व काकुळतीने सांगू लागला, ‘झालेला सर्व प्रकार मी तुम्हास खराखुरा सांगितला; पण तसा जाबजबाब देण्यास कोणीही तयार नाही. तुम्हाला मी व्यर्थ त्रास दिला!’

मीही हतबद्ध झालो. आसपास घिरट्या घालणाऱ्या भिल्लांना जवळ बोलावले. मोठ्या मुष्किलीनेच ते दूर-दूर व विस्कळित असे माझ्याभोवती येऊन बसले. मी त्यांना समजावून सांगण्याचा शिकस्तीचा प्रयत्न केल्या

नंतर एकदोघांनी धीर धरून सांगितले, 'तुम्हाला या गृहस्थाने सांगितलेली सर्व हकिकत खरी आहे; पण गावातील कोणीही मनुष्य तुम्हाला अंगठा देणार नाही, कारण त्यांना भीती वाटते. ते म्हणतात, झाले एवढे पुरे. आणखी त्रास नको.' मी त्यांना माझी भूमिका जीव तोडून सांगितली; पण एकाचीही भीती मी दूर करू शकलो नाही.

अशा अवस्थेत मध्यरात्र होण्याची वेळ आली. मी अद्यापही खालो-प्यालो नव्हतो ही गोष्ट त्यांच्या मनाला लागलीसे दिसले. ते मला खाण्या-पिण्याचा आग्रह करू लागले. कित्येकांनी त्यांच्या पद्धतीप्रमाणे शिधा आणून मजपुढे ठेवला. चूल पेटवून तयार असल्याचे मला सांगून मी उठावे व शिधा घेऊन स्वयंपाक बनवावा असे मला परोपरीने सांगू लागले; पण ज्या कामासाठी आलो, त्या कामाला तोंडही लागत नसल्यामुळे खाण्या-पिण्याकडे माझे लक्षच जाईना. अत्यंत उदासीनपणाने मी म्हणालो, 'मी स्वयंपाक नाही करणार. मला जेवायचे नाही.'

'आमच्या हातचे तुम्हास चालणार नाही, नाही तर आम्ही आमच्या खिचडीबरोबर तुमची शिजवली असती!' असे एकजण उद्गारला.

जिव्हारी घाव लागवा, त्याप्रमाणे मी उसळून म्हणालो, 'मला चालेल तुमची खिचडी!' लोकांनी आनंद प्रकट केला. त्यांना आश्चर्य अधिक वाटले. त्यांच्या मडक्यातली खिचडी खाण्यास मी त्यांच्याबरोबर जेवावयास बसलो हे पाहण्यास गावचे आणखी किती तरी लोक दोन-चार मिनिटांत तेथे गोळा झाले!

जादूच्या कांडीप्रमाणे लोकांच्या वृत्तीत फरक पडला. त्यांची खात्री होऊन चुकली की, हा काही राक्षस नव्हे. आपल्या माणसांसारखाच हा माणूस आहे.

जेवण संपताच लोकांनी पटापट मनमोकळेपणाने जबाब दिले, अंगठे दिले व मग मी अत्यंत आनंदित होऊन लगेच रातोरात त्यांच्याबरोबर त्यांनी मुद्दाम तयार केलेल्या बैलगाडीत बसून त्यांचे प्रकरण धसास लावण्यासाठी सूर्योदयाच्या वेळी तालुक्याच्या ठिकाणी हजर झालो!

—नानासाहेब ठकार

('महात्मा': ऑक्टोबर १९४८)
('जागतो संयमी तिथे' वरून पुनर्मुद्रीत)

# 'धर्मांतर झाले; पण विचारक्रांती नाही!'

...'माझ्या मते सर्व रचनात्मक कार्याची नस या एका प्रश्नात आहे की, ते किती काळ करीत राहिले म्हणजे तेथील समाजात मूळ धरील? काही झाडांना पहिली दोन–तीन वर्षे पाणी वरून घालावे लागते खरे; पण त्यानंतर त्यांच्याकडे बघावे लागत नाही. तशी काही कालमर्यादा सामाजिक रचनात्मक कार्यात आपल्याला आढळते का? आणि जर तशी काहीच मर्यादा नसेल तर मग वरून जितके खतपाणी तुम्ही ओताल तेवढीच पानेफुले येतील. जेव्हा ती रसद बंद होईल तेव्हापासून झाड वठत जाईल. चांगल्या थोर थोर कार्यकर्त्यांनी स्वतःच्या रक्ताचे पाणी करून वर्षानुवर्षे संवर्धिलेली रचनाकेन्द्रे ते तेथून दूर झाल्याबरोबर वठून गेली. इतकी की त्या कार्याच्या खाणाखुणाही तेथे शिल्लक नाहीत. गांधीयुगात तरारल्याप्रमाणे वाटणारी पण आज त्यांच्या जागी वठलेले खुंटदेखील नसणारी अनेक ठिकाणे भारतभर पसरलेली आढळतील. रचनात्मक कार्याला प्रेरणा देणारी व्यक्ती दूर झाली की, सहकारी शेती, सहकारी पतपेढी अशा भौतिक कल्पनांचाच केवळ ऱ्हास होत नाही, तर त्यामागच्या जीवनमूल्यांचाही ऱ्हास झालेला दिसतो. रचनात्मक केन्द्र जोमाने चालू असतानासुद्धा बहुतेक वेळा त्यांच्यामागची जीवनमूल्ये तेथील समाजाने स्वीकारलेली असतीलच असे नाही. जातीपातीचा विचार, भ्रामक धार्मिक समजुती आणि आचारविचार जसेच्या तसे राहिलेले आढळतात. केन्द्रप्रस्थापक हयात असतानाची ही स्थिती. मग ती स्फूर्तिदाती व्यक्तीच नाहीशी

झाल्यावर काय विचारावे ? मालक खेड्यातले घर सोडून गेल्यावर चार–दोन वर्षांत ज्याप्रमाणे छपरावर गवत उगवलेले आणि घरात साप–घुशींनी बिळे केलेली दिसतात, तशीच अवस्था या केन्द्रांची होते; पण बव्हंशी खेड्यापाड्यांत असणाऱ्या केन्द्राभोवती जी ग्रामीण मंडळी जमा होतात, त्यांना तरी याबाबतीत दोष देण्यात काय अर्थ ?
शहरातील जे कामगार श्रमिक संघटनांचे वर्षानुवर्षे सदस्य असतात, त्यांच्या अथवा जे सुशिक्षित मध्यमवर्गीय यांना त्या राजकीय पक्षांचे ध्वज खांद्यावर नाचवतात त्यांच्या निष्ठा व जीवनमूल्ये तरी कुठे बदललेली असतात ? जातीपाती, अंगारेधुपारे, व्रतवैकल्ये यांच्या पाशातून सुटण्याची त्यांची इच्छाच नसते. मग धडपड तर लांबच राहिली. तेव्हा आदिवासी, दलितवर्गीय आणि शेतकरी आदी करून मागास समाजघटकांमध्ये संस्थांविषयक नव्या निष्ठा निर्माण व्हाव्यात आणि त्यांनी नवीन जीवनमूल्ये स्वीकारावीत असे जर वाटत असेल तर कार्यकर्त्यांनी बराच काळ वाट पाहण्याची तयारी ठेवली पाहिजे. हजार–दोन हजार वर्षे मनात खोल रुजलेल्या रूढी आणि अज्ञानमूलक विचारांचे तण आपण एका पिढीत उपटून काढून त्यांच्या जागी नव्या सामाजिक जाणिवांचे पीक काढू, अशी शेखमहंमदी करण्यात हशील नाही. हिंदू देवदेवतांना बाबासाहेब आंबेडकरांच्या शब्दावरून नदीत बुडवणाऱ्या नवबौद्धांनी डॉक्टरसाहेबांनाच देव्हाऱ्यात बसवले नाही काय ? धर्मांतर झाले; पण विचारक्रांती झाली नाही. '

**–ना. ग. गोरे**

**(' रचनात्मक कार्याच्या दिशा ' या श्री. विलास चाफेकर संपादित पुस्तकाच्या प्रस्तावनेतून)**

---

# सातव्या पंचवार्षिक योजनेत स्वयंसेवी संस्थांना महत्त्वाचे स्थान

## २० कलमी कार्यक्रम

सातव्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीत २० कलमी कार्यक्रमाच्या अंमलबजावणीमध्ये स्वयंसेवी संस्थांना मोठ्या प्रमाणावर सहभागी करून घेण्याचे केंद्रीय नियोजन मंडळाने ठरविले आहे. स्वयंसेवी संस्था म्हणून मान्यता मिळविण्यासाठी पुढील पाच निकष ठरविण्यात आले आहेत.

१. ही संस्था २० कलमी कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी कटिबद्ध असली पाहिजे.
२. ही संस्था अराजकीय असली पाहिजे.
३. ही संस्था ग्रामीण भागात असली पाहिजे.
४. या संस्थेकडे व्यवस्थापकीय तज्ज्ञता असली पाहिजे.
५. या संस्थेची धर्माद य संस्था म्हणून नोंदणी झालेली असली पाहिजे.

वरील निकषांच्या आधारे राज्यसरकारांनी ' स्वयंसेवी संस्था ' म्हणून मान्यता द्यावयाची आहे.

२० कलमी कार्यक्रमांच्या अंमलबजावणीमध्ये स्वयंसेवी संस्थांना सहभागी करून घेण्यामागचा हेतू असा की, त्यांनी शासनयंत्रणेस सहाय्यभूत व्हावे. दारिद्र्य निर्मूलन योजनांचे काम सुरळीत व्हावे यासाठीही स्वयंसेवी संस्थांचे सहाय्य घेण्यात येईल.

केंद्रीय नियोजन मंडळाचे सदस्य डॉ. सी. हनुमंतराव यांनी सांगितले की, १९८३ मध्ये मुख्यमंत्र्यांच्या एका परिषदेमध्ये २० कलमी कार्यक्रमांच्या अंमलबजावणीमध्ये स्वयंसेवी सस्थांना सहभागी करून घेण्याचे आवाहन करण्यात आले होते. २० कलमी कार्यक्रम, IRDP सारखे अन्य दारिद्र्यनिर्मूलन कार्यक्रम व किमान गरजा कार्यक्रम या तीन क्षेत्रांत स्वयंसेवी संस्थांना सहभागी करून घेण्याचे आवाहन करण्यात आहे होते. या कार्यक्रमांचा लाभ मिळणारे लोक व स्वयसेवी संस्था यांच्या सहकार्याखेरीज या कार्यक्रमांची गुणवत्ता राखणे कठीण होईल असे मत डॉ. राव यांनी व्यक्त केले,

एका बैठकीत स्वयसेवी संस्थांनी रोजगार कार्यक्रम व एकात्मिक ग्रामीण विकास योजना यासारखे कार्यक्रम हाती घेण्याची तयारी दर्शविली, सातव्या योजनेत दारिद्र्यनिर्मूलन कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर असतील अशी अपेक्षा आहे, या दृष्टीने या कार्यक्रमांच्या अमलबजावणीमध्ये शासनयंत्रणेस स्वयंसेवी सस्थांची जोड देण्याची आवश्यकता आहे,

**( Financial Express २० मे १९८४ च्या आधारे)**

# म्हैसाळ प्रयोगाचे चिकित्सक मूल्यमापन

ग्रामीण विकासाचे कार्य करणाऱ्या व्यक्ती, संस्था व चळवळी महाराष्ट्राच्या विविध भागात आढळून येतात. विकासकार्य करणाऱ्या या गटांना आत्मपरीक्षणाची जाणीव व गरज नेहमीच असते. मात्र हे आत्मपरीक्षण व इतरांनी त्यांच्या कार्याचा आढावा घेऊन केलेले मूल्यमापन मोजक्याच प्रमाणात प्रकाशित होते. विकासाचे कार्य जिथे जिथे चालू असते त्याविषयी सर्वसामान्यांच्या मनात नकळत एक वलय तयार होत असते आणि हे वलय त्यांना एका वेगळ्याच भारावलेल्या अवस्थेत घेऊन जाते. मात्र हे वलय भेदून त्या कामाच्या मूळ प्रेरणेशी पोहचणारी आणि विस्तारत जाणाऱ्या क्षितीजांचा वेध घेऊ पाहणारी चिकित्सक दृष्टी अभावानेच आढळते. विकासाच्या कार्याइतकेच त्याच्या योग्य मूल्यमापनाचे महत्त्व असते. हे मूल्यमापन कशा तऱ्हेने केले जाऊ शकते याविषयी वेगवेगळे निकष लावणे वा वेगवेगळे प्रयोग करून पहाणे यात काहीच गैर नाही. मात्र अनेकदा मूल्यमापनच नाकारले जाताना दिसून येते. या संदर्भात 'म्हैसाळचे अस्पृश्य ( म्हैसाळ अनटचेबल्स ' ) हे डॉ. वसंत देशपांडे यांचे इंग्रजी पुस्तक लक्ष वेधून घेते. श्री. वसंत देशपांडे यांनी विकासकार्यांची पाहणी करणाऱ्या पुस्तकांची एक मालिकाच प्रकाशित करण्याचे योजिले आहे. त्यातील हे पहिले पुस्तक. या मालिकेतील दुसरे पुस्तक महाराष्ट्रात ठिकठिकाणी आदिवासींमध्ये चाललेल्या कामाचा आढावा घेणारे असेल.

या पुस्तकाच्या प्रस्तावनेत डॉ. देशपांडे लिहितात की, म्हैसाळच्या उदाहरणाने लोकांना विधायक काम करण्यास प्रेरक ठरावे व सामाजिक कृतीवर अधिक खोलवर चर्चा व्हावी या हेतूने आपण हे पुस्तक लिहिले आहे. आजच्या काळात सामाजिक आणि राजकीय कृती करण्यासाठी स्वयंसेवी संस्थांइतके दुसरे कोणतेच प्रभावी माध्यम दिसून येत नाही. यासाठी या संस्था हाती घेत असलेले विविध उपक्रम, या उपक्रमांची प्रत्यक्षात होणारी अंमलबजावणी, संघटनाबांधणी पद्धती, त्यात त्यांना मिळणारे यश आणि त्यांच्या मर्यादा यांचा अभ्यास निश्चितच महत्त्वाचा ठरतो.

## शेतीच्या प्रयोगांचा आढावा

या पुस्तकात डॉ. देशपांडे यांनी प्रामुख्याने श्री. मधुकर तथा दादा देवल यांनी आपल्या अस्पृश्य सहकाऱ्यांसमवेत म्हैसाळ येथे केलेल्या सहकारी शेतीच्या प्रयोगाचा आढावा घेतलेला आहे. यात वेळोवेळी दादांच्या कार्यपद्धतीविषयी अथवा हाच प्रयोग अन्यथा करून पाहण्याविषयी जे जे प्रश्न उभे राहिले त्यांचाही मागोवा घेण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे. उदा. सामाजिक कार्यात रचनात्मक की संघर्षात्मक या वादाला नेहमीच सामोरे जावे लागते. लेखकाने यापैकी कोणत्याच पक्षाच्या बाजूने आग्रही प्रतिपादन न करता समतोलपणे दोन्ही भूमिकांचा म्हैसाळच्या संदर्भात मागोवा घेतला आहे.

पहिल्याच प्रकरणात लेखकाने जातिव्यवस्थेचे स्वरूप या व्यवस्थेच्या निर्मूलनाबाबत स्वयंसेवी संस्थांच्या भूमिका, म्हैसाळ येथील श्री विठ्ठल शेती सहकारी संघटना व तिचे प्रणेते दादा देवल या सर्वांची तोंडओळख करून देत विषयाची पार्श्वभूमी स्पष्ट केली आहे.

श्री. देवलांचे जन्मगाव म्हैसाळ. ते पूर्वाश्रमीचे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पूर्ण वेळ कार्यकर्ते. ते एक अतिशय कुशल संघटक व व्यवस्थापक आहेत. प्रत्यक्ष कामावर त्यांची अधिक भिस्त आहे. दादा देवलांच्या व्यक्तिमत्त्वाला उगाच बुद्धिमंताचे साज देशपांड्यांनी चढवले नाहीत; पण त्यांच्यात वैचारिकतेची उणीव आहे असे नाही. दादांच्या व्यक्तिमत्त्वाचा वेध घेताना त्यांच्या जीवनदृष्टीचे काही पैलू विरोधाभासाने भरलेले वाटतात, ही बाब त्यांनी मोकळेपणाने लिहून टाकली आहे. अनेक वर्षे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पूर्ण वेळ कार्यकर्ते म्हणून निष्ठेने काम केल्यावर दादांना हळूहळू आपल्या विचारसरणीत आणि संघाच्या तत्त्वप्रणालीत अंतर जाणवू लागले. हे मतभेद प्रामुख्याने आर्थिक भूमिकेवरून होत होते. अस्पृश्यांचे आर्थिक परावलंबित्व संपुष्टात आल्याशिवाय विकासाच्या कल्पनेने वास्तवात मूळ धरणे अशक्य आहे अशी धारणा झाल्यावर त्यांनी एकेक करून संघाच्या विचारसरणीचे जू मानेवरून

उतरवले. देवलांच्या आयुष्यातले हे एक महत्त्वाचे स्थित्यंतर म्हैसाळ शेती सोसायटीचे बीज रोवण्यास कारणीभूत ठरले. दादांची वैचारिक जडणघडण कशी होत गेली आणि तिच्यामागच्या प्रेरणा या सर्वांचा मनोज्ञ आलेख देशपांडे यानी रेखाटला आहे. कोणत्याही कार्यामागच्या बलशाली संघटनेच्या पाठबळाचे महत्त्व दादा जाणत होते. या पार्श्वभूमीवर संघासारखी शक्तिशाली संघटना सोडण्यास त्यांना इतका वेळ का लागला हे आपल्याला जाणून घेता येते असे देशपांडे म्हणतात. वास्तविक पाहता संघटनेचे पाठबळ केवळ कार्यासाठीच आवश्यक असते असे नाही तर पहाता पहाता एकूण व्यक्तिमत्त्वच त्या संघटनेच्या मुशीत आकार घेते आणि अचानक संघटना फुटल्यावर किंवा ती सोडण्याचा निर्णय विचारपूर्वक घेतला तरी अनेकदा त्या कार्यकर्त्यांच्या जीवनात एक पोकळी निर्माण होते.

म्हैसाळ हे ८८८५ लोकसंख्येचे खेडे. या लोकसंख्येची जातवार प्रतवारी, गावातील जमीनजुमला, उद्योगधंदे, लिफ्ट इरिगेशनमुळे गावात घडून आलेले बदल, गावातली जुनी बलुतेदारी प्रथा यांची तपशीलवार माहिती वाचताना म्हैसाळचे अस्पृश्य कशा रीतीने उच्चवर्णीयांवर पोटासाठी अवलंबून असत त्याचे स्वच्छ चित्र डोळ्यांपुढें उभे राहते. म्हैसाळमधील अस्पृश्यांचे संपूर्ण आर्थिक परावलंबन आणि त्यांची पराधीन मानसिकता यांचा अन्योन्यसंबंध जेव्हा दादांनी जाणून घेतला तेव्हा त्यांनी गावातल्या अस्पृश्यांना शासकीय दूधयोजनेचा पुरेपूर फायदा मिळवून देण्याचे ठरवले. हळहळू दूध सोसायटीपण स्थापन झाली. दूध सोसायटीची स्थापना ही आर्थिक स्वावलंबनाच्या मार्गावर सुरू झालेल्या वाटचालीचे पदचिन्ह होय. दूध सोसायटीची सुरुवात कशी झाली, मग तिची वाढ कशी होत गेली, हा सगळा इतिहास वाचताना आजची बदललेली परिस्थिती व तेव्हाची परिस्थिती यातील फरक लक्षात येतो.

## संघर्ष कां नाही

म्हैसाळ दूध सोसायटीच्या सभासदांना जनावरांसाठी चारा मिळवायची विवंचना नेहमीचीच आणि अपघातानंच दादांना कळलं की, बऱ्याच जणांच्या जमिनी गहाणवट पडल्या आहेत म्हणून. लँडसीलिंगचा कायदाही आला होता. प्रत्येकाचा तुकडा एकर–दीड एकराचा होता. जमिनी सोडवायला 'माणूस' च्या संपादकांनी आवाहन केल्यावर महाराष्ट्रातून देणगीरूपाने पैसे जमले. मग गहाणवट पडलेली जमीन सोडवून विठ्ठल सहकारी शेती सोसायटीची स्थापना झाली. पहिल्याच वर्षी भरपूर पीक निघालं. या गहाणवट पडलेल्या जमिनी पुरेपूर किंमत देऊन सोडवून घेण्यात आल्या, त्याऐवजी म्हैसाळच्या लोकांनी संघर्ष का केला नाही असा प्रश्न अनेकदा विचारला जातो. गहाणखते करून घेताना सावकराचा दृष्टिकोण बहुधा त्या लाटण्याचाच असतो हे वेगळे सांगायची आवश्यकता नाही. देवलांना वाटतं, म्हैसाळमधल्या अस्पृश्यांना म्हैसाळातच रहायचंय तेव्हा पहिल्याच पावलाला सवर्णांचा विरोध ओढवून घेणं परवडणारं नव्हतं. संघर्षाला जेवढे बळ आवश्यक असते तेवढे नव्हते तेव्हा संघर्ष क्षणिक होऊन, एका क्षोभाचे रूप घेऊन नंतर विझून जाण्यापेक्षा दुसरा मार्ग स्वीकारणेच अधिक योग्य वाटले. सरकार आता अशा अनेक गहाणवट पडलेल्या जमिनी व त्या कशा सोडविता येतील याचा अभ्यास करण्यासाठी तज्ज्ञ पाठविणार आहे. हे म्हैसाळ प्रकल्पाचे श्रेय.

देवलांची भूमिका सर्वांना पटावी असा देशपांड्यांचा आग्रह नाही; पण ती भूमिका यथास्थित मांडून त्यांनी एका गुंतागुंतीच्या समस्येवर झोत टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

म्हैसाळ प्रकल्पासाठी बऱ्याच प्रमाणावर एका ऑस्ट्रेलियन मदतसंस्थेकडून मदत मिळाली आहे. याबाबत म्हैसाळात सर्वसाधारण दोन प्रतिक्रिया ऐकू येतात. काही जाणत्या गावकऱ्यांची भूमिका आम्हाला ही कर्जफेड करून आपल्या पायावर उभं राहायचंय अशी होती तर काही स्त्रिया म्हणाल्या, 'त्या सायबाला सांग आम्हाला घर बांधून द्यायला.' याबाबत स्पृश्यास्पृश्यांच्या प्रतिक्रिया डॉ. देशपांड्यांनी अजमावल्या असत्या तर या पुस्तकाला आणखी एका तपशिलाचे परिमाण लाभले असते असे वाटते.

सहकारी शेतीची चळवळ साऱ्या भारतात अपेशी ठरली आहे. सर्वसामान्य भारतीय शेतकरी आपली जमीन सहकारी शेतीला द्यायला तयार होत नाही व एकत्र येत नाही असा अनुभव आहे. या पार्श्वभूमीवर म्हैसाळचा प्रकल्प केवळ अपवादाने सिद्ध होतो की तो

इतरत्र राबवता येईल. हा एक अतिशय उपयुक्त प्रश्न लेखकाने मांडला आहे आणि म्हैसाळची विठ्ठल सोसायटी तरी जोमाने काम करीत राहील की बंद पडेल हा अजून एक प्रश्न. कारण डॉ. देशपांडयांच्या पाहणीत असे दिसून येते की, सोसायटीच्या कारभारात शिथिलता आली आहे. तसेच तरुण पिढीला शेतमजूर म्हणून काम करायची इच्छा नाही, तरीदेखील डॉक्टर देशपांडयांना वाटते की सोसायटी चालूच राहील. कारण जमीनपट्टी कमी असली तरी सोसायटीमुळे इतर अनेक फायदे लोकांना मिळतात, तारणावर कर्ज मिळते, नवनवीन शेतीविज्ञान, तंत्रज्ञान आत्मसात करता येते. सर्वांत मुख्य म्हणजे देवल किंवा विठ्ठल सोसायटीच्या आर. डी. कांबळयांसारख्या पदाधिकाऱ्यांना चांगली जाण आहे की, विठ्ठल सोसायटी हे केवळ आर्थिक फायदा मिळविण्याचे साधन नाही तर समाजपरिवर्तनाच्या चळवळीचे ते एक केंद्र आहे. अस्पृश्यांत नेतृत्वाची भावना निर्माण करणे, सामाजिक मेलन घडवून आणणे हे तिचे खरे ध्येय आहे. विठ्ठल सोसायटी या ध्येयाला अनसरून घरबांधणी योजना, वैद्यकीय सेवा, दारूबंदी, प्रौढशिक्षण, दुष्काळी भागात गरीब शेतकऱ्यांना काम मिळवून देणे, देवदासीप्रथेचे उच्चाटन करणे अशा अनेकविध योजना अतिशय तळमळीने राबवीत आहे.

### हुंकार गुदमरून जातो

डॉ. देशपांडे यांनी विठ्ठल सोसायटीच्या आर्थिक व्यवहाराची व्यवस्थित छाननी करून शेतीखाली आलेली जमीन, पिकं, दरएकरी उत्पन्न, दरडोई मजुरी, नफातोटा इ. माहिती संकलित केली आहे व विठ्ठल सोसायटीची स्थापना होण्याअगोदरच्या व नंतरच्या लोकांच्या आर्थिक स्थितीची तुलनात्मक पाहणी करून आलेख मांडला आहे. विठ्ठल सोसायटीमुळे लोकांच्या सामाजिक स्थानात व भूमिकेत कशा तऱ्हेने फेरबदल घडून येत आहेत याबद्दल स्वतः मतप्रदर्शन न करता लोकांच्याच मुलाखती घेऊन त्यांच्याच शब्दांत त्यांच्या भावना व्यक्त होऊ दिल्या आहेत. विकास कार्यासाठी खूप सरकारी पैसा खर्चला जातो व या शुष्क आकडेवारीत लोकांचा हुंकार गुदमरून जातो. मानसशास्त्राचे अभ्यासक नेहमी लोकांचे हुंकार प्रगट करण्याच्या प्रयत्नांना अधिक महत्त्व देतात. या दृष्टिकोणातून या मुलाखती मोलाच्या ठरतात. अस्पृश्यांची आत्मनिवेदने वाचल्यावर साहजिकच म्हैसाळातील स्पृश्यांच्या प्रतिक्रिया जाणून घेणे महत्त्वाचे ठरते. या प्रतिक्रिया पडताळून पाहताना लक्षात येते की, म्हैसाळ प्रकल्पाला ज्यांनी मदत केली असे अनेक स्पृश्य आहेत; पण ते सारे शहरी आहेत. म्हैसाळातल्या स्पृश्यांना या प्रकल्पाबद्दल वाटणारा दुरावा त्यांच्या प्रतिक्रियांमधून ध्वनीत येतो. म्हैसाळ प्रकल्पाचे उद्दिष्ट केवळ अस्पृश्यांना जागृत करणे एवढेच नव्हे तर सामाजिक मेलनासाठी आहे. या उद्दिष्टांपर्यंत पोहोचायला अजून खूप मजल मारायची आहे हे दिसून येते. देवल म्हणतात, सामाजिक जाणीव बदलण्यात ललितसाहित्य फार मोलाची कामगिरी बजावू शकेल. देवलांची साहित्यावरील ही श्रद्धा म्हणजे साहित्यिकांना एक गर्भित आवाहनच आहे.

म्हैसाळ आणि आसपासच्या परिसरातील स्त्रिया सभेत अतिशय धीटपणे बोलतात, प्रौढशिक्षणवर्गात जातात. त्या दादा देवलांना दुवा देताना आढळतात. या प्रकल्पाने स्त्रियांच्या जीवनात कोणत्या प्रकारचे बदल घडवून आणलेत व त्यांच्या आकांक्षा काय आहेत याचाही या पाहणीत अंतर्भाव करायला हवा होता असे वाटते.


प्रा. वि. म. दांडेकरांची अभ्यासपूर्ण व परखड प्रस्तावना या पुस्तकास लाभली असून ती मननीय आहे. श्री. राजेंद्र देशपांडे यांची रेखाटणे आशयाशी समरस झालेली आहेत.

म्हैसाळ प्रकल्पापासून प्रेरणा घेऊन आसपासच्या काही गावांतील लोक सहकारी शेती, दूध सोसायटी, मजूरसंघटना उभारण्याचा प्रयत्न करत आहेत. ही विस्ताराची प्रक्रिया वाढीला लागलेली असतानाच म्हैसाळ प्रयोगाचा धांडोळा घेणारे पुस्तक प्रकाशित झाले आहे त्यामुळे नव्या कार्यकर्त्यांना सिंहावलोकन करून पुढल्या वाटचालीबद्दल सजग होणे काहीसे सुलभ व्हावे.

**—सुषमा सोनक**

( ' म्हैसाळ अनटचेबल्स '
डॉ. वसंत देशपांडे
रामचंद्र दास्ताने आणि कं. १९८३ )

# आदिवासी विकास, शासन आणि स्वयंसेवी संस्था



शरद कुलकर्णी

आदिवासी विकास व आदिवासी उपयोजना हे केवळ आपले क्षेत्र आहे असे महाराष्ट्र शासन मानते असा आदिवासींत काम करणाऱ्या अनेक संस्थांचा व कार्यकर्त्यांचा अनुभव आहे. सरकार पालघर– डहाणू भागात गवताची एकाधिकार खरेदी सुरू करते ती आदिवासी कल्याणासाठी आणि एकदोन वर्षांनी ती योजना टाकून देते तीही आदिवासी कल्याणासाठीच ! आदिवासी उपयोजनेची आखणी व अंमलबजावणी युद्धाच्या आखणी व अंमलबजावणीइतकी गुप्तपणे चालते. आदिवासींत काम करणाऱ्या संस्थांना व कार्यकर्त्यांना त्यात अजिबात सहभागी केले जात नाही आणि मागणी करूनही या योजनेची माहिती मिळत नाही. आदिवासी उपयोजना सुरू होऊन सुमारे आठ वर्षे झाली. या उपयोजनेच्या पहिल्याच आराखड्यात उपयोजनेची उद्दिष्टे म्हणून आदिवासी समाज आणि इतर समाज यांच्या विकासातील अंतर कमी करणे आणि आदिवासी जमातींचे जीवनमान सुधारणे ही सांगण्यात आली होती. एकूण १५ वर्षांच्या काळात आदिवासी व इतर समाज यामधील अंतर नाहीसे होईल असे सांगण्यात आले होते. (आदिवासी उपयोजना सारांश. हा सारांश ‘लोकराज्य’च्या १ मार्च १९७५ च्या अंकात प्रसिद्ध झाला आहे.) या गोष्टीला ८ वर्षांच्यावर काळ लोटला आहे. ८ वर्षांत हे अंतर किती कमी झाले आहे याचे मूल्यमापन करणे आवश्यक आहे. अशा प्रकारचे निष्पक्षपाती व सखोल मूल्यमापन झाल्यास आदिवासी व इतर समाज यातील अंतर मुळीच कमी न होता उलट वाढले आहे असे दिसून येईल.

आदिवासींच्या जमिनींचे हस्तांतर होऊ नये व बेकायदा हस्तांतरित झालेल्या जमिनी त्यांना परत मिळाव्यात यासाठी एक कायदा झाला. (महाराष्ट्र लँड रेव्हिन्यू कोड अँड टेनन्सी लॉज (अमेन्डमेन्ट) अॅक्ट ३५ ऑफ १९७४) या कायद्याची अंमलबजावणी काही काळ बरी झाली परंतु आता त्यातही शैथिल्य आले आहे असे दिसते. मुंबईनजिकच्या भागात अनेक बिगरआदिवासींनी आदिवासींच्या जमिनी बळकावणे सुरू केले आहे. त्याचे एक उदाहरण द्यावयाचे झाल्यास मुंबईतील श्री. विद्याप्रिय बाबला यांचे देता येईल. हे गृहस्थ धनाढ्य असून आफ्रिकेत व्यवसाय करून मुंबईत स्थायिक झाले आहेत. या गृहस्थांना भूमिहीन म्हणून १४ एकर सरकारी जमीन सरकारने दिली आहे. ही जमीन जून १९७८ मध्ये त्यांना देण्यात आली. या गृहस्थांनी वेगवेगळ्या सबबींखाली जमिनी विकत घेण्याचा सपाटा चालविलेला आहे. आदिवासींच्या जमिनी बिगरआदिवासींकडे हस्तांतरित होताना अंमलात आणावयाच्या कार्यपद्धतीचे दिग्दर्शन कायद्यात आहे; परंतु त्याचा अंमल खालापूर (जि. रायगड) येथील तहसीलदारांनी न करता आदिवासींच्या जमिनी श्री. बाबला यांना विकत घेऊ दिल्या याचे पुरावे आम्ही शासनाला सादर करीत आहोत. अशा प्रकारची अनेक प्रकरणे झाली आहेत. शेकडो भूमिहीन आदिवासींचे जमिनी मिळण्यासाठी अर्ज असताना ठाणे जिल्ह्यातील

अल्याळी (ता. पालघर) गावातील ९४ एकर गुरचरण जमीन तीन बिगर आदिवासी सेनाधिकाऱ्यांना एप्रिल १९७८ मध्ये देण्यात आली. याविरुद्ध भूमिसेनेने सत्याग्रह करूनही शासनाने आपला निर्णय बदलला नाही.

## योग्य अंमलबजावणी नाही

आदिवासींची कायदेशीररित्या हस्तांतर झालेली जमीन त्यांना परत मिळावी म्हणून १९७५ मध्ये एक कायदा करण्यात आला (महाराष्ट्र रिस्टोरेशन ऑफ लॅण्ड टू द शेड्युल्ड ट्राइब्ज ॲक्ट १४ ऑफ १९७५) या कायद्याच्या कार्यवाहीविरुद्ध स्थगिती आणली गेली व एकंदरीत या कायद्याची अंमलबजावणी व्यवस्थित झाली नाही. या दोन्ही कायद्यांच्या अंमलबजावणीच्या मूल्यमापनासाठी विधीमंडळ सदस्यांची एखादी समिती नेमावी म्हणून स्वयंसेवी संस्थांनी संयुक्तपणे मागणी केली पाहिजे.

व्यापाऱ्यांकडून होणारे आदिवासींचे शोषण कमी व्हावे म्हणून महाराष्ट्र ट्रायबल्स इकॉनॉमिक कंडिशन (इम्प्रूव्हमेंट) ॲक्ट ५ ऑफ १९७६ हा एक चांगला कायदा करण्यात आला; परंतु त्याची अंमलबजावणी सर्व आदिवासी भागात केली जात नाही आणि व्यापाऱ्यांचे शासनावर दडपण येते असे दिसून येते. या व्यतिरिक्त सरकारी पडीक जमिनी, जंगलजमिनी आणि गायराने यावरील अतिक्रमणे रितसर करणारा एक आदेशही सरकारने जारी केला आहे. (महसूल आणि जंगलखाते एफ्. एल्. डी. १०७९/१३६६ एफ् ३ दि. १२ सप्टेंबर १९७९) या आदेशातील अंमलबजावणीचा कालबद्ध कार्यकाल संपून दोन वर्षे झाली आहेत परंतु अद्यापही अनेक ठिकाणी त्याची कार्यवाही पूर्ण झालेली नाही आणि त्यासाठी स्वयंसेवी संस्थांच्या अर्जावरून सुप्रीम कोर्टाने दोन आदेशही जारी केले आहेत.

केन्द्र सरकारने बांधील मजूरपद्धतीचे निर्मूलन करणारा कायदा केला आहे. शासनाकडून बांधील मजूर शोधण्याचा फारसा प्रयत्न झाला नाही; परंतु काही स्वयंसेवी संस्थांनी विशेषत: भूमीसेना व श्रमजीवी संघटना यांनी याबाबत जोरदार प्रयत्न केले. वसई तालुक्यात अशा प्रकारचे सुमारे २०० बांधील मजूर श्रमजीवी संघटनेने शोधून काढले आहेत. मात्र त्यांच्या पुनर्वसनासाठी अद्यापही शासन काही करीत नाही अशी संघटनेची तक्रार आहे.

## स्वयंसेवी संस्थांचे महत्त्व

या सर्व गोष्टींवरून आदिवासींत काम करणाऱ्या स्वयंसेवी संघटनांनी संयुक्तपणे प्रयत्न केल्याशिवाय आदिवासी विकासाच्या शासनाच्या विविध योजनांची व आदिवासींच्या हितास प्राधान्य देणाऱ्या कायद्यांची अंमलबजावणी व्यवस्थितपणे होणार नाही हे स्पष्ट आहे. एक काळ असा होता की आदिवासींमध्ये काम करणाऱ्या स्वयंसेवी संघटना या आपल्या कामातील एक अडथळा आहेत असा शासनाचा दृष्टीकोन होता. आता मात्र या दृष्टीकोनात लक्षणीय बदल झालेला आढळतो. वीस कलमी कार्यक्रम, दारिद्र्यनिर्मूलन कार्यक्रम व आदिवासी कल्याणयोजना यांच्या अंमलबजावणीमध्ये स्वयंसेवी संस्था महत्त्वाची भूमिका बजावू शकतील याची जाण शासनाला आता येऊ लागली आहे. अर्थात दृष्टीकोनातील हा बदल अजूनही वरिष्ठ पातळीवर असून गाव व तालुकापातळीवरील अधिकाऱ्यांमध्ये तो दिसून येण्यास आणखी काही काळ जावा लागेल. मात्र स्वयंसेवी संघटना व विकाससंस्थांनी शासकीय कल्याणयोजना व कायदे यांचा जास्तीत जास्त फायदा उठवून आदिवासी व इतर गरीबांना संघटित करण्याचे जास्तीत जास्त प्रयत्न करावेत. यासाठी पुढील काही कायदे व योजना उपयुक्त ठरू शकतील असे वाटते.

१) **ग्रामीण रोजगार योजना :** नॅशनल रूरल एम्प्लॉयमेंट प्रोग्राम, रोजगार हमी योजना यासारख्या अनेक ग्रामीण रोजगार योजना अस्तित्वात आहेत. 'महाराष्ट्र रोजगार हमी कायदा, १९७७' या कायद्याद्वारे महाराष्ट्र सरकारने रोजगाराची हमी दिलेली आहे. रोजगार हमीच्या प्रश्नाभोवती गरीबांना संघटित करण्याचे प्रयत्न महाराष्ट्रात बऱ्याच ठिकाणी झाले आहेत. महाराष्ट्रातील रोजगार हमी कायद्याप्रमाणे इतरही राज्यांत असे कायदे व्हावेत अशी मागणी त्या त्या राज्यातील स्वयंसेवी संघटनांनी करणे जरूर आहे.

२) **शेतमजुरांसाठी किमान वेतन :** बहुतेक राज्यात शेतमजुरांसाठी किमान वेतनकायदे अस्तित्वात आहेत. मात्र या कायद्यांची अंमलबजावणी व्यवस्थितरित्या होत नाही तशी ती व्हावी यासाठी शेतमजुरांना संघटित करण्याचे प्रयत्न काही राज्यांत काही संघटना करीत आहेत. इतरही राज्यात असे प्रयत्न होणे आवश्यक आहे.

३) **जमीनसुधार कायदे :** अनुसूचित जाती व जमातीतील कुळांच्या ताब्यातील जमिनींच्या हस्तांतरास मनाई करणारे कायदे अनेक राज्यांत अस्तित्वात आहेत. या जमिनींपासून मिळणाऱ्या उत्पन्नाची वाटणी जमीनमालक व कुळ यांच्यामध्ये कशी करावी यासंबंधीच्या नियमांचाही त्यात समावेश आहे. या जमिनींच्या मालकी हक्कांसंबंधी नोंद कशी ठेवावी व त्यात काही बदल करताना कोणत्या कार्यपद्धतीचे पालन करावे याचेही दिग्दर्शन या कायद्यांत आहे. गरीबांच्या यासंबंधीच्या अज्ञानाचा फायदा उठवून ग्रामीण भागातील श्रीमंत जमीनमालक याबाबतीत बरेच गैरव्यवहार करतात. गरीबांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देऊन व त्यांना संघटित करून या गैरव्यवहारांविरुद्ध आवाज उठविणे शक्य आहे.

४) **वनजमिनी व उत्पादने यावरील हक्क :** वनजमिनी व वनोत्पादने यावरील जंगलवासियांच्या हक्कांवर सतत गदा येत असते. उपजिविकेसाठी जंगलांवर अवलंबून असणाऱ्या लक्षावधी गरीब आदिवासींवर वाढत्या जंगलतोडीमुळे रस्त्यावर येण्याची वेळ येण्याचा संभव आहे. या महत्त्वाच्या प्रश्नाभोवती स्वयंसेवी संघटनांनी आदिवासींना संघटित करणे जरूर आहे.

## एकत्रित प्रयत्न हवेत

आदिवासींमध्ये काम करणाऱ्या स्वयंसेवी संघटनांनी संयुक्तपणे प्रयत्न केल्यास आदिवासी विकासाच्या प्रक्रियेत विधायकरित्या गुणात्मक व संख्यात्मक बदल घडून येऊ शकतील. आदिवासी समाजातील बहुसंख्य लोक दारिद्र्यरेषेखाली असून त्यांना आजवरच्या आर्थिक नियोजनाचा फारसा फायदा झालेला नाही. आदिवासींच्या समस्या-विशेषत: आर्थिक समस्या सोडविण्यासाठी काही खास उपाय योजणे आवश्यक आहे, याविषयी आता दुमत नाही. दुर्दैवाने ज्या पोटतिडीकीने आदिवासींच्या गरीबीविषयी बोलले जाते त्या पोटतिडीकीने त्यांच्याबाबतच्या योजना मात्र अंमलात येत नाहीत असा आजवरचा अनुभव आहे. आदिवासींच्या हिताच्या काही योजना अंमलात आणताना काही प्रस्थापितांच्या हितसंबंधांना धक्का पोहोचणे अपरिहार्य आहे. या योजना अंमलात येताच हे प्रस्थापित त्याविरुद्ध काहूर माजवितात आणि कसे तरी या योजनांची अंमलबजावणी परिणामकारक होऊ न देण्यात यशस्वी होतात, असाच आजवरचा अनुभव आहे. आदिवासी समाजात कार्य करणारे या प्रस्थापित हितसंबंधियांच्या कारवायांवर मात करण्यात फारसे यशस्वी ठरलेले नाहीत. त्या दृष्टीने आदिवासींमध्ये काम करणाऱ्या विविध स्वयंसेवी संस्थांनी एकत्र येऊन कार्य करणे आवश्यक आहे हे स्पष्ट होईल.



# आदिवासी कल्याण योजना

| योजनेचे नाव | योजनेच्या लाभासाठी संपर्क कुठे साधावा. |
| --- | --- |
| **शिक्षण** | |
| १) शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळविणे | विभागीय समाजकल्याणअधिकारी, पुणे, मुंबई, औरंगाबाद व नागपूरविभाग व वसतिगृहाचे अधिक्षक.<br>☆ वृत्तपत्रातून जाहिरात आल्यावर छापील नमुन्यात विशिष्ट मुदतीत विद्यार्थ्याने अर्ज करावयाचा असतो. |
| २) भारत सरकारच्या माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षोत्तर शिष्यवृत्त्या ( कॉलेज विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्त्या | (अ) पुणे, मुंबई, औरंगाबाद व नागपूर जिल्ह्यासाठी विभागीय समाजकल्याण अधिकारी व<br>(ब) अन्य जिल्ह्यासाठी–समाजअधिकारी, जिल्हा परिषद.<br>☆ ह्या शिष्यवृत्त्यांसाठी कॉलेजमार्फत छापील नमुन्यात व विशिष्ट मुदतीत अर्ज करावयाचा असतो. |
| ३) औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांना विद्यावेतने ( शिष्यवृत्त्या ) | समाजकल्याणअधिकारी, जिल्हा परिषद<br>♣ प्रशिक्षण संस्थेमार्फत विशिष्ट नमुन्यात अर्ज करावयाचा असतो. |
| ४) विद्यार्थ्यांना वित्तीय सहाय्य, वैद्यकीय विद्यार्थ्यांना सहाय्य | संचालक, समाजकल्याणविभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे १. |
| ५) शिक्षणफी, परीक्षाफी व अन्य शिष्यवृत्त्या | समाजकल्याणअधिकारी, जिल्हा परिषद. |
| ६) वसतिगृहांसाठी स्वयंस्फूर्त संस्थांना वित्तीय सहाय्य ( ग्रॅन्ड इन एड ) | समाजकल्याणअधिकारी, जिल्हा परिषद. |
| ७) गट निवासी केंद्रशाळा व विद्याश्रममध्ये प्रवेश | गट निवासी केंद्र शाळेच्या प्रवेशासाठी शिक्षणाधिकारी व विद्याश्रमाच्या प्रवेशासाठी संबंधित जिल्ह्याच्या समाजकल्याणअधिकाऱ्याशी संपर्क साधावा. |

| | |
|---|---|
| ८) प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत पाटया, पुस्तके, गणवेश, लेखनसाहित्य इत्यादी. | जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांतील पहिल्या व दुसऱ्या वर्गांच्या विद्यार्थ्यांसाठी या सवलती आहेत. शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद. |
| ९) शासकीय आश्रमशाळेत प्रवेश मिळवणे | आदिवासी कल्याणअधिकारी व आश्रमशाळाप्रमुखा-कडे शाळा सुरू होण्यापूर्वी अर्ज करणे जरुरीचे आहे. |
| १०) आदिवासी भागातील व अन्य आय. टी. आय. मध्ये प्रवेश | औद्योगिक प्रशिक्षणसंस्थांचे प्राचार्य. जाहीर केलेल्या मुदतीत अर्ज करावा लागतो. |
| ११) आदिवासींकरिता शासकीय वसतिगृह सुरू करणे | संचालक, आदिवासी कल्याण विभाग महाराष्ट्र राज्य, पुणे ९. |
| १२) शासकीय व खाजगी आश्रमशाळा उघडणे ( विमुक्त जाती व भटक्या जमातींच्या आश्रम-शाळांसह ) | संचालक, आदिवासी कल्याण विभाग, म. रा. पुणे९ संचालक समाज कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य पुणे. |
| १३) स्वयंस्फूर्त आश्रमशाळांना अनुदान देणे (विमुक्त जाती व भटक्या जमातींच्या आश्रमशाळांसह ) | संचालक आदिवासी कल्याण विभाग, पुणे ९, संचालक समाज कल्याण विभाग, म. रा. पुणे १. |
| १४) सैनिकी शाळांमध्ये प्रवेश मिळवणे, फीमाफी व शिष्यवृत्ती मिळवणे | प्राचार्य, सैनिकी शाळा, सातारा, पुणे, नासिक. प्रवेशा नंतर प्राचार्यांच्यामार्फत शिष्यवृत्ती व फीमाफीसाठी समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद व विभागीय समाज कल्याण अधिकारी यांचेकडे अर्ज करावयाचा असतो. |
| १५) आदिवासी विकास महामंडळातर्फे चालविल्या जाणाऱ्या आश्रमशाळांमध्ये प्रवेश | प्रादेशिक व्यवस्थापक, आदिवासी विकास महामंडळ, पुणे, यवतमाळ, नाशिक, नंदुरबार, ठाणे, नागपूर, चंद्रपूर व आश्रमशाळाप्रमुख यांचेकडे अर्ज करावा. |
| १६) मागासवर्गीय मुलांसाठी बालवाडी सुरू करणे | समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद व गट विकास अधिकारी पंचायत समिती. |
| १७) मोटारगाडी चालनाचे प्रशिक्षण | संचालक समाज कल्याण, विभाग म. रा. पुणे १. |
| १८) नोकरीसाठी स्वतंत्र नांवनोंदणी | समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद व संचालक समाज कल्याण विभाग, म. रा. पुणें १. |
| १९) शैक्षणिक संस्थांमध्ये मागासवर्गीयांना प्रवेशाचा हक्क | संचालक समाज कल्याण विभाग म. रा. पुणे, विभागीय समाज कल्याण अधिकारी, समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद. |

## आर्थिक उन्नति

| | |
|---|---|
| २०) विद्युतपंप संच पुरविणे (फक्त आदिवासींसाठी) | आदिवासी कल्याण अधिकारी, आदिवासी लोकसंख्येचे जिल्हे |
| २१) तेलइंजिनाचा संच पुरविणे ( फक्त आदिवासीं-साठी ) | आदिवासी कल्याण अधिकारी (जिल्हा) |
| २२) खावटी कर्जपुरवठा करणे | आदिवासी सहकारी सोसायटी व आदिवासी विकास महामंडळाचे स्थानिक कार्यालय |
| २३) जोडव्यवसाय व उद्योगधंदे | समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद |
| २४) जमिनीच्या बांधबंदिस्तीसाठी अनुदान | समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद |
| २५) विहिरी व अवजारे यांचेसाठी मदत | समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद |
| २६) गोबरगॅस युनिट | खादी ग्रामोद्योग मंडळ, जिल्हा शाखा |
| २७) अधिक उत्पन्न देणाऱ्या पिकांच्या बी बियाणाचा खताचा व जंतुनाशकाचा पुरवठा व शेती उत्पादनाविषयी अन्य सवलती | गट विकास अधिकारी पंचायत समिती, शेती विस्तार अधिकारी पंचायत समिती, शेती विस्तार अधिकारी जिल्हा परिषद. |
| २८) शेतीसाठी व दुभती जनावरे घेण्यासाठी कर्ज पुरवठा, अनुदान व सूट | आदिवासी सहकारी सोसायटी, जिल्हा मध्यवर्ती सह-कारी बँकेची स्थानिक किंवा जवळची शाखा |
| २९) छोटे व मध्यम उद्योगधंदे काढण्यासाठी सव-लतीच्या दरात कर्ज व मदत | महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ, मुंबई |
| ३०) अविकसित ग्रामीण क्षेत्रात तेलइंजिन विकत घेण्यासाठी अनुदान | समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद व गट विकास अधिकारी पंचायात समिती |

## गृहनिर्माण

| | |
|---|---|
| ३१) अनुसूचित जाती जमातींकरिता सहकारी गृह-निर्माण योजना | विभागीय समाज कल्याण अधिकारी पुणे, औरंगाबाद, नागपूर, मुंबई. समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद |
| ३२) वैयक्तिक व गट गृहनिर्माण योजना | समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद. |
| ३३) वनगृह निर्माण योजना ( जंगलवासीय आदि-वासींसाठी ) | रेंज वनअधिकारी, वनअधिकारी ( विभाग व जिल्ह्याचे) |

| | |
|---|---|
| ३४) गृहनिर्माण मंडळाच्या गाळ्यांमध्ये मागासवर्गीयांना राखीव गाळे ( शहरी विभागासाठी ) | गृहनिर्माण मंडळाचे कार्यालय, अशा गाळ्यांसंबंधी आगाऊ जाहिरात येते. ठराविक छापील नमुन्यात अर्ज करावा लागतो. |

## वनविभाग

| | |
|---|---|
| ३५) जंगल कामगार सहकारी संस्थांना मदत, अनुदान व सहाय्य | असिस्टंट रजिस्ट्रार, को-ऑपरेटिव्ह संस्था व वनाधिकारी (जिल्ह्याचा अगर स्थानिक विभागाचा ) |
| ३६) जंगलविषयक विशेष सवलती व फायदे | रेंज फॉरेस्ट अधिकारी व वनअधिकारी ( स्थानिक विभागातील प्रत्येक जिल्ह्यातील वनविभागातील सवलती व फायदे निरनिराळे आहेत. |

## प्रासंगिक योजना

| | |
|---|---|
| ३७) आदिवासी युवक प्रशिक्षणसत्रामध्ये प्रवेश | संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षणसंस्था, २८, राणीचा बाग, म. रा. पुणे-१. |
| ३८) आदिवासी संस्कृती, प्रश्न यांचे संशोधन किंवा योजनांचे मूल्यमापन करण्याकरिता संशोधन शिष्यवृत्ती व निर्वाहभत्ता ( प्रतिवर्षी दोन ) | संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षणसंस्था, महाराष्ट्र राज्य पुणे १. जाहिरात प्रसिद्ध झाल्यानंतर अर्ज करावा लागतो. |

( महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेने प्रसिद्ध केलेल्या पुस्तिकेच्या आधारे )

ग्रामस्वराज्यसमिती

# शोषणमुक्त समाज स्थापन करण्याचा प्रयत्न

'ग्रामस्वराज्य' समितीच्या नावातच मुळी गांधी विचाराचा अर्थबोध होतो. गांधीजींचा जो सर्वगामी विचार त्यालाच पुढे सर्वोदय विचार म्हणून ओळखले जाऊ लागले. 'शासनविहीन शोषण मुक्त-ग्रामोद्योगमूलक समाजाची स्थापना' हे त्याचे उदात्त ध्येय. सर्वोदयी चळवळीने एके काळी अख्ख्या भारताचेच नव्हे तर जगाचे लक्ष वेधून घेतले होते. विनोबांच्या क्रांतिकारी भूदान-ग्रामदान आंदोलनाने सर्वांना गोड धक्का दिला होता. देशातील जनतेच्या समस्या सोडवण्याचा मूलगामी व एकमेव पर्याय ग्रामदानाच्या विचारात आहे. हे सर्व पक्षीय नेते व सरकारच्या लक्षात आले होते आणि सरकारने 'ग्रामदानकायदा' करून सर्वोदय-विचाराचे संगोपन करण्याचे ठरवले. जनसामान्यांनाही सर्वोदय विचाराची महत्ता पटली. हजारो गावे ग्रामदानात सामील होण्याचा संकल्प जाहीर करू लागली. लोकांनी आपले गाव दान करण्याचा संकल्प केला, तरी प्रत्यक्ष त्या कायद्याप्रमाणे नोंदणी करण्याचे काम अनेक कारणांनी रेंगाळत गेले व महाराष्ट्रात अवघी २० गावे कायदेशीर नोंदली गेली. या गावांच्या विकासाचे कार्य हाती घेणे जरूर होते. म्हणून सर्वोदय मंडळाने १९७२ साली निर्णय घेऊन सर्वांत जास्त ग्रामदानी गावे असणाऱ्या ठाणे जिल्ह्यात 'ग्राम स्वराज्य अभियान' सुरू केले.

ठाणे जिल्ह्यातील जव्हार-मोखाडे, वाडा हे आदि-

वासींचे तालुके, सह्याद्रीच्या अतिदुर्गम भागात वसलेले. सर्व बाजूंनी दुर्लक्षिले गेल्याने दारिद्र्य, अज्ञान, शोषण, अनारोग्य व्यसनाधीनता यांनी ग्रासलेले. या सर्व समस्यांवर उपाय व पर्यायी व्यवस्था म्हणून समितीने शेतीविकास, शोषणमुक्तीसाठी धान्यकोठार तथा आर्थिकफंड गावपातळीवर उभारणे, अनारोग्यासाठी सफाईचे कार्यक्रम, व्यसनमुक्तीसाठी व अदालतमुक्तीसाठी ग्राममंडळाची शक्ती वाढवणे या सर्वांतून लोकांनी संघटित होऊन किमान आपल्या गावाच्या समस्या सोडवाव्या, लोकशाही संकेताप्रमाणे लोकांनी आपल्या गावाचा कारभार चालवावा, गाव स्वावलंबी व समृद्ध बनेल याच्या योजना आखाव्या आणि असे एक आदर्श गाव उभे राहावे, या कल्पनेने कार्यकर्त्यांनी कामाला सुरुवात केली.

## लोकजागृतीला विरोध

लोकांकडून या विचाराचे स्वागत होत होते. कार्यकर्ते मोठ्या जिद्दीने प्रचारकार्यास लागले होते. सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक जागृतीचे कार्यक्रमाने जव्हार तालुका ढवळून निघाला. लोकांच्या वाढत्या प्रतिसादाबरोबरच प्रस्थापितांची शक्तीही जागली. ग्रामस्वराज्यसमितीच्या कामाला खीळ कशी घालता येईल ? याचा प्रयत्न सुरू झाला. व्यापारी, कर्मचारी व पुढारी यांच्यातील काही मंडळींनी चोर मार्गांनी उरफाटा प्रचार सुरू केल्याचे निदर्शनास आले. वास्तविक आम्ही कोणाविरुद्ध प्रचार करीत नव्हतो. केवळ जनतेच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक समस्या सोडविण्यास पर्यायी योजना सुचवून लोकांना संघटित व आत्मनिर्भर करण्याचा प्रयत्न करीत होतो; पण ही लोकजागृति वा हितसंबंधी लोकांना नको होती. त्यांना त्यात भीती का वाटावी याची कारणे उघडच होती.

प्रस्थापित व कर्मचाऱ्यांच्या मतलबी विरोधाला व कारवायांना तोंड देण्याची पहिली गरज आम्हास वाटू लागली. याच सुमारास १९७४ साली देशात संघर्षाची लाट उसळली. सर्वोदयाचे ज्येष्ठ नेते लोकनायक जयप्रकाश नारायण यांनी पुढाकार घेऊन या संघर्षाला गांधीजींच्या मार्गावर आणून सोडले. ती भूमिका आम्हाला स्वागतार्ह वाटली. प्रबोधन आणि रचनेबरोबर संघर्षाची भूमिका आम्ही स्वीकारली व नव्या पद्धतीने काम करण्यासाठी विक्रमगड भागातील ६० गावांचे क्षेत्र निवडले.

## पोलीसठाण्यावर मोर्चा

सवादे या गावी सवती–सवतीचे घरगुती कारणावरून भांडण झाले. एक सवत विक्रमगड पोलीसस्टेशन मध्ये आली. तेथील हवालदारांना तिने झालेल्या भांडणाची सर्व कहाणी सांगितली. त्या वेळी हवालदारांनी तिला सांगितले, मी तुझे आपसात भांडण मिटवून देतो. तू मला २० रु. एक कोंबडी दे व रात्री माझ्या खोलीवर ये म्हणून सांगितले. तिला एकटीला पाहून विनयभंग करण्याचा प्रयत्न केला. तिच्या तळपायाची आग मस्तकाला गेली. ती तक्रार आमच्या कार्यालयात आली व झालेली हकीगत सांगितली. समितीने एका मोठ्या मोर्चाचे आयोजन केले व आदिवासींवरील पोलिसी अन्यायाचा निषेध करून पोलिसांवर कारवाई करण्याची मागणी केली. त्याप्रमाणे त्या हवालदाराला निलंबित करण्यात आले. सार्वत्रिक वातावरण तयार झाले. ग्रामस्वराज्यसमिती लोकांसमोर आली. जमीनविषयक, तलाठीबद्दल, भ्रष्टाचार, भांडणे अशी प्रकरणे घेऊन लोक समितीकडे यायला लागले व त्यातून एका तक्रार निवारण केंद्राची व्यवस्था करावी लागली. दर बुधवारी लोक आपल्या अनेक तक्रारी येथे आणतात, समिती तक्रारीच्या संबंधातील दोन्ही पक्षांस एकत्र बोलावते व शहानिशा करून सर्वांसमक्ष लोकांनाच निर्णय घ्यावयास लावते आणि आश्चर्य वाटेल की, 'तुझ्या बायकोची सोडचिठ्ठी करून देतो' म्हणून शंभर रुपये लाच घेणारा पोलीस या केंद्रात येऊन लंगोटीतल्या आदिवासींची सर्वांसमक्ष माफी मागतो व घेतलेले पैसे परत करतो. इतकेच नव्हे तर, 'बायको नांदत नाही.' किंवा नवरा नांदवत नाही, म्हणून परस्परांच्या विरोधी अनेक कौटुंबिक भांडणे मिटवावी हा समितीचा उद्देश आहे. बुधवारच्या दिवशी तक्रार निवारण केंद्राला 'जनता कोर्टाचे' स्वरूप आलेले दिसते. परिणामी पोलिसी दहशत, शोषण व भ्रष्टाचार आणि अन्यायी वृत्तींना पुरती दहशत बसली आहे.

## शैक्षणिक कार्य

या आदिवासी भागातील जि. प. च्या अनेक प्राथ-

मिक शाळा समाधानकारक चालत नाहीत अशा लोकांच्या साधार तक्रारी. त्या व्यवस्थित चालाव्या म्हणून समितीने संबंधित अधिकाऱ्यांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला; पण अधिकाऱ्यांचीही अनास्था असल्याचे दिसून आल्यावर समितीने सहा गावांतून स्वत:च्या बालवाड्या सुरू केल्या. बालवाडी चालविणाऱ्या भगिनी त्या त्या गावातच रहातात. शिक्षणाबरोबरच आरोग्याचा प्रश्न पुढे आला, त्यामुळे या बालवाडीतून प्रथमोपचार केंद्र सुरू केले. सानेगुरुजी कथामाला, आदिवासी सेवामंडळ, आदिवासी जंगल कामगार सोसायट्या यांचे या कामी खूप सहकार्य लाभले व लाभत आहे. परिणामी शाळाही चालायला लागल्या.

## शिवणकला प्रशिक्षणवर्ग

अर्धवट शिक्षण सोडलेल्या आदिवासी तरुण–तरुणींना औद्योगिक शिक्षण देऊन रोजगार उपलब्ध व्हावा म्हणून शिवणकलेचे शिक्षण देण्याचा विचार समितीने केला. मुलुंड लायन्स क्लबचे कार्यकर्ते व आमचे सहकारी मा. ठाकूरसाहेब यांनी १० शिवणयंत्रे पुरविली आणि गेली पाच वर्षे विक्रमगड भागात शिवणकलेचा वर्ग चालत आहे. जवळजवळ १०० तरुण–तरुणी शिक्षण घेऊन आपला उद्योग करीत आहेत.

## प्रौढशिक्षणाचा अनुभव

जनतासरकारच्या काळात प्रौढशिक्षणाची क्रांतिकारी योजना पुढे आली. या योजनेत जनजागरणाचा मुख्य उद्देश. समाजपरिवर्तनाचा व शिक्षणाचा आशय आणि समाजसेवा करणाऱ्या निष्ठावंत संस्थांना प्राधान्य आणि स्वातंत्र्य ही तीन वैशिष्टये प्रामुख्याने या योजनेची होती. समाजप्रबोधनासाठी स्वत: सरकार पुढे येऊन सामाजिक संस्थांना आवाहन करते ही बाब आशादायक होती व म्हणून आम्हीही योजना राबविण्याचे ठरविले. प्रौढ शिक्षण योजना आम्ही घेतली व ३० गावांत ३० प्रौढ स्त्री–पुरुषांचे वर्ग १० महिनेपर्यंत काळजीपूर्वक चालवले. नवसाक्षरांची साक्षरता किमान टिकून रहावी म्हणून वाचनालयाची व्यवस्था केली. प्रौढशिक्षणाचे कार्य अतिशय महत्त्वाचे आहे. आमच्या शक्तीप्रमाणे शक्य तेवढे वर्ग स्वत: सुरू करावयाचा निर्णयही आम्ही घेतला. आमच्यापरीने कार्यक्रमाची यंत्रणा उभी करण्याचे ठरविले आहे. ज्या गावात बालवाडी आहे त्या त्या गावात प्रौढशिक्षणाचे वर्ग सुरू आहेत.

## संघटन उभे राहिले

प्रौढशिक्षणातून अनेक गावांशी नाते जुळले. तरुणांची, महिलांची शिबिरे घेतली. स्वत:ची व सामाजिक जाण अधिक व्यापक झाल्याने अनेक तरुण पुढे आले. तरुणमंडळे, महिलामंडळ व ३० गावांत लोक समित्यांच्यारूपाने संघटन उभे राहिले. ग्रामपातळीवर बसून गावच्या प्रश्नांचा विचार करून ते प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न बऱ्याच ठिकाणी होऊ लागला. रोजगारहमीचे काम, त्यावरील पगार याकडे गावोगावचे लोक लक्ष ठेवतात. त्यामुळे अधिकारीवर्गाच्या भ्रष्टाचाराला आळा घातला गेला. विशेष प्रकरणासंबंधी लोक समितीच्या कार्यकर्त्यांकडे येतात. गवताचा धंदा करणारे लोक आदिवासींचे गवत घेताना वजनात कशी लबाडी करतात हे एका ग्रामीण कार्यकर्त्याने गवताच्या गाडीने पुन्हा वजन करून लोकांना दाखवून दिले. वनरक्षकाने कोणाकडून गैरमार्गाने पैसे, कोंबडी घेतली यावर हे लोक आता सतत पाळत ठेवून असतात.

महिला मंडळाचा पराक्रमही असाच. तिळसा या गावी महिलामंडळ स्थापन केले. नुसते हळदी-कुंकवाचे नव्हे तर जागृत निर्भय महिलामंडळे आहेत. त्या मंडळाच्या महिलांनी घरोघरची दारू बंद केली. गावातून घालविली. सरकारकडून म्हशींची योजना राबविली. त्या गावात आज सदस्यांनी ५३ म्हशी या योजनेमार्फत घतल्या. आज त्या गावात सुंदर वातावरण तयार झाले. त्या गावात महाशिवरात्रीची खूप मोठी यात्रा भरते. त्या यात्रेत दारूचे दुकान एका बाईने चालू केले. दारूचे दुकान अशा शुभ यात्रेत पाहिल्याबरोबर महिलांनी विचार केला आणि त्या दुकानात जाऊन ते दारुचे दुकान उध्वस्त केले.

रोजगारहमीच्या कामाचा पगार ३–४ आठवडेपर्यंत कधीकधी मिळत नाही एक तर अधिकाऱ्यांची बेफिकिरी किंवा निरनिराळे मस्टर भरून खोट्या हजेरीचे पैसे लंपास करण्याचा धंदा. यामुळे पगार देण्यास विलंब व्हायचा. महिला मंडळाच्या भगिनींनी पुढाकार घेऊन 'घेराव' घातला आणि पगार झाला. अशा रीतीने अडाणी आदिवासी–महिला संघटित होऊन आपली ताकद वाढवीत आहेत.

## सरकारी योजना व कायद्याची राबवणूक

सरकारच्या वतीने जनकल्याणाचे अनेक फायदे व

योजना होत असतात; पण शासनयंत्रणेद्वारा त्यांची यशस्वी अंमलबजावणी होतेच असे नाही. आम्ही आमच्या क्षेत्रात आवश्यक त्या कायद्यांची वा योजनांची राबवणूक होईल याची दक्षता घेतो. त्यासाठी प्रचार करून लोकमानस तयार करतो. रोजगार हमी योजना, किमान वेतन कायदा, कर्जमुक्ती कायदा, बांधील गडी मुक्तीचा कायदा, पंचायतसमिती जिल्हा परिषदांच्या विकासयोजना, बँकेच्या योजना इत्यादी. ज्या ज्या ठिकाणी गोरगरीबांच्या हिताच्या योजना असतील; कायदे असतील त्यांची अंमलबजावणी होईल असा आग्रही प्रयत्न समितीच्या वतीने केला जातो. याने प्रश्न सुटतीलच असे नाही. त्यासाठी समग्र ग्रामविकासाची योजना बनवून सरकारसमोर मांडण्याचा आमचा मानस आहे.

काही वेळेस लोकांच्या गरजेच्या प्रश्नासाठी लढा देणे अपरिहार्य होऊन जाते. तेव्हा समिती तटस्थतेची भूमिका न घेता लढा स्वीकारते. जमिनीच्या अतिक्रमणांचा प्रश्न आज महाराष्ट्रभर गाजत आहे. अनेक वर्षे सरकारने या प्रश्नाकडे दुर्लक्ष केले. जंगलभागात राहाणाऱ्या आदिवासींना जंगल आणि जमीन याशिवाय दुसरे उपजीविकेचे साधन नाही. ज्यांच्याकडे जमीन नाही त्यांनी मोळ्या विकून तरी पोट भरले पाहिजे किंवा सरकारी जमिनीवर अतिक्रमणे करून धान्योत्पादन केले पाहिजे. या दोन्ही मार्गांना जेव्हा सरकार बंदी करते तेव्हा त्यांची भूक शांत राहू शकत नाही. यातूनच जंगल अतिक्रमणाचे आंदोलन जन्मास आले. दुसरेही एक कारण आहे की, पुलोद सरकारने १९७८ सालची अतिक्रमणे कायम करण्याची घोषणा केली होती. त्या आधारे ठाणे जिल्ह्यातील ग्राम स्वराज्य समिती, भूमिसेना यांनी संयुक्तपणे लढा पुकारला. आमच्या क्षेत्रात पाच ठिकाणी दोन हजार लोकांनी सत्याग्रह करून अतिक्रमीत जमिनीवर जाहीर कब्जा केला. पुढे हे आंदोलन व्यापक करण्यासाठी महाराष्ट्रातील स्वयंसेवी संघटनांची एक ‘ जबरन जोत आंदोलन कृतिसमिती ’ निर्माण करून आंदोलन मजबूत केले. हा प्रश्न लढवून काही प्रमाणात सोडवला गेलाही.

### कलापथक

विचारा प्रचाराखेरीज सभासंमेलन, शिबीरे अशा प्रचलित साधनांचा वापर करतोच. याशिवाय ‘ सर्वोदय साहित्य ’ विक्रीची एक स्वतंत्र यंत्रणा समितीअंतर्गत चालते. सुदैवाने समितीस काही कलावंत कार्यकर्ते लाभल्याने एक कलापथक उभे राहिले. सद्यपरिस्थितीचे यथार्थ वर्णन करणारी स्वरचित गीते, समाजातील जुन्या रूढींवर, दर्शन घडविणाऱ्या नकला, कळसूत्री बाहुल्यांचा प्रसंगोचित अभिनय आणि वाद्यांची धुमाळी जनमानसांचा ताबा घेते व त्यातून आमचे अर्धे काम यशस्वी होते.

### बालशिक्षण प्रकल्प

विक्रमगड जि. ठाणे जवळच शेवतागावी बालशिक्षण प्रकल्प गेले दोन वर्षांपासून सुरू केला. गावातील ६०–६५ मुलामुलींना बालवाडीपासून माध्यमिक शाळेपर्यंत शिक्षण चांगले मिळावे असा प्रयत्न आहे. शिक्षिका शिवाय एक जादा शिक्षक ठेवून मुलांचा अभ्यास पुरा केला जातो. शिक्षणाप्रमाणेच मुलांचे आरोग्य चांगले रहावे म्हणून मुलांना नास्ता दिला जातो. सायंकाळी खेळात मुले उत्साहाने भाग घेतात. मुलांची आरोग्यतपासणी घेऊन त्यांना व्हिटामिन्सच्या गोळयाही दिल्या जातात. गावात रचनात्मक कार्याच्या दृष्टीने प्रयत्न चालू आहेत. हा बालशिक्षणप्रकल्प बंगलोरच्या ॲक्शन ॲड या संस्थेच्या आर्थिक सहकार्याने चालतो.

### लिफ्ट एरिगेशन योजना

मोह बु ॥ या गावी आमची बालवाडी सुरू आहे. त्या गावाशी सतत संपर्क.तेथे बारमाही पाणी असलेल्या नदीतून लोकांनी दुय्यम पिके घ्यावेत असे समितीला वाटत होते. म्हणून मुलुंडच्या लायन्स क्लबशी संपर्क साधून लिफ्ट एरिगेशनचा प्लॅन श्री. ठाकूर इंजिनियर मुलुंड यांनी तयार केला व लगेच लायन्स क्लबने नदीवर मोटर बसवून शेतीसाठी पाणी दिले. चालू वर्षी दहा शेतकऱ्यांनी १०० एकर जमिनीत पीक घेण्याचे ठरविले. ३० हजार रु. खर्च करून लोकांच्या सहकार्याने ही योजना ग्रामस्वराज्य समितीने राबवली. दरवर्षी हे क्षेत्र वाढणार आहे.

समितीच्या एका आदिवासी कार्यकर्त्याच्या शेतीचा कब्जा करण्याच्या हेतूने फादर फर्नांडिस यांनी कार्यकर्त्यावर हल्ला केला. सुरीने कार्यकर्त्याला घायाळ केले. इतर लोकांच्या मदतीमुळे कार्यकर्ता वाचला. या

संबंधी कोर्टाने केस दाखल केली आहे. ७–८ वर्षांपूर्वी फर्नांडिसने आदिवासी लोकांना तेल, कपडा आदि वस्तूंची मदत केली होती. नंतर या लोकांच्या घरी येशूचा फोटो आणि मेरीची मूर्ती ठेवली. हा सारा धर्मप्रचार आहे हे माहित झाल्यावर बऱ्याच लोकांनी आपल्या घरातील फोटो व मूर्ती सादर परत केली. त्यामुळे फादर खवळले आणि त्यांना सर्वांना धमकावयास सुरुवात केली. कोणाचे धान्य, कोणाचा बैल जप्त केला. बराच त्रास दिला. समितीने हा प्रश्न हातात घेऊन योग्य ती कार्यवाही सुरू केली आहे. या प्रकरणाला वृत्तपत्रातून प्रसिद्धी दिली. त्याच्या क्षेत्रात सामूहिक पदयात्रा काढून गावागावातून सभा घेऊन गाववाल्यांना फादरबाबत सावध राहावयास सांगितले.

## गोवधबंदी सत्याग्रह

शेतकऱ्यांना शेतीसाठी बैल मिळत नाहीत, हे बरेच महाग झाले आहेत आणि मुंबई येथील देवनारच्या कत्तलखान्यात प्रत्येक दिवशी शेकडो बैल कापले जातात. सरकार खुद्द गोहत्याबंदीसाठी कायद्याच्या विरुद्ध कार्य करीत आहे. गेली कित्येक वर्षे बैलांचा प्रचंड संहार चालला आहे. हा थांबावा म्हणून पू. विनोबाजींच्या आदेशाने मुंबईतील देवनार येथे कत्तलीसाठी जाणाऱ्या बैलांना अडविण्याचा सत्याग्रह सुरू आहे. त्यात सहभागी होण्यासाठी ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण कार्यकर्ते, आदिवासी शेतकरी २०–२५ च्या तुकडीने मुंबईस जाऊन १५–२० दिवस राहून देवनार येथील कत्तलखान्यावरील सत्याग्रहात भाग घेतला. आतापर्यंत २०० स्त्रीपुरुषांनी भाग घेतला.

मुंबईच्या कत्तलखान्यात कत्तलीसाठी बऱ्याच राज्यांतून बैल येत असतात. ठाणे जिल्ह्यातील मुंबई–अहमदाबाद हायवेवरून, गुजरात राज्यातून मोठ्या संख्येने बैल येतात. ठाणे जिल्ह्यातील तलासरी येथे अशा बैलांचा मोठा बाजार भरतो. समितीच्या कार्यकर्त्यांनी तेथे सत्याग्रह करून हा बाजार बंद केला. येतात त्या बैलांना परत पाठविणे किंवा पोलिसांच्या हवाली करणे याचा परिणाम असा झाला की, गेले वर्षभरात तेथील गुरांचा बाजार बंद आहे.

आदिवासी समाजात दारू पिण्याचे प्रमाण फार आहे. त्यातून त्यांची सुटका व्हावी म्हणून बरीच आंदोलने होत असतात; परंतु जितके यश यावयास पाहिजे तितके येत नाही. जे लोक भक्तीभावनेने त्रिंबकेश्वर किंवा पंढरपूर या तीर्थक्षेत्री जातात ते लोक स्वयंप्रेरणेने दारू न पिण्याचा निर्णय त्वरीत घेत असतात. या लोकांची संख्या वाढविण्याचा प्रयत्न समितीकडून केला जातो आणि ज्यांनी दारू सोडली त्यांची प्रेरणा कायम रहावी म्हणून वारकरी मेळावे घेतले जातात. राष्ट्रीय किर्तनाद्वारे राष्ट्रीय भावना वाढविण्याचाही प्रयत्न असतो. आतापर्यंत १००० आदिवासी परिवार दारूमुक्त झाले आहेत.

ग्रामीण शक्ती संघटित व्हावी, गावाच्या प्रश्नाचा विचार प्रथम गावकऱ्यांनी एकत्र येऊन करावा, आपले प्रश्न सोडवावेत. यासाठी गावोगाव ग्रामसभा संघटित करण्याचा प्रयत्न असतो. वाडा तालुक्यातील तिळसा भागात, तसेच विक्रमगड विभागात ग्रामस्वराज्याच्या दृष्टीने ग्रामसभा, लोकसमित्या, महिला व युवक मंडळे संघटित झाली आहेत.

## प्रशिक्षण

विशेषतः युवक आणि महिलांची शिबीरे बरीच झाली. गावकऱ्यांचीहि होतात त्यात ग्रामसभाचे कर्तव्य, किमान वेतन, रोजगार हमी योजना, पोलिसांची कर्तव्ये आणि कायदा, जंगलाचे फायदे आदि संबंधी माहिती दिली जाते आणि चर्चाही केली जाते. काही पोलिसकेसेस तसेच काही गावाच्या घटना घेऊन त्यावरही चर्चा केली जाते.

## अंतिम लक्ष्य

लोकांचे तात्कालिक प्रश्न सोडविण्यात मदत करणे, शोषित व दलित आदिवासींवरील अन्याय, अत्याचारांना वाचा फोडणे, त्यासाठी चळवळ करणे, ज्वलंत प्रश्नावर आंदोलने संघटित करणे, सरकारी योजना व कायद्याची अंमलबजावणी करवून गरिबांना लाभ मिळवून देणे शैक्षणिक कार्य करणे ही सर्व जनसामर्थ्य वाढविण्याची साधने आहेत. काही साध्येही आहेत; परंतु शोषण व विषमतेवर आधारलेली संपूर्ण समाज रचना बदलल्या शिवाय हे प्रश्न कायमचे मिटणार नाहीत. या समाज परिवर्तनातील जो मुख्य केंद्रबिंदू 'जनता' या जनतेला स्पष्टपणे परिस्थितीची व समाज व्यवस्थेची जाणीव देऊन जागविल्याशिवाय गत्यंतर नाही अशी आमची धारणा आहे.

## कार्यनियोजन

जव्हार, विक्रमगड, वाडा, कासा ही चार प्रमुख केंद्रे आहेत काही उपकेंद्रे आहेत. महिन्यातून दोन दिवस सर्व कार्यकर्ते एकत्र येतात. कामाचा विचार करतात, आयोजन करतात, अध्ययन करतात.

आम्ही प्रबोधन, रचना, संघटन व संघर्ष हा कार्यक्रम स्वीकारला आहे. बाहेरून बरेच महानुभव या क्षेत्राला भेट देऊन जातात. कामाची प्रशंसाही करतात. आपण पण यावे, पहावे आणि सहकार्य करावे. या कामास सर्वांनी साह्य केले तरच देशात नवसमाज प्रस्थापित होऊ शकेल.

**—कु. शोभा मुळे**
(विक्रमगड जि. ठाणे)

---

# चला आपुण बघायाला

---

(रायगड जिल्ह्याच्या कर्जत आदिवासी भागात काम करणाऱ्या जागृत भाऊबंदी संघटनेने डिसेंबर ८३ मध्ये सामुदायिक विवाहमेळावा आयोजित केला होता. या संघटनेच्या प्रदीप गायकवाड व इतर कार्यकर्त्यांनी या मेळाव्यात सहभागी होण्यास आदिवासींना उद्युक्त करण्यासाठी आदिवासी पाडयापाडयांवर जाऊन प्रचार केला. एका ठाकुरवाडीमधील रात्रीच्या बैठकीनंतर या मेळाव्यात सहभागी व्हावे की नाही याविषयी शेकोटीभोवती बसून आदिवासी आपापसात चर्चा करत होते. ही चर्चा त्यांच्या नकळत ऐकून प्रदीप गायकवाड यांनी पुढील गाण्यात ती मांडली आहे. यातील मामा हा वयस्कर असून जुन्या पिढीचा प्रतिनिधी आहे, जुन्या रूढी–परंपरांचा तो अभिमानी आहे. धर्मा हा मध्यमवयीन असून या मेळाव्याविषयी त्याला उत्सुकता आहे, तर गोमा हा तरुणपिढीचा प्रतिनिधी. त्याला या मेळाव्यात लग्न करण्याची इच्छा आहे; परंतु लोक काय म्हणतील याची त्याला धास्ती आहे. एखादी नवीन कल्पना स्वीकारताना आदिवासी समाजात असणाऱ्या विभिन्न मतप्रवाहांचे व अंत:प्रवाहांचे दर्शन यातून घडते.)

(चाल : तुझी चाल तुरुतुरु)

धर्मा : ए रामा–गोमा–दामा
संग येताय का मामा
मी जातोय मेळाव्यालाऽऽ
कमी खर्चात लग्न
ते करतात म्हणं
चला आपुण बघायालाऽऽ ।। ध्रु ।।
दहा–पंधरा लग्न जमून ऽऽऽ
एकाच गावात येउन ऽऽ
एकाच भटजीच्या मंत्रानं ऽ
एकाच मांडवात जोडीनं
ही नवीनच तऱ्हा
कानी पडलीया जरा
बघु कस काय होतंय ते – १

मामा : ए, येडा हाय का तु, शाना रं ऽऽऽ
काय पण सांगतोस आम्हा रं ऽऽ
रीतिरिवाज काय माना रं ऽ
जुनं कसं सोडायचं धर्मा रं ?
काही मानपान हाय का
आपलं घरदार नाही का
लोक काय म्हणतील आम्हाला ? – २

गोमा : ए, माझं लग्न औंदा ठरवायचं हाय ऽऽऽ
पैसा तर घरात काहीच नाय ऽऽ
माझं मत मेळाव्याला जायाचं हायऽ
पण ? गावकरी म्हणतात जमायचं नाय
जुनं धरून बसलं
हे गावकरी भलं
माझी वाटच लागणार हाय – ३

संघटना–कार्यकर्ते : ही गोष्ट तशी अवघड हाय ऽऽऽ
जुनी रूढी आम्हा तोडायची हाय ऽऽ
तरुण मुलांनी भाग घ्यायाचा हाय ऽ
तेव्हा त्यांना काही बोलायचं नाय
हात जोडून करितो
गावकऱ्यांना विनंती
गावकीकर घ्यायाचा नाय ऽऽ – ४

**—प्रदीप गायकवाड**
जागृत भाऊबंदी संघटना
मार्गाची वाडी

## चुकत चुकत शिकायला मिळतं

पृष्ठ ८ वरून

एक प्रकारची मर्यादा निर्माण होते. आपले खाजगी जीवन संपुष्टात येते. आपले घर हे आपले राहत नाही. घर फक्त आसरा देते, सुख नाही. आपले घर असूनही एकांत मिळत नाही. सुट्टी घ्यायची ठरविल्यानंतर ते शक्य होईल असे सांगता नाही. मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न आहेच—आपल्यासारखे आम्हालाही पुष्कळ ओळखीचे मित्र आहेत, सरकारी, निमसरकारी. हे सर्व अधूनमधून आमची खुशाली पाहायला येतात. मग त्यांना चहा, जेवण द्यायलाच पाहिजे. पाहुणे का उपाशी ठेवणार ? पाहुण्यांना वाटते आम्ही बऱ्याच दिवसांनी तुमच्याकडे आलो; पण आम्हाला तर रोजच पाहुणे असतात. हे सर्व पाहुणचार खिशाला परवडत नाहीत. याचा अर्थ कोणी आमच्याकडे येऊ नये असा नाही. आम्ही तर महाराष्ट्रीय, पाहुणचार हा आमुचा धर्म. बस !

### सामुहिक नेतृत्वाची गरज

सामाजिक कार्यात कार्यकर्ता हा महत्त्वाचा घटक. कार्यकर्ता कसा आहे त्यावर कामाचे भवितव्य अवलंबून असते. कार्यकर्ते बाहेरून आणण्यापेक्षा स्थानिक कार्यकर्ते निर्माण करण्याचा माझा पूर्वीपासूनचा हेतू होता. आपल्याला पाहिजे तसा कार्यकर्ता बाहेरून मिळू शकतो; परंतु त्याची बरीचशी जबाबदारी संघटनेवर पडते. स्थानिक कार्यकर्ता हा हुशार व्हावयास पाहिजे, सामाजिक जाणीव निर्माण झाली पाहिजे, त्याने नेतृत्व केले पाहिजे. याकरिता स्थानिक कार्यकर्त्यांवर जास्त लक्ष केंद्रित केले; पण त्यामुळे असा अनुभव आला की, कार्यकर्ता हाच केंद्रबिंदू होऊन लोकांपेक्षा ते वेगळे दिसायला लागले म्हणून त्यानंतर काही बदल केले. कार्यकर्त्यांमध्ये दोन भाग केले. पूर्ण वेळ कार्यकर्ते आणि अर्धवेळ कार्यकर्ते. आवश्यक एवढे पूर्ण वेळ कार्यकर्ते ठेवून त्यांचे कामाचे स्वरूप व काम निश्चित केले. अर्धवेळ कार्यकर्त्यांच्या संख्येत मर्यादा ठेवली नाही. जेव्हा एखादा मोठा कार्यक्रम किंवा प्रश्न हाती घेतला असेल तेव्हा सर्व तरुणांना एकत्रित करून, त्यांना त्यांच्या कामाची जाणीव देऊन, ज्याची इच्छा आहे त्या सर्वांना अर्धवेळ कार्यकर्ता म्हणून काम देण्याची पद्धत अंमलात आणली. त्यामुळे नेतृत्व हे वैयक्तिक न राहता समूहात राहिले आणि ज्यांना संघटनेबरोबर काम करण्याची इच्छा आहे, त्यांना काम करण्याची संधी मिळाली—पूर्वी एखाद्या मोठ्या कार्यक्रमासाठी सर्व जबाबदारी कार्यकर्त्यांवर असायची म्हणून असा एक नियम केला प्रत्येक कार्यक्रमासाठी किंवा प्रश्नासाठी कार्यकर्ते सोडून एक समिती नेमायची— ही समिती तो प्रश्न पुरा होई. पर्यंत त्याची जबाबदारी सांभाळते. त्यानंतर ती समिती बरखास्त होते. ह्या पद्धतीमुळे लोकांचा सहभाग वाढतो आणि सहकार्यही चांगले मिळते.

या कार्यक्षेत्रात काम करत—करत मिळणारे अनुभव खूप महत्त्वपूर्ण असतात. चुकत—चुकत शिकायला मिळते, सामाजिक जाणीव निर्माण होते. या कामात क्वचित वेळाच समाधान मिळते बाकी सर्व डोक्यावर मोठं ओझं असल्याचा भास !

(जागृत भाऊबंदी संघटना
मु. मागीची वाडी पो. पाथरज
ता. कर्जत, जि. रायगड.)

# इंचमपल्ली धरणास विरोध करावा

बाबा आमटे

इंचमपल्ली व भोपाळ पटनम या धरणामुळे महाराष्ट्र, आंध्र आणि मध्यप्रदेश या तीन राज्यांतील आदिवासी जनजीवन आणि वनसंपत्ती याचे कायम स्वरूपाचे नुकसान होणार असून त्यामुळे मध्यभारतात पर्यावरणाची गंभीर समस्या उत्पन्न होणार आहे. म्हणून आदिवासींचा विकास, वनसंपत्तीचे संरक्षण आणि पर्यावरणाच्या प्रश्नाविषयी आस्था असणाऱ्या सर्व नागरिकांनी या दोन्ही धरणांना एकजुटीने विरोध केला पाहिजे. असे आवाहन मी या सर्व संबंधितांना करीत आहे.

'आजवरच्या अपुऱ्या सरकारी पाहणीनुसार या

धोरणामुळे महाराष्ट्राची ३९,३३३ हेक्टर्स, आंध्राची ४०,९६८ हेक्टर्स आणि मध्यप्रदेशाची २०,५५७ हेक्टर्स जमीन बुडित क्षेत्रात येत असून त्यात दीडशेवर गावांचा समावेश आहे. सरकारीपत्रकानुसार त्यामुळे तिन्ही राज्यांतील एकूण ६६ हजार लोकांच्या पुनर्वसनाचा प्रश्न निर्माण होणार असून त्यात महाराष्ट्रातील २७,४०० लोकांचा समावेश आहे.' या पाहणीअहवालात अनेक त्रुटी आहेत.

इंचमपल्ली प्रकल्पामुळे संपूर्ण सिरोंचा तहसीलच पाण्याखाली येणार असल्याचे आता स्पष्ट झाले आहे. एट्टापल्ली व अहेरी तालुक्यातील धरणग्रस्तांची संख्या त्यात आणखी मिळवावी लागेल. महाराष्ट्र सरकार पाटबंधारे विभागानेही बुडित गावांची संख्या प्रत्येक वेळी वेगळी सांगितली आहे.

या आदिवासींच्या पुनर्वसनाचा प्रश्न अतिशय गंभीर राहणार असून पूर्णपणे अरण्याधिष्ठित संस्कृतीत वाढलेल्या या अशिक्षित गरिबांचा शहरी विभागातील पुनर्वसनात पूर्णतः कोंडमारा होणार आहे.

या धरणामुळे होणारे वन-संपत्तीचे नुकसान कायमचे असून त्याविषयीचा स्पष्ट अंदाज सरकार अजूनही जाहीर करायला तयार नाही. महाराष्ट्र सरकारतर्फे अजूनही या प्रकल्पाचे सर्वेक्षण पूर्ण व्हावयाचे असल्याचे वेळोवेळी सांगितले गेले.

असे असताना या धरणाच्या उभारणीची पूर्वतयारी मात्र सुरू झाली आहे. इंचमपल्ली, भोपाळपट्टणमची बांधकामकार्यालये उघडली गेली, काही कामाच्या टेंडर नोटिसाही प्रकाशित झाल्या. शिवाय काही गावांना व क्षेत्रांना बुडित क्षेत्रे म्हणून सूचित करण्यात येऊ लागले आहे.

आदिवासींच्या जीवनाविषयी सरकारदरबारी असणारी ही वृत्ती केवळ बेफिकीरपणाचीच निदर्शक मानली पाहिजे. 'ही धरणे होणार असून त्याला आता केंद्राची अंतिम मान्यताच मिळवयाची राहिली आहे.' असे महाराष्ट्राच्या मा. मुख्यमंत्र्यांनी नुकतेच अहेरीच्या जाहीर सभेत सांगितले. या धरणाच्या दुष्परिणामाबाबत पत्रकारांनी त्यांना विचारलेले असता मला त्या वादात पडायचे नाही.' असेही उत्तर त्यांनी दिल्याचे प्रकाशित झाले आहे.


देश स्वतंत्र होत असताना आपण अंत्योदयाचे महात्माजींचे स्वप्न पूर्ण करण्याची प्रतिज्ञा घेतली. या धरणामुळे, अखेरच्या माणसांनाच बळी देण्याची, या प्रतिज्ञेशी द्रोह करणारी कारवाई शासन करणार आहे. विकासाच्या कोणत्याही योजनेला आम्ही विरोध करणार नाही; पण या विकासासाठी अखेरच्या माणसांना उध्वस्त करण्याच्या प्रयत्नांना मात्र आमचा निश्चित विरोध आहे व हा विरोध घटनात्मक आणि शांततामय मार्गाने पुढे रेटण्याचा आमचा निर्धार आहे.

सुदैवाने राहुलजी बारपुते यांच्यासारखे ज्येष्ठ पत्रकार, कर्नल वर्मासारखे पर्यावरणाचे तज्ज्ञ आणि बाळासाहेब तिरपुडे, खा. शांताराम पोटदुखे, राजे विश्वेश्वरराव यांच्यासारखे आदिवासींचे हितरक्षक या प्रश्नांवर संघटितपणे आवाज उठवीत आहेत.

हेमलकसा येथील लोक बिरादरी प्रकल्पावर जमलेल्या ५ हजारांवर आदिवासींच्या मेळाव्यात या धरणांना प्राणपणाने विरोध करण्याची शपथ आदिवासी स्त्री–पुरुष आणि मुलांनी घेतली आहे.

खुद्द पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनीही या प्रश्नात सहानुभूतीने लक्ष घालावयाचे मान्य केले आहे. दि. ३० ऑगस्ट १९८३ ला मला पाठविलेल्या पत्रात त्या म्हणतात, 'या प्रश्नाबाबतचे माझे विचार सर्व ज्ञात आहेत; परंतु हा लढा अतिशय कठीण आहे. आपण सर्व मिळून हे प्रकरण धसास लावू या. या धरणाबाबत तुम्ही उपस्थित केलेल्या सर्व बाजूंचा विचार करण्याचा आदेश मी योजना–आयोगाला करीत आहे.'

या पार्श्वभूमीवर आदिवासीसारख्या असंघटित आणि गरीब माणसाच्या पाठीशी उभे राहण्याचे आवाहन या प्रश्नाविषयी आस्था असणारा एक सामान्य कार्यकर्ता म्हणून मी सर्वांना करीत आहे. राजकारण बाजूला सारून या मानवी लढ्यात सर्वांनी सामील व्हावे अशी माझी सर्वांना कळकळीची विनंती आहे.



पुस्तक परीक्षण

# तपस्वी कर्मयोग्याची जीवनगाथा

धुळे जिल्ह्यातील आदिवासींमधील आपल्या सेवा-कार्याने ख्यातनाम असलेले ज्येष्ठ गांधीवादी कार्यकर्ते कै. शंकर विनायक तथा नानासाहेब ठकार ( १८९३–१९६४ ) यांचे व्रतस्थ जीवन मॅजेस्टिक बुक स्टॉलने 'जागतो संयमी तेथे' या ग्रंथाद्वारे प्रकाशात आणले आहे.

या ग्रंथाच्या पहिल्या भागात नानासाहेबांच्या पत्नी श्रीमती पार्वतीबाई ठकार यांनी उभयतांच्या सह-जीवनातील आठवणी वाचकांपुढे जिवंत उभ्या केल्या आहेत. दुसऱ्या भागात नानासाहेबांचे ग्राम-सेवेचे अनुभव व काही निवडक लेख यांचा समावेश आहे

देशसेवेच्या खडतर कार्यात नानासाहेबांनी आपले जीवन घालवण्याचे ठरविले तो काळ १९१६–१८ सालचा. लो. टिळक युगाच्या अखेरीचा हा काळ. म. गांधींचे विचार व कार्य यांची ओळख भारतीय जनतेस अजून व्हावयाची होती. विद्यार्थीदशेत असतानाच या देशाची सेवा करायची म्हणजे ती खेड्यातील जनतेचीच केली पाहिजे असे नानांच्या मनाने घेतले. काय केले पाहिजे याचा विचार केला. बेत आखले. स्वदेशी, देशाभिमान यासाठी लो. टिळकांचे आदर्श डोळ्यांपुढे होते. शिक्षण संपले. परकीय सरकारची नोकरी तर करावयाची नाहीच; परंतु सरकारी अनुदान घेणाऱ्या संस्थेचीही नोकरी करावयाची नाही असा निश्चय होता. पश्चिम खानदेश जिल्ह्यात ( सध्याच्या धुळे जिल्ह्यात ) तसे कार्यक्षेत्र हेरले. सुरुवातीची दहा वर्षे खेड्यांचे अंतरंग पाहिले व अनुभवले, देश व देशापुढील प्रश्न यांची ग्रामवासीयांना ओळख घडवली आणि एका खेड्या-वर लक्ष केंद्रित करून त्याचा कायापालट घडवून आणला.

आयुष्याची पंचवीस वर्षे नानांनी धुळे जिल्ह्यात वेचली. ग्रामसेवेबरोबरच काँग्रेसकार्य, आदिवासी सेवा, स्वातंत्र्यलढ्यात भाग यांमध्ये मन, बुद्धी व कष्ट ओतले. यातली चार वर्षे कारावासातच गेली. सातपुड्याच्या गिरिकंदरात राहणाऱ्या भिल्लांना नव्या जगाची पहाट दाखविण्यासाठी ते त्यांच्यात वावरले. सावकार, दारू व सरकारी अधिकारी यांच्यापासून त्यांचा बचाव करण्यासाठी लढे उभारले. भिल्लांसाठी शाळा व छात्रालये काढली. औषधसेवा व धान्यकोठारे सुरू केली. हे सर्व कार्य कायम स्वरूपाचे व्हावे म्हणून संस्था स्थापली व जोपासली. संमेलने व परिषदा भरवून देशातील पुढाऱ्यांना भिल्लांच्या स्थितीचे साक्षात दर्शन घडवले.

त्यांचे उत्तरायुष्य ग्रामोद्योग–शिक्षण व गांधी-तत्त्वप्रसार यात व्यतीत झाले. त्यानिमित्ताने महा-राष्ट्रातील व देशातीलही ठिकठिकाणच्या ग्रामोद्योग-केंद्रांशी त्यांचा संबंध आला, तसेच स्वातंत्र्यानंतरच्या युगात गांधी–तत्त्वज्ञानाची ज्योत तेवत ठेवण्यासाठी ज्यांनी कष्ट चालवले होते, त्यांच्याबरोबर कार्य करता आले. हिमालयाच्या परिसरात काही काळ घालविण्याच्या उर्मीने ते तिकडे गेले; परंतु वान-प्रस्थाश्रमी जीवनातही तेथे ते कार्यमग्न होते. त्यातच अल्मोडा येथे आकस्मिकपणे त्यांनी आपली देहयात्रा संपविली.

१९३२ साली तुरुंगात असताना मित्रांच्या आग्रहा-वरून त्यांनी आपले अनुभव लिहून ठेवले. त्यांपैकी काही या ग्रंथात 'ग्रामसेवेचे अनुभव' या भागात दिले आहेत. यातील काही अनुभव 'लोकशक्ती'-मध्ये प्रसिद्ध झाले होते. नानांचे घराणे मूळचे अत्यंत गरीब; परंतु सात्त्विक, कॉलेज शिक्षणाची संधी घराण्यात प्रथम नानांनाच मिळाली. १९१८ साली त्यांनी कॉलेज–शिक्षण पूर्ण केले. भावी आयुष्यात मामुली चाकोरीचा मार्ग सोडून निराळेच काही तरी

कार्य करावे अशी त्यांची लहानपणापासून इच्छा होती. सात्त्विक व निःस्पृह स्वभावाच्या त्यांच्या वडलांचाही त्यांना याबाबतीत पाठिंबा होता. 'महर्षी दादाभाई नौरोजी, बाबू रमेशचंद्र दत्त, मिल्यम डिग्बी इत्यादी विद्वानांच्या हिंदुस्थानविषयक राजकीय व आर्थिक परिस्थितीसंबंधीच्या ग्रंथांच्या वाचनाने खेड्यांचे पुनरुज्जीवन केल्याशिवाय या राष्ट्राचा उद्धार होणे शक्य नाही ही गोष्ट नानांच्या मनावर पूर्णपणे बिंबली. कॉलेजमध्ये असतानाच त्यांनी ग्राम-सेवेची छोटीशी योजना लिहून काढली व शिक्षणक्रम पुरा होताच ती अंमलात आणावी याचा ध्यास त्यांना लागला. मध्यंतरी काही काळ तर शिक्षणक्रम अर्धवट सोडून प्रत्यक्ष कामाला लागावे असे उतावीळ-पणाचे विचार मनात येऊ लागले; परंतु महाराष्ट्रा-तील राष्ट्रीय शिक्षणाचे अध्वर्यू प्रा. अण्णासाहेब विजापूरकर यांनी शिक्षणक्रम पुरा होईपर्यंत प्रत्यक्ष कामाचे विचार थोपवून धरावेत असा सबुरीचा सल्ला दिला. नानांनी १९१६ साली लो. टिळकांची मुंबई येथे सरदारगृहात भेट घेतली व त्यांना ग्रामसेवेची योजना दाखवली. लोकमान्यांनी गंभीर पण स्मितयुक्त चर्येने नानांकडे पाहून म्हटले, 'योजना ठीक आहे; पण अंमलात कोण आणणार?' लोक-मान्यांच्या या उद्गारांचा नानांच्या अंतःकरणावर कायमचा ठसा उमटला. नानांच्या योजनेत कोणतेही दोष न काढता लोकमान्यांनी अगदी मुळाशीच हात घातला. लोकमान्यांच्या या मूलभूत व मार्मिक प्रश्नाने नानांच्या डोक्यात विचारांचे काहूर माजले. योज-नांचा तुटवडा नाही, कार्यकर्त्यांचा तुटवडा आहे. असाच लोकमान्यांच्या या उद्गारांचा अर्थ नानांनी घेतला आणि एक कार्यकर्ता आपण व्हावे असे त्यांच्या मनाने घेतले.

कॉलेजचे शिक्षण पुरे केल्याबरोबर ग्रामसेवेचे कार्यच हातून घडावे ही इच्छा फलद्रूप होण्याजोगा जीवनक्रम आखावा अशी खटपट चालू असतानाही सुमारे पाच वर्षेपर्यंत (१९१८–२३) मनाजोगी संधी त्यांना लाभली नाही. प्रथम अहमदनगर येथील अनाथ विद्यार्थी गृह, नंतर पुण्यात नूतन मराठी विद्यालयात शिक्षकाची नोकरी व त्यानंतर म. गांधींच्या असहकारितेच्या चळवळीत उडी घेतल्यावर अमळनेरच्या राष्ट्रीय हायस्कुलात् शिक्षक असा त्यांचा प्रवास सुरू होता. १९२३ साली अमळनेरच्या हायस्कूलचे राष्ट्री-यत्व समाप्त झाल्यानंतर त्यांनी निव्वळ सार्वजनिक जीवनच पत्करले. त्या वर्षी नुकत्याच स्थापन झालेल्या 'महाराष्ट्र प्रांतिक खादी मंडळ' या संस्थेचा चिटणीस म्हणून त्यांची नेमणूक झाली. या मंडळाचे मुख्य केंद्र धुळयास असल्यामुळे पश्चिम खानदेश जिल्ह्याशी त्यांचा निकटचा संबंध येत असे. तीन वर्षे त्यांनी हे काम केले. या तीन वर्षांत पश्चिम खानदेशातील खेड्यांची परिस्थिती पाहून प. खानदेशविषयी त्यांना विशेष ओढा व आपलेपणा वाटू लागला. याच सुमारास पक्षभेदातीत स्वरूपाचे कार्य करण्याच्या उद्दिष्टाने स्थापन झालेल्या 'पश्चिम खानदेश जिल्हा मंडळ' या संस्थेचा प्रचारक म्हणून काम पत्करण्याचे त्यांना सुच-विण्यात आले. त्या काळच्या फेरनाफेर, ब्राह्मण–ब्राह्मणेत्तर इ. पक्षभेद–मतभेदाच्या गुंतागुंतीत व वितंडवादाच्या जाळयात न गुरफटता सर्वसामान्य जनतेत विधायक कार्य करणे हे नानांनी आपल्या जीव-नाचे इतिकर्तव्य मानले असल्यामुळे व पश्चिम खानदेश जिल्हा त्यांच्या वृत्तीला अनुकूल वाटल्यामुळे त्यांनी हे काम पत्करले. या कामामुळे ग्रामसेवेची कित्येक वर्षां-पासूनची आकांक्षा तृप्त करण्याची संधी त्यांना मिळाली.

## समर्थ उद्योग मंदिर

प्रथमतः एक वर्ष केवळ लोकस्थिती अवलोकनार्थ जिल्हाभर फिरावयाचे असे त्यांनी ठरविले. सुमारे दहा महिने खेड्यापाड्यांत मनसोक्त संचार केल्यावर म. गांधींचा दौरा प. खानदेशात घडून येण्याची सुवर्णसंधी लाभली. या प्रसंगी ग्रामसंचारातील आपले काही अनु-भव नानांनी महात्माजींना निवेदन केले व पुढील कार्यक्रमाबद्दल त्यांचा सल्ला घेतला. पहिले दहा महिने प. खानदेशात नानांनी जो संचार केला त्याचे तपशील-वार वर्णन 'खेड्यापाड्यांत संचार' या लेखात आहे. खेड्यापाड्यांतील जनसामान्यांशी संवाद साधण्याच्या प्रत्येक संधीचा लाभ कार्यकर्त्याने कोणत्या प्रकारे कौशल्यपूर्वक उठविला पाहिजे याचे मनोरंजक वर्णन 'तमासगिरांच्या परवानगीने व्याख्यान' या लेखात आहे. सबंध जिल्ह्यात सुमारे दीडशे–पावणेदोनशे गावांचे निरीक्षण केल्यानंतर जी चार–दोन गावे केंद्र करण्याच्या लायकीची वाटली त्यात सवाईमुकटी हे

एक खेडे होते. या गावात नानांनी समर्थ उद्योग मंदिराची स्थापना १९२८ च्या रामनवमीला केली. समर्थ उद्योग मंदिर हे गावकऱ्यांना आपल्या गावाचे भूषणच वाटू लागले. या मंदिराच्या माध्यमातून नानांना गावकऱ्यांशी जवळीक साधता आली. अनेक प्रसंग साधून त्यांनी सरकारी नोकरांचा फाजील बडेजाव बंद केला. त्यांना बेमुर्वतखोरपणा व उर्मटपणा आपणच आपल्या स्वाभिमानशून्य वृत्तीने व लांगूलचालनाने शिकवितो असे त्यांनी गावकऱ्यांना पटवून दिले. आपले चारित्र्य धुतल्या तांदळासारखे स्वच्छ व निष्कलंक असल्यानंतर कितीही मोठा सरकारी अधिकारी आला तरी त्याच्या डोळ्यास डोळा भिडविणे ही गोष्ट सुसाध्य आहे हे त्यांनी गावकऱ्यांच्या मनावर बिंबवले. खेडयापाडयांत संचार करताना नानांनी अपार कष्ट सोसले. ध्येय एकच : खेडयातील बंधू-भगिनींना डोळस, स्वावलंबी होण्यास शिकवायचे. महात्मजींचा संदेश त्यांच्यापर्यंत आणून पोहोचवायचा—अर्थात प्रथम स्वत: आचरून या श्रमंतीत त्यांना आलेले अनुभव वाचनीय तर आहेतच; परंतु त्यापेक्षाही अधिक ते नवीन कार्यकर्त्यांचे प्रबोधन करणारे आहेत. या अनुभवांखेरीज आणखी दोन-तीन गोष्टी 'ग्रामसेवेचे अनुभव' या भागाच्या अखेरीस दिल्या आहेत. सार्वजनिक कार्यकर्त्यांस जनतेच्या पैशाच्या हिशेबाबद्दल फारच काटेकोर राहावयास पाहिजे. खेडेगावच्या एका जत्रेसाठी चार दिवस प्रचारकांचा जथा घेऊन नाना गेले होते. त्या वेळचा त्यांनी लिहून ठेवलेला रुपये-आणे-पैचा हिशेब पाहण्यासारखा आहे. समाजकार्यकर्त्यांना यातून खूप काही शिकता येईल.

नानासाहेबांच्या संपर्कात आलेल्या अनेक छोटया-मोठया कार्यकर्त्यांच्या नानांविषयीच्या व त्या काळाविषयीच्या आठवणी, नानांचा निवडक पत्रव्यवहार व त्यांच्या ग्रंथाचा अल्पपरिचय यांचा समावेश साधना प्रकाशनाने प्रसिद्ध केलेल्या 'देशाचा संसार' या पुस्तकामध्ये करण्यात आला आहे. या सर्वच आठवणी जिवंत व बोलक्या आहेत. नानांच्या भिल्लसेवेच्या काळातील त्या वेळचे गाजलेले मसूद-प्रकरण सारांश, रूपाने यात देण्यात आले आहे. आदिवासी भिल्लांवर अक्षम्य अन्याय, जुलूम जबरदस्तीने करून त्यांचा छळ त्या वेळच्या अधिकाऱ्यांनी कसा चालविला होता-नानांच्यासारखे कार्यकर्ते या अन्यायाविरुद्ध कसे झगडत होते व परकीयच नव्हे तर स्वकीय सरकारकडूनही त्यांची कशी होलपट चालली होती त्याचे चित्रच वाचकांना यात पहावयास मिळेल.

या दोन्ही ग्रंथांच्या संकलन-संपादनाचे काम सौ. अंजली ठकार व ठकारकुटुंबियांनी ज्या निष्ठेने व परिश्रमपूर्वक केले त्याबद्दल वाचक त्यांना मन:पूर्वक धन्यवाद देतील.

**—सुधीर जोग**

**जागतो संयमी तिथे**
शंकर विनायक ठकार
पार्वतीबाई ठकार
मॅजेस्टिक बुक स्टॉल
मुंबई – ४००००४
पहिली आवृत्ती मार्च १९८२
पृष्ठे १३६ मूल्य रु. २०.

**देशाचा संसार**
संकलन : सौ. अंजली ठकार
साधना प्रकाशन, पुणे ३०
पृष्ठे ९२. मूल्य रु. १०.

---

# भौतिकी मानवशास्त्र : सुबोध, शास्त्रीय विवेचन

---

'भौतिकी मानवशास्त्र' ही प्रा. वि. श्री. कुलकर्णी यांनी मराठी वाचकाला बहाल केलेली एक देणगीच होय. 'फिजिकल अँथ्रोपॉलॉजी' या विषयाचा अभ्यास अजूनही इंग्रजीतूनच चालू आहे. त्यामुळे सर्वसामान्य मराठी वाचकाची या विषयापासून फारकत झालेली आहे. प्रा. कुलकर्णी यांच्या या ग्रंथामुळे ही उणीव काही प्रमाणात भरून निघेल असे वाटते. त्या दृष्टीने हा ग्रंथ महत्त्वाचा म्हणावा लागेल.

वास्तविक पाहता भौतिकी मानवशास्त्र या विषयाचा विस्तार खूप व्यापक आहे. त्याच्या एकेका शाखेमधून शेकडो संशोधकांनी संशोधन आणि ग्रंथनिर्मिती ( अर्थातच इंग्रजीतून ) केलेली आहे. या विषयावर एकाच पुस्तकामध्ये समग्र माहिती देताना त्यामुळेच

लेखकावर काही बंधने येतात. प्रा. कुलकर्णी यांनी त्याचा जाणीवपूर्वक विचार करून मूलभूत संकल्पनांची माहिती देण्यावर भर दिला आहे. पुस्तकाच्या उपयुक्ततेच्या दृष्टीने ग्रंथनिर्मितीच्या उद्दिष्टाच्या दृष्टीने असे उचित होय.

ग्रंथाच्या पहिल्या प्रकरणाच्या सुरुवातीस प्रस्तावनेत 'अँथ्रोपॉलॉजी' या शब्दाचा अर्थ दिला आहे. आतापावेतो मानववंशशास्त्र हा बराच रूढ होत चाललेला शब्दप्रयोग तितकासा बरोबर नसल्याचे सांगून 'अँथ्रोपॉलॉजी' म्हणजे मानवशास्त्र असे म्हटले आहे. मानवशास्त्राचा अभ्यास प्रामुख्याने दोन शाखांमध्ये केला जातो. त्या दोन शाखा म्हणजे 'सांस्कृतिक मानव शास्त्र' व 'भौतिक मानवशास्त्र.' पैकी भौतिकी मानवशास्त्राची मूलभूत तत्त्वप्रणाली म्हणजे 'मानवाच्या शारीरिक व सांस्कृतिक वाढीसाठी अधिशासक असलेल्या तत्त्वांचा संच शोधून काढणे ही होय. शारीरिकदृष्ट्या मानवात बदल का झाला? निरनिराळ्या मानवी गटांचा उगम जर एकच आहे तर असे अनेक गट निर्माण होण्याचे कारण काय ? भाषा व संस्कृति यांमधील विविधतेच्या मुळाशी कोणते कारण आहे ? अशी विविधता आनुवांशिकी पद्धतीने निश्चितच येत नाही. संस्कृतीचे स्वरूप काय व सांस्कृतिक बदल कशा प्रकारे घडतात ? अशा बदलांमध्ये जीव वैज्ञानिक वा भौतिकी बदलांचे स्थान कितपत महत्त्वाचे आहे? वगैरे प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी सर्व प्रकारच्या व सर्व थरांवरील मानवी गटांचा सखोल अभ्यास शारीरिक व सांस्कृतिक मानवशास्त्राच्या पद्धतीद्वारे करण्यात येतो.

भौतिकी मानवशास्त्राचा विकास कसा झाला, ह्याचे माहितीपूर्ण तसेच रोचक वर्णन आढळते. इ. स. पूर्व १००० च्या सुमारास हॅनो नावाच्या साहसी दर्यावर्दीच्या रोजनिशीत त्याने पाहिलेल्या मानवसदृश माकडांचा उल्लेख पुस्तकात आढळतो. ॲरिस्टॉटल, गॅलन, हेरोडोटस्, हिप्पोक्रेटिस, व्हिसालियस, लिनियात, बूफाँ, चार्लस् व्हाईट, प्रिचर्ड, लॉरेन्स, डार्विन, मेंडेल इत्यादींनी या शास्त्रशाखेच्या प्रगतीस कसकसा हातभार लावला याचे वर्णन त्यात आहे.

पुस्तकाच्या दुसऱ्या प्रकरणामध्ये भौतिकी मानवशास्त्राच्या उपशाखा. अभ्यासपद्धती व उपयोग यासंबंधीची चर्चा आहे. सहज समजतील अशा प्रकारे नाकाचे नाकपुड्यांचे, ओठांच्या जाडीचे, कानाच्या पाळीचे आणि चेहरेपट्टीचे विविध प्रकार रेखाचित्रांच्या सहाय्याने वर्णिले आहेत. पुस्तकाचा हा भाग सामान्यातल्या सामान्याला आवडून जाईल. शास्त्रीय पद्धतीने शरिराच्या वेगवेगळ्या हाडांचे मोजमाप कसे करावे व त्यावरून वेगवेगळे निर्देशांक कसे काढावेत याचा तपशीलही येथे आहे. सर्वांच्या जिज्ञासेचा भाग असलेला विषय म्हणजे मानवाची उत्क्रांति. त्याविषयीची सखोल माहिती तिसऱ्या प्रकरणात आढळते. लामार्क, डार्विन, लिनियस यांनी मांडलेले विचार व उत्क्रांतीबद्दलच्या वेगवेगळ्या संज्ञा व संकल्पना यांनी हे प्रकरण अतिशय माहितीपूर्ण झाले आहे.

प्राचीन मानवाच्या अवशेषांचे स्वरूप हे चौथे प्रकरण म्हणजे विज्ञानाच्या वाचकाला एक मेजवानीच आहे. ह्यामध्ये जगामध्ये आतापर्यंत सापडलेल्या महत्त्वाच्या अवशेषांचा साकल्याने विचार केला गेला आहे. भू-वैज्ञानिक कालक्रम, सांगाड्याच्या परीक्षेवरून लिंगाची व वयाची निश्चिती, वेगवेगळ्या संशोधकांनी केलेले प्राचीन मानवाचे समग्र वर्णन आणि शेवटी जातिविकासात्मक निर्देशक वृक्ष--हे सारे वाचनीय आहे. नर वानर गण या पाचव्या प्रकरणामध्ये निरनिराळ्या सरवानरांचे व कपींचे (एप्स) वर्णन आहे. तसेच त्यांच्या उत्क्रांतिसंबंधीचे विवेचन आहे. आनुवंशिकतेच्या मध्यवर्ती कल्पना सहाव्या प्रकरणात मांडल्या आहेत.

वंशाच्या कल्पनेच्या आहारी गेलेला एक कालखंड नुकताच संपला. वंशाची संकल्पना व त्यासंबंधीचे युनेस्कोचे निवेदन यांनी सातव्या प्रकरणाची सुरुवात होते. कवटीचा घुमट, चेहरा, खालचा जबडा, केस, ओठ यांचा वंश वर्गीकरणासाठी उपयोग केला जातो. वर्गीकरणाच्या विविध पद्धती तसेच भारतातील सात वंश यांचे वर्णन या प्रकरणात आहे. पुरातत्त्व-विज्ञान व भौतिकी शास्त्र यांमधील परस्परसबंधांची चर्चा आठव्या प्रकरणात आली असून नवव्या प्रकरणात मानवी शरिराची वाढ व वाढीतील प्रगती यांचा समावेश आहे. वयोमानाप्रमाणे अपेक्षित वाढीचे प्रमाण दाखविणारे तक्ते यात दिले आहेत. नव्याने विकसित होणाऱ्या ह्या विषयामध्ये आहार व पोषण यांचाही समावेश केला आहे. त्यामुळे पुस्तकाची उपयुक्तता अधिकच वाढली आहे. उपसंहारात एकूण अभ्यासाचा गोषवारा देण्याचा प्रयत्न केला आहे. पुस्तकाच्या शेवटी निवडक संदर्भ

ग्रंथांची सूची तसेच इंग्रजी–मराठी परिभाषा दिली आहे.

ह्या पुस्तकातील विवेचन हे शास्त्रीय असले तरी बोजड नाही. ग्रंथाची मांडणी सुयोग्य व परिपूर्ण माहिती ह्यामुळे ह्या पुस्तकाचे मोल वाढले आहे. या पुस्तकाच्या निर्मितीसाठी प्रा. कुलकर्णी यांनी जे परिश्रम घेतले त्याबद्दल ते अभिनंदनास पात्र आहेत. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई, यांनी मानवशास्त्रावरील हे पहिलेच पुस्तक प्रकाशित केले म्हणून त्यांचेही अभिनंदन करणे उचित ठरेल.

**–बाबुल पठाण**

'भौतिकी मानवशास्त्र'
प्रा. वि. श्री. कुलकर्णी,
महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई,
नोव्हेंबर १९८३,
पृष्ठे : ३७९, मूल्य : ३३ रुपये.

---

संस्थापरिचय

# विकासभारती, बिशुनपूर (बिहार)

**सुधीर जोग**

विज्ञान व समुचित तंत्रज्ञानाच्या माध्यमातून देशातील एका अत्यंत मागासलेल्या भागाचा विकास करण्याचा विकासभारती, बिशुनपूर हा एक प्रयोग आहे. सहभागी सक्रिय संशोधन (participatory action research), आंतरअभ्यासपद्धती–दृष्टिकोन (Interdisciplinary approach) व सामाजिक जागृती (social awareness) याद्वारे संपूर्ण विकासाचा आराखडा तयार करण्याचे उद्दिष्ट आहे. समाजाच्या तळागाळातील जनसामान्यांना विकासप्रक्रियेचा लाभ घेण्याची योग्य संधी उपलब्ध असेल. विज्ञान, संस्कृती व सामाजिक प्रयत्न एकत्रित आले तरच समतोल विकास साध्य होऊ शकेल या विश्वासाचे मूर्त स्वरूप म्हणजे विकासभारती.

या कल्पनेस मूर्त स्वरूप देण्यासाठी देशातील एका अत्यंत मागासलेल्या भागाची निवड करण्यात आली आहे. या भागात विपुल निसर्गसंपत्ती आहे. मात्र लक्षावधी लोक विपन्नावस्थेत जीवन जगत आहेत. झारखंड भागात रांचीपासून १२३ कि. मी. अंतरावरील बिशुनपूर हे या प्रयोगाचे केंद्र आहे. बिशुनपूरच्या सभोवार नदीनाले, डोंगरदऱ्याखोऱ्यांतून उरावं, मुण्डा, बिरहोर, बिराजिया, असूर यांसारख्या अनेक जमातींचे वास्तव्य आहे. प्रथम छोट्या कार्यक्षेत्रामध्ये अनुभव घेऊन कार्याचा विस्तार करावा असे प्रारंभी ठरविले गेले. बिशुनपूरच्या आसपासची २४ खेडी हे कार्यक्षेत्र म्हणून निश्चित केले आहे. बिशुनपूर प्रखण्डामध्ये ६८ गावे आहेत. या गावांत कार्याचा विस्तार नंतर करण्यात येईल.

## पार्श्वभूमी

जानेवारी १९८३ मध्ये कार्यक्षेत्राची निवड केल्यानंतर एक वर्षभर प्रत्यक्ष कामास सुरुवात झाली नाही. कल्पना अशी की, या भागातील गावोगावी हिंडून, लोकांशी बोलून एकूण परिस्थिती समजावून घेणे आवश्यक आहे. लोकांच्या व्यक्तिगत व गटागटाने भेटीगाठी घेण्यात आल्या. देशभरातील अनेक प्रमुख व्यक्तींशी संपर्क साधण्यात आला. मे १९८२ मध्ये बिशुनपूर विद्यालयामध्ये आठ दिवसांचे कृतिसत्र–शिबिर भरविण्यात आले. आय. आय. टी. दिल्ली व वनवासी कल्याण केंद्र यांनी आयोजित केलेल्या या शिबिराचा विषय Issues in Tribal Development and the Role of science and Technalogy (आदिवासी विकासाच्या समस्या व त्यातील विज्ञान व तंत्रज्ञानाची भूमिका) असा होता. या कृतिसत्रामध्ये ६८ गावांतील १००० हून अधिक कुटुंबांची व १०० कारागिरांची पाहणी करण्यात आली. तसेच विकासविषयक प्रश्नांवर विचारविनिमय करण्यात आला. या

शिबिरात विज्ञान, तंत्रज्ञान, प्रशासन, शिक्षण व सामाजिक संस्थांच्या प्रतिनिधींबरोबरच स्थानिक लोकांनी-विशेषत: युवकांनी—उत्साहाने भाग घेतला.

कृतिसत्रातील अनुभवांवरून लक्षात आले की, विकासप्रक्रियेस गती देण्यासाठी स्थानिक जनतेची जागरूकता व सक्रिय सहभाग अत्यंत आवश्यक आहे. या दृष्टीने या भागातील सामाजिक–आर्थिक परिस्थितीला योग्य वळण लावण्यासाठी एका स्वयंसेवी संस्थेची उभारणी करण्याची आवश्यकता भासू लागली. अनेक प्रमुख व्यक्तींनी या कल्पनेचे स्वागत करून सहकार्याचे आश्वासन दिले. १२ ऑक्टोबर १९८२ या दिवशी 'विकास भारती'ची स्थापना झाली. प्रख्यात मानववैज्ञानिक डॉ. ललिताप्रसाद विद्यार्थी यांची अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. विकास भारतीच्या प्रमुख कार्यकर्त्यांच्या बैठका दिल्ली व कानपूर येथे झाल्या. यापैकी श्री. महेश शर्मा, रजनीश अरोरा, अशोक राय व डॉ. राकेश पोपली यांनी बिशुनपूरमध्ये राहण्याचे ठरविले

## कार्यास प्रारंभ

१४ जानेवारी १९८३ या दिवशी विकास भारतीच्या कार्यकारी मंडळाची पहिली बैठक बिशुनपूरमध्ये झाली 'विकासातील समस्या व शक्यता' यावर चर्चासत्र झाले. यात डॉ. ललिता प्रसाद विद्यार्थी, प्रख्यात साहित्यिक व गांधीवादी विचारवंत श्री. जैनेंद्रकुमार तसेच या भागातील प्रमुख व्यक्ती सहभागी झाल्या होत्या.

बिशुनपूरजवळील चट्टी–सेरका या गावी केन्द्र उभारून कामास सुरुवात करण्यात आली. लोकांच्या भेटीगाठी घेण्यावर सुरुवातीस भर देण्यात आला. प्रथम २४ गावांपुरतेच कार्य मर्यादित करून नंतर ६८ गावात त्याचा विस्तार करण्याचे ठरविण्यात आले.

## शिक्षण

विकास भारतीच्या कामास शिक्षणविषयक कार्यक्रमाने सुरुवात झाली. हे काम साधे सरळ होते व यात मोठी चूक होण्याचा धोका नव्हता. काम समोर येऊन उभे राहिले. बिशुनपूरच्या माध्यमिक विद्यालयात गणित व विज्ञान यांच्या शिक्षणाची व्यवस्था समाधानकारक नव्हती. यामध्ये सहकार्य करण्यात आले. यापुढे विद्यार्थ्यांशी संपर्क वाढला व केंद्रावरच एक अनौपचारिक शिक्षणकेंद्र सुरू झाले. केवळ शाळेतीलच नव्हे तर दिवसभर गावात टवाळक्या करणारी मुलेही येऊ लागली. दूरवरून शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांची राहण्याची सोय करण्यावर लोकांनी भर दिला. एका जुन्या घराची डागडुजी करून त्याचे रूपांतर वसतिगृहात करण्यात आले. यातील सोयी हळूहळू वाढवून ते एक शिक्षणकेन्द्र झाले'

याच सुमारास माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांना समाजसेवा विषयाच्या शिक्षणात सहकार्य करण्याची कल्पना पुढे आली. तसेच विद्यार्थिनींसाठी शिवण, विणकाम इ. चे प्रशिक्षण सुरू करण्यात आले, तसेच वृक्षारोपण, उद्योगप्रशिक्षण इ. कार्यक्रम घेतले गेले. गरीब विद्यार्थ्यांसाठी पुस्तकनिधीयोजना सुरू झाली. प्रौढ शिक्षण व अनौपचारिक शिक्षणाच्या सरकारी कार्यक्रमांचेही विकासभारती हे एक केंद्र बनले.

शिक्षणविषयक कार्यक्रमाने झालेली सुरुवात दोन दृष्टींनी महत्त्वपूर्ण ठरली. एक तर यामुळे विकासभारतीची जनमानसातील प्रतिमा उंचावली. हे कार्य वेगळ्याच प्रकारचे आहे, लोकांमध्ये जागृती व आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी आहे, ही काही एखादी सरकारी अथवा कल्याणकारी संस्था नव्हे हे लोकांच्या मनावर ठसले. दुसरे हे की, यामुळे एका व्यापक क्षेत्रात प्रवेश झाला.

## ग्रामोद्योग

ग्रामोद्योग कार्यक्रमांतर्गत स्थानिक परंपरागत कारागिरांवर व उपलब्ध कच्च्या मालावर लक्ष केंद्रित करण्यात आले. मे ८२ च्या पाहणीत कारागिरांबद्दल काही माहिती मिळाली होती. फेब्रुवारी ८३ पासून कारागिरांबरोबर बैठका सुरू झाल्या. उद्दिष्ट हे की त्यांच्या समस्यांचे चित्र डोळ्यासमोर यावे; परंतु प्रारंभी कारागिरांनी फारसा उत्साह न दाखविल्यामुळे ठोस पावले पडली नाहीत. काही अनुभवी इंजिनिअर्स व उद्योग व्यवसाय क्षेत्रातील अनुभवी व्यक्तींबरोबर कारागिरांची बैठक झाली. उत्साह वाढला. ऑगस्ट पासून एक ग्रामोद्योग विकासकेंद्र सुरू झाले. काही स्थानिक लोहार कारागिरांचा गट रांचीमध्ये कामाच्या पाहणीसाठी पाठविण्यात आला. ऑक्टोबरमध्ये जिल्ह्याचे

उपायुक्त व उपविकास आयुक्तांच्या उपस्थितीत कारागिरांचे एक विशेष संमेलन चिगरीमध्ये झाले. त्यानंतर निवडक कारागिरांना प्रशिक्षणासाठी पुरस्कृत करण्यात आले. ऑक्टोबरमध्ये ३ कारागिरांना शेती अवजारांच्या प्रशिक्षणासाठी गुजरातेत यंत्रविद्यालय बारडोली येथे पाठविण्यात आले. ग्रामोद्योग क्षेत्रात एक नवीन शक्यता ध्यानात आली आहे. या भागात पपया, टोमॅटो, आवळा इ. मुबलक प्रमाणात उपलब्ध आहेत. त्यापासून लोणची मुरंबे बनवले जाऊ शकतात. या दृष्टीने डिसेंबरमध्ये कृषिमंत्रालयाच्या खास विभागाच्या मदतीने झालेल्या ७ दिवसांच्या प्रशिक्षणशिबिरात ५५ महिलांनी भाग घेतला.

उपलब्ध कच्चा माल विशेषतः जंगलातून मिळणारी उत्पादने डोळ्यासमोर ठेवून काही नवीन उद्योगांना प्रोत्साहन दिले जाऊ शकेल. तेल, साबणउत्पादन, मधमाशापालन, जडीबुटी, विणकाम, कातकाम, रेशीम-उद्योग, हाताने बनवलेला कागद, लाकूड सामान, यासारख्या कामात स्थानिक युवक व महिलांना मोठ्या प्रमाणावर सहभागी करून घेणे शक्य होईल. त्यासाठी एका उत्पादन / प्रशिक्षणकेंद्राची आवश्यकता आहे.

## शेती

शेती हाच या भागातील प्रमुख व्यवसाय आहे. गाव अथवा पंचायतपातळीवर नियमितपणे एकत्र जमून समस्यांसंबंधी उपयुक्त चर्चा / विचारविनिमय करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यात आले. २ युवकांना रांची येथील कृषिविज्ञान केंद्रात प्रारंभिक प्रशिक्षणासाठी पाठवण्यात आले. याचा खूपच उपयोग होत आहे. खरीप प्रशिक्षणात युवक शेतकऱ्यांना सहभागी करण्यात आले. वृक्षारोपण कार्यक्रमात पपया, चिंच, सुबाभुळ इ. ४००० झाडे लावण्यात आली. तांत्रिक तसेच सिंचनाच्या दृष्टीने विस्तृत पाहणी करण्यात आली. नवीन प्रयोग व नर्सरीसाठी कृषिविकासकेंद्र सुरू करण्यात आले आहे.

## महिलांसाठी विज्ञान

सप्टेंबरमध्ये भारतसरकारच्या विज्ञान-तंत्रज्ञान विभागाच्या आर्थिक सहाय्याने एक विशेष प्रकल्प सुरू करण्यात आला. महिलांच्या दैनंदिन कामातील अडचणी दूर करणे, तसेच त्यांना उपयुक्त रोजगार मिळवून देणे या उद्देशाने धुम्रहीन, इंधन वाचवणारी चूल बसविण्याचे प्रयत्न केले जात आहेत. सुबाभुळची झाडे लावण्यास प्रोत्साहन देण्यात आले. यामुळे जंगलातून सरपण आणण्याचे काम हलके होईल. पिण्याच्या पाण्यासंबंधी एक विस्तृत पहाणी करण्यात आली असून प्रत्येक गावात सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न केले जात आहेत. सौरकुकर येथे उपयुक्त नाही असे लक्षात आले. कारण सकाळी सूर्योदयापूर्वी व संध्याकाळी सूर्यास्तानंतर स्वयंपाक केला जातो. बायोगॅस महाग आहे. मात्र सामुदायिक बायोगॅस बसविण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत.

## पुढील वाटचाल

स्थानिक जनतेशी कार्यकर्ते समरस झाले ही या वर्षातील प्रमुख जमेची बाजू. भावनात्मक व बौद्धिक दोन्ही पातळ्यांवर लोकजीवन समजावून घेण्याचे प्रयत्न कार्यकर्त्यांनी केले. याचप्रमाणे जनमानसामध्येही विकासभारतीची प्रतिमा स्पष्ट झाली. विकासभारती ही संशोधनसंस्था नाही, तसेच एखादी संघटनाही नाही, रोजगार देणारे कार्यालय नाही अथवा दोन-चार व्यक्तींच्या महत्त्वाकांक्षांचे मूर्त स्वरूपही नाही. तसे पाहिले तर कोणत्या ना कोणत्या प्रकारे या गोष्टी खऱ्या आहेत. मात्र शुद्ध स्वरूपात विकासभारती ही प्रत्येक व्यक्तिला सामावून घेणारी एक विकासप्रक्रीया आहे. सर्व लोकांनी आपल्याला विकासभारतीप्रक्रियेचा भाग मानलेले आहे. त्यात यश मिळते आहे.

आय. आय. टी. दिल्ली, आय. आय. टी. कानपूर, आय. आय. टी. जमशेदपूर, बिटसा कृषिविश्वविद्यालय, रांची विश्वविद्यालय यासारख्या मान्यवर संस्थांशी निकटचे संबंध प्रस्थापित झाले आहेत.

मजबूत पायाभरणीनंतर विविध अंगांनी काम विकसित होत आहे. गावातील शेती, ग्रामोद्योग, शिक्षण, आर्थिक परिस्थितीसंबंधी कार्यकर्त्यांची समज वाढली आहे. यापुढे शेतकरी स्वतःहून यात अधिक रस दाखवतील यासाठी प्रयत्न केले जातील. शेतकऱ्यांच्या शेतावर व कृषिविकासकेंद्रावर नवीन तंत्रज्ञानाची प्रात्यक्षिके दाखविणे शक्य होईल. ग्रामोद्योगक्षेत्रात अधिक प्रगती करायची आहे. कारागीर पंचायत समर्थ बनवायची आहे. परंपरागत उद्योगव्यवसाय डोळ्यांसमोर ठेवून प्रशिक्षण उत्पादनकेन्द्र विकसित करायचे

आहे. काही गावांत अनौपचारिक विद्यालये चालविण्याची योजना आहे. गावागावांतून विज्ञानमंडळाची स्थापना केली जाऊन त्याद्वारे जनसामान्यांपर्यंत विज्ञान पोहोचविण्याचे प्रयत्न केले जातील. बिशनपूरमध्ये ग्रामीण तंत्रज्ञानकेन्द्र स्थापन करण्याची योजना आहे. याद्वारे नवीन रोजगार उपलब्ध होऊन त्यात भर पडेल. सौरशक्ती, बायोगॅस इ. चा योग्य उपयोग, पशुपालनाचे नवे प्रयोग व आरोग्यशिक्षण इ. योजना डोळ्यांसमोर आहेत. एका मोठ्या प्रयोगाची सुरुवात तर चांगली झाली असे म्हणता येईल. ❋

संपर्कासाठी पत्ता : विकासभारती, बिशुनपूर ( बिहार ), ८३५३३१

(विकासभारती, बिशुनपूर वार्षिक प्रतिवृत्त १९८३ च्या आधारे)




मा. संपादक
‘ हाकारा ’

हाकाराचा ताजा अंक मिळाला. अतिशय आवडला. विशेषतः गं. बा. सरदारांच्या मार्गदर्शनाचा अहवाल. सुधीर जोग–सुषमा सोनक ह्यांचे अभिनंदन. माधव गाडगीळांचे विचार, विशेषतः पर्यावरण व सामाजिक वनीकरणावरील) अत्यंत उद्बोधक असतात ह्या अंकातील लेखांचे प्रयोजन महत्त्वाचे वाटले. त्रयस्त दृष्टीने पण तेवढ्याच चिकित्सकपणे आदिवासी साहित्याचे व इतिहासाचे मूल्यमापन कसे करायला हवे, ह्याची पावतीच अंकातील लेखांवरून मिळाली.

शैलजा देवगावकरांचा लेख गोंधळलेला व ‘ शिमगा फाग ’ ची सखोल माहिती नसलेला वाटला. लेखात गोंडी लोकगीतांवरून ‘ फाग ’वर लिहिताना्च, गोंडापासून व भौगोलिक कारणाने दूर झालेली परधान जमात असा निर्वाळा कसा देतात ? त्याचा तपशील ते देत नाहीत. पुस्तकांची समीक्षा महत्त्वाची. तरीही ‘ गोडबोले’च्या ‘ इंद्रावतीची मोहीम ’ला न्याय मिळाला नाही असे राहून राहून वाटते.

य. ग. जाधवांचे पत्र वाचून, सर्वच जण आपल्या हितसंबंधांचे नाते जपून पुर्वग्रह दूषित पद्धतीने विचार करतात याचे वाईट वाटते. त्यांनी ह्या विषयावर तटस्थपणे लेख लिहावे. मात्र संपूर्ण वनविभाग कर्मचारी ह्यांची निर्दोष म्हणून ते हमी कशी काय देतात ? लोक आणि वन प्रशासन ह्यांचा संवाद आवश्यक आहे.

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेच्या जिल्हा पातळीवर शाखा काढण्याबद्दल प्रयत्न अपेक्षित आहेच. ह्या दृष्टीने मी काही काम करू इच्छितो. कळवावे.

परत चांगल्या संपादनबद्दल अभिनंदन !

आपला
**भुजंग मेश्राम**
मुंबई, १७ एप्रिल ८४

## संपादकीय

पृष्ठ २ वरून

स्वतःला आदिवासी म्हणवून घेऊन करतात. वैद्यकीय व अभियांत्रिकी महाविद्यालयातील प्रवेश, सरकारी नोकऱ्यांतील राखीव जागांचा उपयोग याची आकडेवारी पाहिली तर हे उघड होईल. वारली, कातकरी, माडिया मात्र तसेच लंगोटीतच राहतात. यावरून आदिवासी कोणाला म्हणावयाचे ? विकास म्हणजे काय ? इ. मूलभूत प्रश्न पुढे येतात. विशिष्ट आदिवासी गट किंवा आदिवासी म्हणवून घेणारे बिगरआदिवासी यांचा विकास झाल्याने आदिवासींचा विकास झाला असे म्हणता येईल का ? सवलतींचा प्रश्न हा गरीबीचा आहे आणि तो अत्यंत बिकट आहे; अनुसूचित जाती जमातींची संख्या वाढून विकास होणार नाही. शास्त्रीय संशोधनाद्वारे आदिवासी कोणाला म्हणावयाचे हे निश्चित ठरवून त्याबाबतचे खंबीर धोरण आखून त्याचा पाठपुरावा केला पाहिजे. ❋

| | | | |
|---|---|---|---|
| ' हाकारा ' पहिला, जानेवारी-मार्च | १९८० | : | जबरन जोत जंगल जमीन |
| ' हाकारा ' दुसरा, एप्रिल-जून | १९८० | : | आदिवासी व शिक्षण |
| ' हाकारा ' तिसरा, जुलै- सप्टेंबर | १९८० | : | आदिवासी व वनसंवर्धन |
| ' हाकारा ' चौथा, ऑक्टोबर-डिसेंबर | १९८० | : | आदिवासी साहित्य व कला |
| ' हाकारा ' पाचवा, जानेवारी-मार्च | १९८१ | : | दलितांना सवलती व राखीव जागा माहिती |
| ' हाकारा ' सहावा, एप्रिल-जून | १९८१ | : | आदिवासी व आरोग्य |
| ' हाकारा ' सातवा, जुलै-सप्टेंबर | १९८१ | : | वनशेती व वनसंवर्धन |
| ' हाकारा ' आठवा, ऑक्टोबर-डिसेंबर | १९८१ | : | रोजगार हमी योजना |
| ' हाकारा ' नववा, जानेवारी-मार्च | १९८२ | : | उत्तरा खंड अभ्यास मोहीम |
| ' हाकारा ' दहावा, एप्रिल-जून | १९८२ | : | धरणे व विकास |
| ' हाकारा ' अकरा-बारा, जुलै-डिसेंबर | १९८२ | : | जंगल व्यवस्थापन |
| ' हाकारा ' तेरावा, जानेवारी-मार्च | १९८३ | : | आदिवासी व दारू |
| ' हाकारा ' चौदावा, एप्रिल-जून | १९८३ | : | आदिवासींच्या सामाजिक / राजकीय चळवळी |
| ' हाकारा ' पंधरावा जुलै-सप्टेंबर | १९८३ | : | प्रा. सरदार गौरव अंक / आदिवासी साहित्य |
| ' हाकारा ' सोळावा ऑक्टोबर-डिसेंबर | १९८३ | : | आदिवासी साहित्य व सामाजिक प्रश्न |


## यांच्या सहकार्याबद्दल परिषद आभारी आहे

१. शिक्षण व युवक कल्याण मंत्रालय, भारत सरकार.

२. भारतीय सामाजिक शास्त्र अनुसंधान परिषद, पश्चिम विभागीय केन्द्र.

३. महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळ.

४. आदिवासी कल्याण संचलनालय, महाराष्ट्र शासन.

५. वनविकास महामंडळ, महाराष्ट्र.

६. कम्युनिटी एड अब्रॉड, ऑस्ट्रेलिया.


* * *

**' हाकारा ' आगामी अंक :** १. आदिवासी स्त्री
२. आदिवासी साहित्य व कला

आगामी अंकासाठी लेखक व कार्यकर्त्यांनी आपले लिखाण वा अनुभव परिषदेच्या पत्त्यावर सत्वर पाठवावे.

Registered with the Registrar of Newspapers for India Under No. 35835/80

# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

(१) आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत संशोधन, चर्चा व प्रकाशन

(२) कार्यकर्त्यांचे शिबिराद्वारे प्रशिक्षण

(३) शासकीय, राजकीय व रचनात्मक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना एकाच व्यासपीठावर आणून त्यांच्यात आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत आणि विकासाबाबत सुसंवाद घडवून आणणे

(४) मानव विज्ञान व सामाजिकशास्त्रे यांच्या शिक्षकांना व विचारवंतांना, मुख्यत: आदिवासींबाबत अभ्यासकांना, एकत्र आणणे

(५) मानव विज्ञानाच्या सर्व शाखांत अध्ययन, संशोधन, प्रकाशन.

या सर्व उद्देशाने 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' स्थापन करण्यात आली आहे. याच उद्देशांचे मूर्त स्वरूप म्हणून 'हाकारा' सुरू करण्यात आला आहे. परिषदेचे सदस्यत्व स्वीकारून आपणही या कार्यात सहभागी व्हावे.

**मानव विज्ञान परिषदेचे सदस्यत्व–**

| | |
|---|---|
| आजीव सभासद | २०० रुपये |
| परिषद वार्षिक सभासद | २० रुपये |
| विद्यार्थी ,, ,, | १५ रुपये |

परिषदेच्या सभासदांना 'हाकारा' विनामुल्य पाठविला जातो.

आपली सदस्यत्व आणि वार्षिक वर्गणी कृपया खालील पत्त्यावर 'महाराष्ट्र मानव-विज्ञान परिषद' (द महाराष्ट्र असोसिएशन ऑफ अँथ्रापॉलॉजिकल सायन्सेस) यांचे नावे पाठवावी. चेक पाठविल्यास अधिक दोन रुपयांची वटणावळ पाठवावी. मनीऑर्डर पाठविल्यास, फॉर्ममागे कृपया आपले नाव व पूर्ण पत्ता लिहावा.

**पत्रव्यवहाराचा पत्ता :**

**रा. के. मुटाटकर**
सचिव, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
ई / ५, प्राध्यापक निवास,
पुणे विद्यापीठ, पुणे – ४११००७

* आपल्या क्रियाशील सहकार्याची अपेक्षा आहे ! *